

कथासंग्रह

# डोहाचे अंतरंग २

अरविंद रा. बुधकर

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# डोहाचे अंतरंग-२

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# डोहाचे अंतरंग-२

## (कथासंग्रह)

लेखक : श्री.अरविंद रा. बुधकर

# डोहाचे अंतरंग-२

## लेखक- श्री.अरविंद रा. बुधकर

मधुपुष्प बी विंग खोली नंबर २०१;

गोळे आळी, पिरांगुट ग्राम पंचायत

तालुका मुळशी जिल्हा पुणे

फोन संपर्क - अरविंद बुधकर ९८२०४०८५५३

९८२०३१९२३६(सौ संजीवनी बुधकर)

arvind_budhkar@yahoo.co.in

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

या पुस्तकाच्या छापील आवृतीचे प्रकाशक मायबोली प्रकाशन यांनी या ई आवृत्तीला अनुमती दिल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

ई प्रकाशक: : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : २ डिसेंबर २०२२

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



# अरविंद बुधकर

**जन्म -** 30 ऑगस्ट 1953 मुंबई


**शिक्षण -** मनुष्यबळ विकास मधील पदवीउत्तर पुणे विद्यापीठ, पदवी (तत्वज्ञान व मराठी)सोमय्या कॉलेज, मुंबई विद्यापीठ, मनुष्य विकास व औद्योगिक संबंध मधील डिप्लोमा(PGDPMIR), ट्रेनिंग मधील डिप्लोमा (ISTD),'**कोविद' (**संस्कृत) भारतीय विद्याभवन


**प्रकाशन** – ई-साहित्य प्रकाशनाने केलेली "**ध्यासंग, महाराष्ट्रातील तीन शिलेदार (दोन्ही मुलाखतींची पुस्तके)** – वसंत, कलामंच, रोहिणी, रणांगण, वसुधा, अनुराग,अलका, लव अंकुश, झाली पहाट झाली, सा. आघाडी ( मालवण ), रासायनी टाइम्स, पुरुष उवाच(मिळून साऱ्याजणी प्रकाशन), विश्वभ्रमंती, कल्पक निवड, कान्हेरी, आमची साहित्य सृष्टी, तारका, झेप, फिरकी, वल्ड सामना, गृहशोभा, कुसुमाकर, संयम, कविताश्री, मिळून साऱ्याजणी, अंकांमधून कविता,


गाणी, कथा, प्रवास वर्णन, विडंबन काव्ये, स्माईलिका (तात्कालिक राजकीय विषयावर) राजकीय प्रहसन लेखन प्रसिद्ध.

**विशेष -** मराठी दूरदर्शन अनेक मराठी मालिकेतून भूमिका करत आहे. 3 हिन्दी व २५ मराठी मालिकांमधून भूमिका. 1977 जुलै मुंबई आकाशवाणी युववाणी मध्ये काव्य वाचन.

अनेक व्यवस्थापन कॉलेज मधून Visiting Faculty. अनेक सामाजिक संस्थांशी निगडीत.




कव्हरवर क्लिक करताच पुस्तक उघडेल

*श्री अरविंद रा. बुधकर,*
*सल्लागार (एच आर) मुलाखतकार,वृत्तपत्रलेखक,व्याख्याता*

# ***मनोगत............***

व्यवसायाने व्यवस्थापन आणि कामगार क्षेत्रातील दुवा म्हणून अनेक पदांवर कार्यरत असताना अनेकांशी संबंध आला. अनेक संघर्षमय परिस्थितीतून वाटचाल तसेच भ्रमंती करताना अनेक मानवी मनांचे कंगोरे अनुभवायला मिळाले. काहीवेळा परिस्थिती हाताळताना पदाचे भान विसरून सामाजिक कार्यकर्ता म्हणून काम करावे लागले. कामगार अपघातग्रस्त झाल्यावर मृत्यू काळ घोंगावत असताना जवळचे नातलग कोणी नाही. डॉक्टर म्हणतात कामगाराला दुसऱ्या हॉस्पिटल मध्ये न्या नाहीतर जगणार नाही. ह्या संवेदनक्षम परिस्थितीत निर्णय घेताना बरोबर असणारे व्यवस्थापन सहकारी, कामगारप्रतिंनिधी, जवळचे कामगार सुद्धा निर्णय घेण्याचे टाळायचे अशा वेळीस बिकट प्रसंग ओढवयाचा. परिस्थिती हाताळताना छुपे विरोधक कशाचे भांडवल करून अडचणीत आणतील ह्याचा भरवसा नसताना अचानक माझ्यावर निर्णय घेण्याची जबाबदारी यायची. अशावेळी खरच परमेश्वरी कृपा होऊन मार्ग निघायचा.. कधी कधी तर जवळचे कुणी नाही ज्ञातीतील कोणी पुढे येत नाही तेव्हा कामगारांना बरोबर घेऊन अग्नि देण्याचा प्रसंग आला. प्रसंगी कामगाराच्या दोन बायकाना कायदेशीर देणी मोठ्या कष्टाने राजी करून विभागून दिल्यानंतर कंपनीचे स्मृतिचिन्ह चांदीचे नाणे अर्धे अर्धे करून ध्या अशी मागणी झाल्यावर चुकीची प्रथा पडू नये म्हणुन विचार करताना खंबीर भूमिका घ्यावी लागली. कंपनीचा अधिकारी रेल्वे अपघातात गेला. घरी सांत्वन करण्यास गेलो तेव्हा माऊली दोन दिवस जेवली नाही कळले. मूल तिच्याकडे बघत आहे,

सासुसासरे आईवडील हतबल झालेले अशावेळी सर्व भान विसरून अंत:प्रेरणेची हाक ऐकून सर्वांसमोर तिला जेवायला घातले. माणसाला जीवदान, उभारी देण्याचे भाग्य लाभायचे तेव्हा जीवनाचे सार्थक झाल्याचे वाटायचे

सर्व घटना, प्रसंग मनाच्या कोपऱ्यात दडून बसले होते. ज्यावेळी नोकरी सोडून व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम करू लागलो तेव्हा मोकळ्या वेळेत हे सर्व प्रसंग घटना मला कागदावर शब्दबद्ध करा म्हणून छळू लागल्या. त्यातून कथा आकार घेऊ लागल्या. मासिकांमधून कविता प्रसिद्ध होत होत्या. सहज म्हणून कथा मासिकांना पाठवित गेलो. कर्मधर्म संयोगाने मासिकांच्या संपादकांनी प्रसिद्धी दिली. असे प्रोसाहन मिळत गेले. मराठी प्रतिलिपी संकेत स्थळावर कथा प्रसिद्ध केल्यावर अनेकांच्या चांगल्या प्रतिक्रिया मिळत गेल्या. त्यातून ऊर्जा मिळत गेली. सहज म्हणून महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांच्याकडे विहित नमुन्यात कथा पाठवून दिल्या. आज पुस्तक रूपाने कथा वाचकांसमोर येत आहेत ह्याचा आनंद होत आहे. ह्यात मासिकांचे संपादक, संकेत स्थळांवरचे वाचक, कथा लिहून झाल्यावर प्रथम टीकात्मक वाचन करून सूचना करणारी माझी पत्नी सौ संजीवनी, साहित्य आणि संस्कृती मंडळ त्याचप्रमाणे पुस्तकाला गोंडस रूप देऊन वाचकांसमोर आणणारे मायबोली प्रकाशनाचे श्री प्रमोद भोगटे यांचे यांचे ऋण शब्दांच्या पलिकडचे आहेत. या पुस्तकाला सगळ्यांचे कौतुकांचे आशीर्वाद मिळतील आणि वाचक उचलून धरतील अशी आशा आहे.

*अरविंद बुधकर*

***अर्पण पत्रिका***

*परिस्थितीचे घाव झेलत*
*अब्रूच्या उंबरठ्या बाहेर*
*पडणारे आयुष्य सांभाळतानाही*
*वेळ मारून नेत*
*आम्ही आहोत पाठीवरील हात*
*अर्ध्या घासातील घास गरजूंना देणारे*
*जन्मदाते **स्वर्गीय नाना आणि आई**.........*
*आणि*
*कुठलीच माहिती नसताना*
*महाविद्यालयीन शिक्षणात घडविणारे*
*आकाशात भरारी घे म्हणत*
*पंखांस आर्थिक बळ देणारे*
*ज्यांच्यामुळे आयुष्यात हे दिवस बघत आहे*
*ते **स्वर्गीय प्राध्यापक वसंत कोकजे सर***
*आणि*
*पुस्तकांचे दालन व प्रोहोत्साहित करणारे*
***प्रा श्री अनंत भावे***

*यांना*
***समर्पित.........................................***

# कथानुक्रम

1. जिद्द

2. नाते माणुसकीचे

3. भोवरा

4. लग्न

5. पेंटर

6. निरोप समारंभ

7. भोग

8. भाग्यश्री

गृहशोभा, सा आघाडी मालवण २०१८

# जिद्द

राम वडील गेल्यामुळे लक्ष्मी बरोबर गावी क्रियाकर्म करण्याकरिता आला होता. गोविंदरावांना राम आणि विलास दोनच मुले. आई भामाबाई, गोविंदराव आणि धाकटा भाऊ माळंशिरज तालुक्यातील अकलुज जवळील गावात अनेक पिढ्यापासून रहात होते.वडिलांची 10 एकर जमीन होती. तसे कुटुंब श्रीमंत जरी नसले तरी सर्वसाधारण होते. घराच्या एका छोट्या जागेत किराणामालाचे दुकान थाटले होते.गोविंदराव जमिनीच्या वादाच्या टेंशनने हृदयविकाराने अकाली पन्नाशीत गेले.स्थानिक आमदार सदाशिवराव स्वत:ची जमीन वाचावी म्हणून सरकारी लोकांना हाताशी धरून इतर जमिनीतून रस्ता काढून योजना मंजूर करून घेतली. ज्यांची जमीन होती त्यांच्याशी चर्चा केली नाही. त्यामुळे इतर अनेक लोकांबरोबर ह्यांची अर्धा एकर जमीन जात होती. ऊस, मका, ज्वारी, बाजरी अशी पीक निघत.कधी फळभाजीचे उत्पादन घेत असत. मोबदला ही समाधानकारक मिळत नव्हता. स्थानिक पुढाऱ्याच्या गुंडगिरीमुळे लोक घाबरून होते. रामला वर्षभराचे काही धान्य गावाहून येत असे.

रामच्या वडिलांना एकूण तीन भाऊ. चुलत भावंडांची शेती वेगळी असल्यामुळे त्यांच्यापासून ते लांब रहायचे. काका त्यांच्या गावाचे सरपंच आणि एक सैनिक भाऊ निवृती घेतलेला ग्रामसेवक होता. त्यांची ही सरकार दरबारी राजकीय ओळख. त्यामुळे जाणे येणे तसे कमीच पण अडीअडचण असली एकमेकाला मदत करीत.गावात नीरा नदीचे पाणी,जलशिवार योजनेत तळी करून साठवून ठेवल्यामुळे पिकाला लागणाऱ्या पाण्याची काही अडचण नव्हती. विलास कम्प्युटर इंजिनियरिंग शिक्षणासाठी पुणे येथे होता.तो सुट्टीत गावी येऊन आईवडिलांना शेतीत मदत करायचा. अभ्यासात हुशार होता.काही तरी वेगळे करावे हे स्वप्न घेऊन शिकत होता. त्याचे शिक्षण व्हावे म्हणून वडील, राम मदत करीत असे. रामही डिप्लोमा इंजिनियर झाल्यामुळे मुंबईला नोकरीत स्थिरावत होता. 5 वर्ष नोकरी झालेली. वर्षापूर्वी लग्न झालेले. बायको सोलापूरचीच,वडिलांची शेती, जरी शिकलेली होती तरी नोकरी करीत नव्हती, शिवणकाम आणि कम्प्युटरचे शिक्षण झालेली, दोन मुलींमध्ये मोठी असलेली. राम मुंबईत भाड्याची खोली घेऊन राहत होता.गावाकडे शेजारी मामा आणि मावशी आईजवळ रहायची. त्यांचीही शेती.क्रियाकर्माचे दिवस संपल्यानंतर आईजवळ कोण रहाणार हा प्रश्न आला. भामाबाई चौथी इयत्ता शिकलेली. नवऱ्याच्या प्रत्येक गोष्टीत लक्ष घालत असल्यामुळे, टक्केटोणपे खाल्यामुळे व्यावहारिक शहाणपण, लोकांशी कसे वागायचे याची जाण चांगली होती. स्वतंत्र ताठ बाण्याने जगण्याचा आत्मविश्वास होता.

“राम तू केव्हा निघणार मुंबईला जायला?”भामाबाई

“तू कशी एकटी रहाणार? त्यातून एवढी शेती तू एकटी बघणार? आमदाराने हायवे रस्ता मोठा व्हावा म्हणून कारस्थान करून लोकांना संकटात टाकले आहे ते कसे हाताळणार? “राम

“तू काळजी करू नकोस. बघू आपण.”भामाबाई

“नाही आई आताच झटपट पावले टाकून त्याला रोखले पाहिजे. मी रजा वाढवली आहे. वकील शोधून कोर्टातून स्टे आणू.राहू दे घोंगडे भिजत.”

“त्याने काय होईल “? विलास

“सरकारी काम दिरंगाई होईल. आपण इतर लोकांना बरोबर घेऊ. दबाव येईल. तेव्हा निघेल काही मार्ग. बघू वेळ येईल तशी. पण जमीन मात्र जाऊ द्यायची नाही. आई तू मात्र वकालतनामावर सही कर. तसेच आमच्या दोघांची नावे तुझ्याबरोबर सात बारा मध्ये आताच घालून ठेवू. मला केससाठी अधिकारपत्र दे. “राम

आई रामशी सहमत झाली. तिने त्याप्रमाणे सही केली. आई राम आणि विलास तिघांनी तहसिलदार कार्यालयात जाऊन सात बारावर नाव चढवली. रामला ह्या बाबतीत योग्य निर्णय घेण्याचा अधिकार दोघांनी दिला. रामच्या रक्तात लढवय्या मराठ्यांचे रक्त खेळत होते. त्याचे पणजोबा पेशवाईत शिलेदार, तर आजोबा मराठवाडा लढ्यात भाग घेतलेले. तर चुलत भाऊ सैन्यात नोकरी करणारे.

रामने कोर्टात केस दाखल करून सरकार निर्णयाविरुद्ध एकतर्फी स्टे आणला. पुढील तारीख लांबची घेतली. रामने नात्यातील वकिलाला कुठल्याही परिस्थितीत दबावाला शरण जायचे नाही, कुठलाही निर्णय त्यांनी विचारल्याशिवाय घ्यायचा नाही हे बिंबवले.विलासचे कॉलेज सुरू होण्यास वेळ होता. त्याने आईजवळ रहायचे कबूल केले. मामाने आईकडे लक्ष देण्याचे, घरी येऊन जाऊन रहाण्याचे कबुल केले. राम नोकरीवर रुजू झाला. विलास कॉलेजला पुण्यास रुजू झाला. रामच्या नशिबाचे फासे फिरले. संकटाची मळभ दाटु लागली. कंपनीत मंदीमुळे कामगार कपातीची नोटिस लागली. राम एका विभागाचा सूपरवायजर होता. युंनियनने विरोध करून आंदोलन छेडले. कंपनीचे उत्पादन कमी होऊ लागले. त्याच्या हाताखालील माणसे असहकार करू लागली. व्यवस्थापनाने सर्व सूपरवायजर आणि अधिकारी यांची मिटिंग घेऊन परिस्थिती कठोरपणे हाताळण्याचा निर्णय घेतला. खास कारण असेल तरच अधिकारी वर्गाची रजा मंजूर केली जाईल असा धोरणात्मक निर्णय घेऊन प्रसंगी सर्वांनी मशीन चालवण्याचा आदेश काढला.

व्यवस्थापन आर्थिक स्थिती खराब असल्यामुळे देणीदारांची देणी देऊ शकत नव्हती, कच्चा माल आणू शकत नव्हती. त्यामुळे कामगार कमी करण्याशिवाय पर्याय नव्हता. कामगार आणि व्यवस्थापन यांच्यात समेट होण्याची चिन्हे दिसत नव्हती. साप्ताहिक सुटीत राम जाऊ शकत नव्हता ना तो सुटी घेऊ शकत होता. आई त्याला फोन वर वकील जो निरोप सांगे ते कळवीत होती. कंपनीतल्या परिस्थितीमुळे राम तीन महिने गावी जाऊ शकला नव्हता. कोर्टात तो वैद्यकीय सर्टिफिकेट देऊन

पुढील तारीख घ्यायचा. आता कोर्टाने शेवटची संधी दिली होती. साक्षी, पुरावे सादर करावयाचे होते. फक्त एक महिन्याचा कालावधी मिळाला होता. तो कामावरून संध्याकाळी तणाव परिस्थितीतच घरी आला. लक्ष्मीने वर्षभरात प्रथमच त्याला तणावपूर्ण पाहिले. तिला कारखान्याच्या परिस्थितीची कल्पना होती. तिने त्याला चहा पाणी देत विचारले “काय झाले आज? नेहमीसारखे दिसत नाही? “

“काय कळत नाही. काय करावे. कारखान्यातील तंटा काही मिटत नाही. कोर्टाची केस काही टाळता येत नाही. आतापर्यन्त कशीतरी केस तारीख घेऊन.......”राम

“मग आता काय करायचे? मी जाऊ का? काही मुद्दे मला सांगा मी सांगेन वकिलाला”

“तसे नाही आता. आपल्याला गावातील इतर बाधित लोकांना एकत्र करावे लागेल. हे करण्याकरिता तिथेच राहावे लागेल तर शक्य आहे.”रामने हे बोलून तिचा अंदाज घेतला. कंपनीची परिस्थिती ठीक नाही. दुसरी नोकरी करायची म्हटल्यास, शोधण्यास वेळ लागेल. नोकरी आणि शेती दोन्ही मुंबईत राहून नाही हाताळता येणार. त्यामुळे नोकरी सोडून घराची शेती, दुकान पहावे असे त्याच्या मनात घोळू लागले. ते लक्ष्मीला सांगायचे कसे, ती काय म्हणेल, तिचे आईवडील काय म्हणतील? हा प्रश्न सतावत होता.

“हे बघ लक्ष्मी आपल्याला एक प्रयत्न करावा लागेल. मी, आई आजारी आहे असे सांगून कंपनीला रजेचा अर्ज जवळच राहणाऱ्या सहकारी मित्रबरोबर पाठवतो. तिथे गेल्यावर मी ही आजारी आहे 15 दिवस वाढवून द्या असे कळवतो. बघू काय होते.”

“कुणी घरी आले तर? “लक्ष्मी

“सांग योग्य ते, बघू काय होते. “राम

रामने रजेचा अर्ज सहकारी मित्रामार्फत पाठवला. तो गावी निघून गेला. आपल्या नातेवाईक वकिलाशी चर्चा करून त्यांनी गावातील भिकु, गोविंद, केशव, पांडोबा इतर 10 लोकांना घरी बोलावले.त्यांचीही जमीन जाणार होती पण ते सदाशिवराव आमदाराबरोबर पंगा घेण्यास पुढे येत नव्हते, जे मिळेल ते घेऊन गप्प बसायचे असा विचार करीत होते. ते येण्या अगोदर आई आणि तो काय करायचे, पैसे कसे खर्चाला उभे करायचे याचा विचार करीत असताना आई म्हणाली, “अरे तू इथे किती दिवस राहणार? याला किती वेळ लागणार? जाऊ दे ना. आपले नशीब नाही म्हणून गप्प बसू.”

“नाही आई, अशी हार खाऊन चालणार नाही. त्याने त्याची जमीन वाचवली आणि दुसऱ्याच्या जमिनीवर नांगर फिरवतो आहे. कमी मोबदला देतो आहे.”राम

“अरे तो तर गावगुंडा आमदार आहे. तुला माहीत आहे ना त्याचे उद्योग. आपण कसे पुरे पडणार?’ आई

“आई सरकारला विकास करण्यासाठी जमीन देण्याचा प्रश्न नाही. पण हे पुढारी दुसऱ्याच्या जमिनीवर नांगर फिरवतात, स्वत:चे वाचवून संपत्तीत लोळतात. ह्यांना काय अधिकार आहे? नाही, आपण टक्कर द्यायची. आपल्या घराण्याचा इतिहास संस्कार तू आणि बाबांनी शिकवले ना? “राम

“हो. अरे पण गावातील बाधित लोक..........येतील का? ..........शेवटपर्यंत एकजूट राखतील का? “आई

“सर्वांना पैसे कसे द्यायचे ही भीती. कारण सर्वांची ऐपत नाही. बघू प्रयत्न करू. “राम

सर्व बाधित गावकरी घरी जमा झाले. रामने सरळ विषयाला हात घातला. त्याने प्रश्न रस्त्याला लागणारी जमीन देण्याचा नसून हे सदाशिवराव त्याची जमीन वाचवून आपली जमीन न विचारता, योग्य भाव न देता सरकारी प्लान मध्ये दाखवत आहे ह्या गोष्टीचा आहे. हा पुढारी आहे म्हणून काहीही निर्णय घायचा अधिकार त्याला कोणी दिला? हा विकासातून पैसा काढणार. कंत्राटे घेणार? हा अन्याय आपण का सहन करायचा? हे त्याने सर्वांना सांगितले.

“आर तू किती बी खरे बोलला तरी तो गुंड हाय. तुला माहित हाय नव्ह. विरोध करणाऱ्या स्त्रिया मुलींची,त्यांच्या भावांची अब्रूचे धिंडवडे काढून काय अवस्था त्याने केली? “भिकु

“होय म्हणून घाबरायचे? काहीही घ्यायचे? “राम

“तस नाय र. वकिलाची बी काय गारंटी? तो आपल्यासंग राहील? “गोविंद “पैका कोण देणार, कितीसा लागलं, किती काळ जाईल लढाईत?”

“वेळ जरी गेला तरी विजय आपलाच आहे. वकील नात्यातील आहे, तो दबणार नाही. मी बघेन. पैसे घेईल तो थोडे थोडे, देऊ आपण. आपली सैनिकी लढवय्या परंपरा आहे ना? हे पुढारी काय? एकजूट आपण राखली, अन्याय पेपरमध्ये दिला तर गप्प रहावेच लागेल.त्यांना निवडून यायचे आहे. आपण मात्र खचून धीर सोडता कामा नये.”राम

“म्या तयार आहे. पैका बी देईन थोडा थोडा हप्त्याने. माझ्या पोराला कळवतो अमेरिकेत “पांडोबा त्याच्या मुलाचे कौतुक करीत, मुलगा अमेरिकेत आहे तो करेल मदत हे आत्मविश्वासपूर्वक म्हणाला.

“आपण सुरू तर करू. हिम्मत दाखवू. “राम

सर्व रामला साथ देण्यास राजी झाले. एकजूट कुठल्याही परिस्थितीत ठेवायची, लोकांचा ही दबाव वाढवायचा पण सदाशिवरावाच्या गुंडगिरीला टक्कर द्यायची हा निश्चय केला. राम ने वकील मित्राला प्रत्येकाचे एफिडेविट बनविण्यास, सातबारा, जमीन किती जाणार, सर्व माहिती पुरविली. आईला पुढील तारखेस एक दोघांना घेऊन कोर्टात जाण्यास सांगितले. रामला तेव्हाढ्यात लक्ष्मीचा फोन आला. तिने कंपनीने रजा मंजूर केली नाही हे कळविले. राम गोंधळून गेला. आईला हे चेहऱ्यावरील भाव पाहून कळले. त्यांनी आईची समजूत काढली. तरी आई न राहवून म्हणाली,”अरे हे जमेल ना? तुझी नोकरी सांभाळून कसे करणार?”

“आई कंपनीसुद्धा आर्थिक कठीण परिस्थितीतून जात आहे. माणसे कमी करणार आहे. नोकरी सोडून शेती करू का ग? “राम

“तुझी बायको काय म्हणेल? सासरे काय म्हणतील? “आई

रामला ही काळजी होतीच लक्ष्मीला काय सांगायचे. सासरेबुवाना काय सांगायचे. तो मुंबईला आला. कंपनीत एक दिवस उशिरा आला. त्याला मॅनेजरने बोलावून जाब विचारला. कंपनीचे मालक तिथेच बसले होते.

“साहेब, आईला बरे नव्हते. आमच्या जमिनीचा प्रश्न होता. रस्ता रुंदीकरणात न विचारता स्थानिक आमदाराने जमीन........”राम

“ते काही असो. तुम्ही नोकरी करीत आहात. अशा लढाईला फार वेळ लागतो म्हणजे तुम्ही वरचेवर रजा घेणार. तुमचे वडील ही नाहीत. ते काही नाही जमणार” मालक “ह्यांचा राजीनामा घ्या आणि यांना मुक्त करा.”त्यांनी मॅनेजरला आदेश दिला

“सर सर मी कसे तरी सांभाळीन रजा न घेता. पण.... पण नोकरी राहू द्या....काही महिन्या पूर्वी लग्न झाले आहे...”राम गयावया करीत म्हणाला

“कंपनीची परिस्थिती तुम्ही बघत आहात. ते शक्य नाही “मालक

राम पुढे पर्याय नव्हता. मॅनेजर पुढे काही पर्याय नव्हता. रामने दिलेला राजीनामा ताबडतोब स्वीकारला गेला. लगेच त्याला त्याची कायदेशीर देय असलेली रक्कम चेकने दिली गेली. रामला मनातून घरी शेतीवर लक्ष केंद्रित करून पुढची वाटचाल

करावी असे वाटू लागले. नाहीतरी तो इथे भाड्याच्या खोलीत रहात होता त्यामुळे घर कोण बघेल याचा प्रश्न नव्हता.कंपनीचा ताण झेपाण्याच्या पलीकडील होता. त्याला कामगाराविरुद्ध तक्रार देऊन कायदेशीर कारवाईत भाग घ्यावा लागला असता. मालकाची पाऊले कंपनी बंद करण्याच्या दिशेने पडत होती. परंतु हे घरी लक्ष्मीला आणि सासऱ्यांना कसे सांगायचे हा प्रश्न होता. आईला तो अंदाज देऊन आला होता. ह्या विचारताच तो खंगलेल्या अवस्थेत घरी पोहचला. मनाचा ताण चेहऱ्यावर दिसत होता.

"एकदम थकल्या सारखे दिसता. काय झाले "लक्ष्मी

"सुटलो, जे व्हायचे तेच झाले. दैव हात धुवून मागे लागले. एका बरीने बरे झाले. हातात पैसे ही आलेत "राम

"म्हणजे कळले नाही "लक्ष्मी

"नोकरी सोडावी लागली. मालकाने कंपनी बंद करण्याच्या दिशेने पावले टाकायला सुरवात केली. माझ्या परिस्थितीचा फायदा घेऊन..............."राम "आता तुझ्या वडिलांना काय सांगू? "...."जाऊ दे आहे ते भोगायला पाहिजे "

"काळजी करू नका. जे होते ते चांगले असे म्हणून स्वीकारू. जाऊ गावाकडे. नाहीतरी कोर्ट कचेरी करता, शेतीकडे वेळ द्यावाच लागेल. आईंचे ही वय झाले त्यांना झेपणार नाही"  लक्ष्मी

"अग तुझे बाबा काय म्हणतील. आताच लग्न झाले....आणि नोकरी........शेतीत काय मिळणार? "राम

"सांगू खरे ते. काय पर्याय. मी करेन काही गावी. विलासभाऊची परीक्षा संपेल. ते आणि मी कम्प्युटर क्लास··· काही बघू. घरचे दुकान आहेच. तुम्ही शेतीमालाचे मार्केटिंग आणि शेती बघा."लक्ष्मी.

रामने चकमून लक्ष्मीकडे पाहिले. त्याने तिचा हात हातात घेत कपाळाला लावला. "मला वाटले नव्हते तू असा विचार करशील, साथ देशील"

"दुसरे काय आपल्या हातात? जे झाले ते झाले. पुढे जायचे हेच आपल्या हातात" लक्ष्मी. रामने तिला जवळ घेतले. दीर्घ श्वास घेत कपाळावर ओठ टेकवत " मी खरच भाग्यवान आहे."

राम सर्व सामान घेऊन गावी आला. प्रथम त्याने वकिलाला, गावातील लोकांना भेटून सर्व माहिती सांगितली. गावातील लोकांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. लक्ष्मीने सासुबाईंना धीर दिला.

"काय गो बाई तुझ्या नशिबी आल. लग्न होऊन वरिस झालं. कुठे जायला मिळालं नाय. आता रामची नोकरी.........आयुष्याशी जुगार..... झगडणे.."आई

"आपल्या हाती असत का काही? "लक्ष्मी

"तुझ्या वडिलांना काय वाटेल '? आई

“मी सगळं सांगितले आहे. त्यांचा पाठिंबा आहे. “लक्ष्मी

कोर्टाची तारीख लागली. सदाशिवराव त्याच्या लोकांबरोबर कोर्टात आला. त्याने रामकडे खुनशी नजरेने पाहत “काय रे! कोणाशी लढत घेतो आहेस माहीत हाय ना. मुंबईत नोकरी केली म्हणजे शहाणपण आल असं वाटत?”रामच्या शर्टाला पकडले.

“शर्ट सोड! जास्त सत्तेचा माज दाखवू नकोस.तुला काय वाटले आमच्या टाळूवरचे लोणी खायचे आहे, आम्ही तुझे ऐकू?”तुझी जमीन ही जाणार होती ती का नाही दिलीस.? “राम

“शेवटी जातीवर गेलास. माज आला आहे काय? सदाशिवराव

“ए sss जातीवर जाऊ नको. मी ही मराठा आहे. ते पण लढणाऱ्या कुळातला कष्टकरी. लुटारू नाही तुझ्यासारखा “राम

रामच्या बरोबर असलेले गावकरी पुढे सरसावले. पेपरमध्ये केसची बातमी मोठ्या मथळ्यात आली होती. त्यामुळे पत्रकार दूरदर्शन मंडळी झाडून कोर्टात हजर होती. त्यांनी हा प्रसंग टिपला. त्यांनी सदाशिवरावना घेरले. त्यांच्या वागण्यावर, बोलण्यावर प्रश्नांची सरबत्ती सुरू केली. सर्व प्रसंग कॅमेरात टिपला गेला. सदाशिवरावांच्या वकिलाने त्यांना बाजूला घेत कोर्टात घेऊन गेला म्हणून बाका प्रसंग टळला. कोर्टात उभय पक्षांची सुनावणी झाली. कोर्टाने प्लानवर तसेच सदाशिवरावावर टीका करीत कडक ताशेरे ओढले. राजकीय पुढारी किंवा गावकरी

भेदभाव करू नये असे सूचित केले. सर्व गावकरी यांच्याबरोबर चर्चा करून सर्व समान तोडगा काढावा. सर्वांना मोबदला एकाच भावाने मिळवा असे निर्देश दिले. सदाशिवरावाचा मुखभंग झाला. सर्व पेपरमध्ये टीव्ही चॅनलवर बातमी झळकली. सर्व थरातून टीका होऊ लागली त्यामुळे तो सूडाने पेटला. त्याने रामला अद्दल घडविण्याचा निर्णय घेतला. त्याने कृषि बाजार पेठेत त्याचा माल विक्रीस येऊ नये, त्याचा माल कुणी घेऊ नये असा बंदोबस्त केला. रामने खटल्यात त्याच्या बरोबर असणाऱ्या लोकांना बरोबर घेऊन शहरात गाडी घेऊन माल विकायचे ठरविले. प्रसंगी ओळखीने शहरातील सोसायट्यांमधून साखळी बांधायचे ठरविले.परंतु सदाशिवरावाचे प्रस्थ ठेचायचे हा निश्चय केला. आर्थिक परिस्थितीमुळे गावातील गोविंद यांनी शेती विकून मोलमजुरी करावी असे ठरविले. त्यांनी ज्यावेळी स्वत:च्या पसंतीने गिर्हाइक शोधले तेव्हा सदाशिवरावांनी त्याच्या माणसाकरवी बोलावून दम देण्यास सुरवात केली. गिर्हाइकाला ही त्यांनी दम दिला.

"गोविंद तू जमीन कुणाला विकलीस तर खबरददार. ती जमीन मला विक " सदाशिवराव "तू जर इतर कुणाला दिलीस तर..........."

"अहो तुम्ही जी किंमत देता ती कमी हाय! बाहेरचे जास्त देऊ करतात नव्ह. गरिबाचे नुकसान होत. "गोविंद

"तुला काय कळते? "सदाशिवराव "मी तुला देईन तेच घ्यावे लागेल "

गोविंद अस्वस्थ झाला. त्यांनी रामला संपूर्ण हकीकत सांगितली. राम प्रक्षुब्ध झाला. सदाशिवरावाचे हे अती झाले. माणसाला किती जमीन लागते शेवटाला?

किती लोभ? दहशत. गावकरी मंडळींना एकत्र करायचे लढा उभरायचे ठरविले. त्यांनी गोविंदची आणि गावकरी लोकांची समजूत काढली. एकी भंग होऊ देऊ नये असे सांगितले. गोविंद आणि गावकरी यांना आपण सर्व एकत्रित सहाय्य करून खबीरपणे उभे राहू. शेती जगली पाहिजे, गावाचे गावपण राहिले पाहिजे.नापीक जमिनीवर हवे ते प्रकल्प येऊ देत हे सरकार दरबारी पत्र व्यवहार प्रसंगी पेपरद्वारे कळवू. एकजुटीने प्रयत्न करण्याचे सर्वांनी ठरविले.

विलासचे शिक्षण पूर्ण झाले. तो उत्तम मार्कनी पास झाला. त्यानी वेगळी वाट चोखाळून अधिक संशोधन परदेशी जाऊन करावे असे ठरविले. त्याला पैसा लागणार होता. तो कसा उभा करायचा, घरचे किती मागे उभे राहतील हा ही प्रश्न होताच. इकडे राम आणि आईने विचार केला विलास ही नोकरी करून घराला हातभार लावेल. विलास घरी आला. सर्वांनी त्याचे कौतुक करून शेजारी पेढे वाटले.

“विलास आता कुठे नोकरी बघणार? कुठेही जा मी शेती बघीन. काळजी करू नकोस पण स्वत:च्या पायावर उभा रहा.”राम. आईने ही मान डोलावली. तिच्या डोळ्यात मुलगा शिकल्याचे आनंदाश्रू होते.

“आई, भाऊ मला अमेरिकेत जाऊन आणखी शिकायचे आहे “विलास

“अरे पण पैका किती लागेल, आपण तर……. कुठून उभे करायचे? आपल शेतीशिवाय काही नाय र “आई

“अग! दोन वर्षाचा प्रश्न आहे. तिकडे नोकरी करून तिथला खर्च भागवीन. तिथे नंतर नोकरी मिळेलच. पैसे पाठविन इथे. कर्ज फेडू” विलास “आपल्यातील एखादी एकर जमीन विकून........... बँकेचे लोन घेऊन........”

“हफ्ते कोण, कसे भरणार? “राम “अरे आपल्या शेतीमालाला विकताना त्रास होतोय. तो सदाशिवराव कोंडी करतोय. त्यालाच जमीन विकायची अशी दमबाजी करतोय”

“भाऊ अरे बघ ना. मला आत्मविश्वास आहे, मी यशस्वी होईन. आता पर्यन्त सांभाळले..फक्त दोन वर्ष....मी तिथे शिकता शिकता जास्त मेहनत करीन...कमी खर्चात भागवून तुम्हाला पैसे पाठविण्याचे प्रयत्न करेन. जाऊ दे ना. तीन महिन्यात अडमिशन घ्यायची आहे, पासपोर्ट सगळे करावे लागेल “विलास

आईला काय, कसे करावे सुचे ना. रामला, जमीन विकली तर त्याने लोकांना दिलेल्या शब्दांची, धीराची आठवण झाली. गावकरी काय म्हणतील? पुन्हा विश्वासघात केल्यासारखे होईल. ह्या विचारात तो घरात फेऱ्या मारीत असताना आईने सांगितले “राम माझे जे दागिने आहेत ते विकून टाक. बघ बँकेत लोन मिळते का? जाऊ दे. कळ काढू कशी तरी. त्याला मोठा होऊ दे. “

“अहो माझे ही दागिने घ्या. माझे बाबांशी बोलणे झाले आहे. माझे बाबा, भाऊ पैशाची मदत करीत आहेत. त्यांचेही मत आहे विलास भाऊ हुशार आहेत, जाऊ दे पुढे. पैसे होतील नंतर वसूल. गावातला मुलगा शिकतोय ना “लक्ष्मी

आईला लक्ष्मीचे हे रूप पाहून कौतुक वाटले. विलासही,वहिनीचे कुणालाही न विचारता केलेले काम, पाहून भारावून गेला.

“लक्ष्मी खरच आज तू पुन्हा माझ्या मागे, घरासाठी ठाम उभी राहिलीस.”रामच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले.

“वहिनी खरच मी ऋणी आहे. माझ्यात आता शिकण्यासाठी उर्मी, जिद्द आणखीन वाढली आहे. मी तुमची मदत त्याग वाया जाऊ देणार नाही. हे माझे वचन आहे “विलास

रामही आता सुखावला. राम, गावकरी लोकांनाही मोठ्या मनाने सांगता येईल, सदाशिवरावांचा त्रास चुकेल या भावनेने जास्त सुखावला. त्याने विलासला सर्व तऱ्हेने मदत करून त्याला अमेरिकेत पाठवून दिले.

विलासच्या संशोधनाचे अमेरिकेत भरपूर कौतुक झाले, मान सन्मान झाले. चांगली नोकरी तेथेच मिळाली. त्यानेही घरी पैसे पाठवायला सुरवात करून राम, आई, वहिनीला समारंभासाठी तिकीट पाठवून अमेरिका भेटीचे निमंत्रण दिले.आईने वडिलांच्या फोटो कडे बघत “बघा हो तुमच्या मुलाने नाव काढले. अमेरिका बघायला मिळते आहे..........तिच्या डोळ्यातून अश्रु वाहू लागले. रामने आणि लक्ष्मीने तिला जवळ जात सावरले

******************************

पुरुष उवाच दिवाळी अंक २०१६

# नाते माणुसकीचे

कोर्टामध्ये गर्दी खचाखच भरली होती. सरकारी वकिलाचा युक्तीवाद संपला होता. अविनाशची बाजू आता कोर्टासमोर मांडायची होती. तो आर्थिक परिस्थितीमुळे वकिल नेमू शकत नव्हता. न्यायाधीशांनी त्याला विचारले. ”तुझ्या बाजूंनी कोण वकिल आहे. तुझा बचाव कोण करणार आहे. तुला माहित आहे तुझ्यावर काय गंभीर आरोप आहेत? विनयभंग! रेल्वेचा नियम मोडून तू बायकांच्या डब्यात चढलास आणि महिलेशी असभ्यपणे बोललास. कळले? “

अविनाश “होय साहेब. अहो खरच तसे काही नाही. आरोप खोटे लावले आहेत. पोलिसांनी ह्या स्त्री आहेत व ह्यांची मैत्रीण यांनी धुमाकूळ घालून सहानुभूती निर्माण केली हीच बाब लक्षात घेतली. मी काहीही वावगे वागलो नाही, ना शिवीगाळ केली. मला हॉस्पिटल मध्ये कसा लवकर पोहचेन ही घाई होती. तसे काही झाले नाही.”तो काकुळतीला येऊन सांगत होता.

“मग काय तुला म्हणायचे आहे “न्यायाधीश

अविनाश गोंधळून गेला. डोळे बंद करून क्षणभर सुन्न अवस्थेत कपाळावर हात लावून पिंजऱ्याच्या कोपऱ्यात उभा राहिला.तेव्हढ्यात वकिलांच्या खुर्चीतून श्री संजय वकील उभे राहिले. त्यांनी न्यायाधीशा समोर विंगेत येऊन,"माय लॉर्ड मी यांचे वकील पत्र घेतो. मला अनुमती द्यावी ही विनंती."आपले वकीलपत्र पुढे करून सादर केले.

"अहो पण त्याला हे मान्य आहे का? त्याची सही लागेल. तुम्ही यांचे वकील पत्र घेता, तुम्हाला केस माहीत आहे का?"न्यायाधीश

"माय लॉर्ड हो! जेव्हा डोंबिविली स्टेशनला गाडी आल्यानंतर प्रत्यक्ष जो गोंधळ झाला तेव्हा मी ह्यांच्या( तक्रारदार महिलेकडे बोट दाखवत) बाजूच्या पुरुषांच्या फर्स्ट क्लास मध्येच होतो, उतरून लगेच पाहण्यास आलो. ही घटना ठाणे ते डोंबिविली ह्या दरम्यान घडत आली आहे. मी, माझे गाडीतील मित्र सर्व पहात होतो, सर्व ऐकत होतो."संजय "अविनाश तू काळजी करू नकोस. मी तुझ्या कडून काहीही फी किंवा अन्य पैसे घेणार नाही ही खात्री बाळग. तू माझ्यावर विश्वास ठेव तुला यातून नक्कीच सोडविन.तू फक्त सही कर.माझे गाडीतील मित्र तुझ्याबाजुने उभे रहातील."अविनाशने (आकाशाकडे वर बघत) मनातल्या मनात "स्वामी तुम्हीच धावून आलात म्हणून निभावले,"हात जोडून सही केली.

"माय लॉर्ड! केससाठी पुढील तारीख मिळावी ०मला माझ्या अशीलाशी बोलायचे आहे."

“माय लॉर्ड जास्त लांबची देऊ नये. माझ्या अशीलाला नेहमीच सुट्टी घेता येणार नाही.”सरकारी वकील

“माय लार्ड! माझ्या अशीलाला जामीन मिळावा. त्याचे वडील घरी आजारी आहेत. त्याला आता फक्त लहान बहीण आहे. घरामध्ये तोच आता आधार आहे. त्याच्या आईचे निधन झाले आहे त्या संदर्भात सर्व केसमध्ये येईलच. ह्याचा जामीनही मी भरतो.”

अविनाशला जामीन मिळाला, तो बाहेर आला. खरच आईचे आशिर्वाद आणि स्वामींची कृपा. माझी पुण्याई थोर म्हणून कुणाचीही ओळख नसताना कुणीतरी अनोळखी व्यक्ति उभी राहून मला सोडवते. म्हणजेच कुठेतरी माणुसकी, चांगली माणसे जगात आहेत ह्याचे प्रत्यंतर आले.

संजयने अविनाश कडून सर्व केसला लागणारी माहिती समजावून घेतली. जामीनाच्या काळात कुठेही वावगं वागू नको जेणे करून पुन्हा अडकशील असा सल्ला दिला. केसच्या तारखेला त्याने फक्त कौटुंबिक माहिती,रक्त आणण्यास कुठे गेला होता,गाडीत तो महिलांच्या डब्यात कसा चढला, पुढे काय घडले एव्हढेच संक्षिप्त वर्णन करण्यास सांगितले,

केसच्या तारखेस कोर्ट केस ऐकण्यास खचाखच भरले.ह्या केसबद्दल पेपर मधून बरीच प्रसिद्धी, लोकांच्या उलटसुलट प्रतिक्रिया प्रसिद्ध झाल्या होत्या. लोकांनाही

ह्या केसमध्ये काय होईल याची उत्सुकता होती. न्यायाधीश महोदयांनी संजयने दिलेले पेपर्स दाखल करून घेतले. संजयला केस पुढे सुरू करण्यास सांगितले.

संजयने अविनाशला घटंनेसंदर्भात खुलासेवार काय घडले हे सांगण्यास सांगितले. अविनाश सांगू लागला "पूर्वी ते मुंबईत म्हाडाच्या इमारतीत रहात होते परंतु चाळं पुनर्विकास योजनेखाली विकासकाने घेतली म्हणून पर्यायी घर भाड्याने घेऊन डोंबिवलीत तो आईवडील आणि लहान बहीण असे बैठ्या चाळीत राहू लागलेत.विकासक जो पर्यन्त भाडे देत होता तो पर्यन्त सर्व सुरळीत चालले. परंतु त्याने भाडे देणे बंद केले. पर्यायी जागा ही दिली नाही किंवा उरलेले पैसे ही मिळाले नाहीत, इमारतही का बांधत नाही ह्याचे उत्तर दिले नाही. कोर्टात जावे तर पैसे नाहीत निकाल केव्हा लागेल हे माहीत नाही. ह्या परिस्थितीत सर्व अडकले.वडील अगोदर ठाण्याला कंपनीत 20 वर्षे नोकरी करीत होते.तो अकरावीत, बहीण पाचवी इयत्तेत शिकत आहेत. वडिलांची कंपनी कामगार युंनियन तंट्यात बंद पडली. वडील कुठे दुकानात तर आई भाजी विकून घर चालवत होते. तो ही पेपर्स टाकीत असे, अभ्यास शाळा सांभाळून तो ही दुकानात बसू लागला. सणवाराला बनवलेले पदार्थ घरोघर विक्री करू लागला.वडिलांना जेव्हा हे कळले तेव्हा त्यांना शॉक बसला.पत्नीचे आजारपण कर्जबाजारीपणा इत्यादीने ते हैराण झाले होते. पत्नीचे निधन, मुलाची अवस्था पाहून त्यांनी आता काय होईल ह्यानी हाय खाल्ली. घर चालवण्यासही पैसे नाहीत. कोण किती उपयोगी पडणार.! आई चौकाच्या कडेला भाजी विक्री करीत असताना एका गाडीचा जोरदार धक्का बसला तेव्हा आईच्या पायाला आणि हाताला मोठी जखम झाली. त्यातच हॉस्पिटलमध्ये तिला हार्ट अटॅक आला.

डॉक्टरनी 10 लाख खर्च सांगितला. थोडे पैसे दानधर्म करणाऱ्या संस्थेकडून उभे केले, काही नातेवाइकांनी दिले, काही जो विकासक होता त्याला याचना करून पैसे उभे करून जसे जमेल तसे करू म्हणून परिस्थितीवर मात करण्याचे ठरविले. पुढे कसे घर चालवायचे हा काहीच विचार केला नाही. आईला ऑपरेशनसाठी तातडीने तीन तासात रक्त लागणार होते. म्हणून मी ठाण्याला ओळखीने रक्त पेढीत गेलो. वेळ थोडा होता. काही सुचत नव्हते.पैसे कुणीतरी भरले होते. मी रक्त घेऊन तसाच रिक्शा करून ठाणे स्टेशनला फलाटावर आलो.गाडी नुकतीच सुटली होती.मित्र कसाबसा डब्यात पटकन चढला.मी ही त्याच्यामागे धावत एका हातात बाटल्या घेऊन डबा पकडला.डबा कुठला आहे ही गोष्ट घाईत दोघांच्या लक्षात आली नाही. हॉस्पिटलमध्ये लवकर पोहचायचे होते.गाडी फलाट सोडून जोरात धावू लागली तसा दरवाज्यात एकच गलका झाला.शेजारी उभ्या असलेल्या मुली जोरजोरात बोलू लागल्या तेव्हा कुठे आमच्या लक्षात आले की आम्ही लेडीज फर्स्ट क्लासच्या डब्यात चढलो आहोत. फास्ट लोकल आहे. आता तर काहीच करता येणार नव्हते.कसे बसे माफी मागत होतो. ह्या ताई काहीबाही बोलू लागल्या”

“काय नालायक आहेत. साधे कळत नाही, डबा कुठला आहे.”

“ताई अहो माझी आई हॉस्पिटल मध्ये आहे तिला रक्ताची गरज आहे त्या चिंतेत आम्ही धावत गाडी पकडली. माफ करा.”

“आता तुम्ही खोटे बोलणार, चुकलं आहे म्हणजे सावरून घेतले पाहिजे.हेच तुमचे नखरे “

“नाही हो ताई. माझ्या आईची शप्पथ ती तिथे घटका मोजत आहे. तिला वेळेत रक्त नाही मिळाले तर काही खर नाही. अहो जरा परिस्थिती समजून घ्या, आम्ही एका बाजूला उभे रहातो तुम्हाला त्रास होणार नाही.”

“अग नीला, उषा जाऊ द्या ग.कशाला वाद घालत आहात.परिस्थिती समजून घ्या. सोडून द्या.”दोघी तिघी मध्यमवयाच्या बायका समजावण्याच्या प्रयत्न करू लागल्या. तरी त्यांचे भान सुटू लागले. स्त्रिया असूनही आई बहिणीवरून शिव्या देऊ लागल्या.मी आणि मित्रांनी काही मोठा गुन्हा केला नव्हता. हे खरे आहे की आम्ही चुकीच्या डब्यात चढलो ही आमची चूक होती. ह्या दोघी आमची परिस्थिती समजावून घेत नव्हत्या. म्हणून जरा आवाज चढवून बोललो.

“अहो ताई तुम्ही मर्यादा सोडत आहात. स्त्री असून तुम्ही घाणेरड्या शिव्या देत आहात. हे ठीक नाही. तुम्ही बहिणीसारख्या आहात.वाटल्यास डोंबिविली स्टेशनाला आम्हाला टीसीच्या ताब्यात द्या पण असे बोलू नका.”मी एव्हढेच बोललो. काय झाले कळले नाही. गाडी स्टेशनमध्ये शिरू लागली तसा यांना चेव आला. एकदम दोघींनी

“गद्धे की अवलाद. Xxxx xxx शरम नाही वाटत बोलायला”

माझा हात धरून बोलायला लागल्या. हातावर जोरात मारू लागल्यात. माझा मित्र सोडवत होता त्यालाही मारू लागल्या. शेजारच्या डब्यातील दोघे तिघे त्यांना समजावून सोडवू पाहत होते. ह्या कुणाच्या ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हत्या.त्यांनी जोरात हातातील छत्री माझ्या हातावर मारली त्यामुळे माझ्या हातातील रक्ताच्या

बाटल्या फलाटावर पडून फुटल्या.तेव्हा कुठे त्यांच्या लक्षात आले बाटल्या रक्ताच्या आहेत.बाकीच्या डब्यातील स्त्रियांनाही सत्य कळून चुकले त्यांनी हळहळ व्यक्त केली. निघून गेल्या. काही पुरुष मंडळी जमा झाली त्यांनी हे पाहिले. पोलिस येऊन आम्हाला घेऊन गेलेत.पोलिसांनी ह्या दोघींनी सांगितल्याप्रमाणे तक्रार लिहिली. आम्ही काय करणार? कुणीच पोलिस स्टेशनाला येऊन आमच्या बाजूने बोलले नाही. ना पोलिसांनी रक्त सांडल्याचा किंवा बाटल्या फुटल्याचा पंचनामा केला नाही. फक्त तुम्ही घटनेच्या ठिकाणी होता हे माझ्या मित्राने नंतर लॉकअप मधे सांगितले म्हणून कळले.मी चिंतेत होतो.मी पोलिसांना विनंती करून आधी हॉस्पिटल मधे जाऊन डॉक्टरांना रक्त नाही मिळाले हे कळवण्यास सांगितले. ही बातमी पेपरला आली तेव्हा घरी कळले. वडिलांनी धसका घेतला.पोलिस स्टेशनाच्या बाहेर स्त्री संघटनेच्या महिलांची गर्दी केली होती. काही पुरुष होते ते मोठमोठयाने घोषणा देत होते. घोषणा काय देत होते हे ऐकण्याच्या मनस्थितीत मी आणि मित्र नव्हतो.त्यांना कुणी बोलावले हे ही माहीत नव्हते. पोलिस मात्र नंतर येऊन म्हणाले,“काय करणार त्या दोघी मोठ्या राजकीय नेत्याच्या मुली होत्या त्यामुळे तक्रार लिहून घेणे भाग पडले. नाहीतर आमच्या नोकरीचा प्रश्न होता.”

कोर्टात हे वाक्य उच्चारताच क्षणभर सर्व अवाक झालेत. पोलिस इंस्पेक्टरचा चेहरा पडला.कोर्टाने गोंधळ पाहून शांत रहाण्याची आज्ञा दिली.अविनाशने निवेदन पुढे चालू केले.

“न्यायाधीश महोदय मी काय बोलणार.माझ्या आईला तर मी मुकलो आहे. हे दु:ख तर भरून येणार नाही. हे सगळे माझ्या विरुद्ध झाले का तर मी पुरुष आहे

म्हणून? माझी गरिबी म्हणून की या ताईंचे वडील, भाऊ पुढारी म्हणून? आमचे जीवन उध्वस्त झाले. ते कोण भरून देणार? आता माझ्या वडिलांना कोण उभे करणार?"अविनाशने निवेदन संपवले. त्याला असह्य झाले, रडू कोसळले.न्यायाधीशांनी त्याला खाली बसण्यास सांगून त्याला पाणी आणून देण्यास सांगितले. थोडावेळ शांत झाल्यावर कोर्टाचे कामकाज पुढे सुरू केले.

"माय लॉर्ड आरोपी भावनेशी खेळून प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करीत आहे. "सकारी वकील

संजय ह्या सरकारी वकिलाच्या वाक्यावर प्रक्षुब्ध झाला. त्याने कोर्टाला सांगितले.

"माय लॉर्ड तक्रारदारांने अजून कुठलेच पुरावे दिले नाहीत किंवा मी जे हॉस्पिटलचे पुरावे दाखल केले आहेत त्याचे खंडन ही केले नाही. मी तर म्हणतो त्यांच्याकडे पुरावेच नाहीत म्हणून ही केस बंद करावी."न्यायाधीश महोदयांनी सरकारी वकिलास निर्देश दिले.

"तक्रारदाराचे सरकारी वकील म्हणून तुमचे म्हणणे पुढील तारखेस सादर करा. नाहीतर योग्य तो निर्णय द्यावा लागेल."न्यायाधीश

"होय माय लॉर्ड प्रयत्न करतो" सरकारी वकील

सरकारी वकील नुसत्या तारखा घेत वेळ काढू लागले. दिवस सरत होते. अविनाश त्याच्याकडे कुटुंबाकडे समाजाची नजर,बोलणे ऐकून बेचैन होत होता.

त्यालाच सर्व गुन्हेगार ठरवत होते. मुलींच्या विरुद्ध कोणीच पुढे येत नव्हते.अविनाशची मानसिक स्थिती,घरचे वातावरण लक्षात घेऊन संजयने शेवटी कोर्टाला लिखित अर्ज देऊन कोर्टाचे लक्ष वेधले आणि तातडीने केस बोर्डावर घेण्यास सांगितली. तसेच अविनाशला निर्दोष जाहीर करीत जे नुकसान झाले आहे त्याची भरपाई सरकारी वकील यांनी त्यांच्या अशीलाकडून वसूल करून द्यावी त्याचप्रमाणे ज्या मुलींनी ही तक्रार दिली आहे त्यांनी भर कोर्टात अविनाशची माफी मागावी असे निर्देश ध्यावेत. अशी विनंती केली. कोर्टाने विनंती मान्य करीत पुढील तारीख देण्याचे निर्देश दिलेत.सरकारी वकीलाने त्यांचे म्हणणे लिखित स्वरुपात सादर करून पुरावे सादर करावेत.तक्रारदार मुलींना ही कोर्टात हजर रहावे असेही निर्देश दिले. कोर्टाचे पुढील तारखेचे पत्र संजय वकिलांना, सरकारी वकिलास देण्यास सांगून कोर्टकार्यालयाने ही पोस्टाने पाठविल्याचे पुरावे पुढील तारखेस सादर करावेत असेही निर्देश दिलेत.

ठरविलेल्या वेळी तारखेला कोर्टाचे पुढील कामकाज सुरू झाले. न्यायाधीश महोदयांनी कामकाज सुरु करताना जाहीर केले की त्यांच्यावर सरकारी वकीलांच्या अशिलाने त्यांच्या वडिलामार्फत दबाव आणण्याचा प्रयत्न केला.त्यांना ह्या केसाचा निकाल त्यांच्याबाजुने लागावा म्हणून मोह दाखविला. म्हणून ही केस ते पुढे चालवणार नाहीत. असे जरी असले तरी सरकारी वकीलाच्या अशिलाने जे कृत्य केले ते कधीही माफ करता येणार नाही. असे जर केले तर समाजमनावर विपरीत परिणाम होईल. ह्यामुळे पोलिसांनी त्या नेत्याविरुद्ध तक्रार नोंदवून त्यांच्या विरुद्ध कडक कारवाई सुरू करावी असा निर्देश देत आहे. ही केस पुढील न्यायपीठापुढे वर्ग

करीत असून पुढील तारीख लवकर निश्चित करावी असेही नमूद करीत आहे. भर कोर्टात काय होत आहे हे लोकांना, उपस्थित वकिलांना कळेनासे झाले. एकच गलका झाला. न्यायाधीश महोदयाने परिस्थिती शांत करण्याची ऑर्डर दिली. पुढील केसचे कामकाज सुरू करीत असल्याचे जाहीर केले.

अविनाश गोंधळून गेला. तो तर संजयकडे काय होणार याची विचारणा करू लागला. संजयने धीर देत काळजी न करण्याचे आश्वासन दिले. संजय घरी गेला तेव्हा त्याच्या घरी चार अनोळखी माणसे बाहेर उभी असलेली दिसली. त्यांला ह्या लोकांनी, केसचे वकीलपत्र सोडून दे, नाहीतर वाईट परिणाम होतील असे सांगितले. परिस्थितीचे भान ठेवून संजयने काही प्रतिक्रिया दिली नाही. ते लोक निघून गेलेत. संजयने कुठल्याही परिस्थितीत नमायचे नाही, अविनाशच्या बाजूने ठामपणे उभे रहायचे असा निश्चय केला. त्यांनी वकिल मित्रांना संघटित केले. कोर्टाच्या तारखेला आधी पोलिस स्टेशनवर जाऊन तक्रार दाखल केली त्याची प्रत कोर्टाला दाखविण्यासाठी घेतली. पोलिसांचे संरक्षण घेऊन कोर्टात आला. न्यायाधीशांनी कामकाज सुरू करीत सरकारी वकिलांनी पुरावे सादर करावेत, त्यांचे म्हणणे मांडावे असे निर्देश दिलेत. परंतु सरकारी वकिलांनी तसे करण्यास असमर्थता दर्शवली. कोर्टाने हा कोर्टाचा अवमान आहे त्यांना निर्णय घ्यावा लागेल असे निदर्शनास आणून दिले तरी पुढे काहीच निवेदन दिले नाही. हीच संधी साधून संजयने कोर्टापुढे त्यालाही धमकी दिल्याचे निवेदन दिले. त्यांनी कोर्टात त्याच्या तक्रारीची नोंद सादर केली. हे पाहताच कोर्टात परत गलका झाला. वकिलांनी एकत्र येऊन न्यायाधीशांना प्रकरण गंभीरपणे घेऊन ताबडतोब अविनाशच्या केसाचा निकाल लावून ह्या

धमकीची नोंद घेऊन कारवाई करावी असे निवेदन दिले.असे जर झाले नाहीत तर वकिलांना कोर्टाच्या कामकाजावर बहिष्कार टाकावा लागेल हे सांगितले. न्यायाधीशांनी परिस्थिती गंभीरपणे घेऊन, काहीच पुरावे येत नाहीत की सरकारी वकील त्यासंदर्भात काहीच बोलत नाहीत म्हणून निकालपत्र देण्याची घोषणा केली. कोर्ट सर्व अवलोकन करीत नोंद करीत आहे की “अविनाशने महिलांच्या डब्यात चढला म्हणून दंडाची रक्कम 1000 भरावी.विनयभंगाचा कुठलाच पुरावा नसल्यामुळे त्याला निर्दोषमुक्त करीत आहोत.मुलीचे वर्तन,कोर्टावर दबाव टाकण्याचा प्रकार, वकिलास धमकावणे ह्याची गंभीर नोंद घेत, मुलीला कोर्ट उठायच्या आत 5 लाख भरपाई अविनाशाला द्यावी तसेच सरकारी वकिलांनी मुलीविरुद्ध, तिच्या वडील, भाऊ, धमकावणारे साथीदार यांना अटक करून नवीन आरोपत्र दाखल करावे असे आदेश दिले.अविनाशच्या डोळयात एकीकडे निर्दोष सुटल्याचे आनंदाश्रू तर आईला गमवण्याचे दु:ख दुसरीकडे संजयने केलेली मदत याविषयी कृतज्ञता होती. सर्वत्र पेपरमध्ये संजयच्या हुशारीचे, धाडसाचे कौतुक होऊ लागले.

**********************

रणांगण दिवाळी अंक २०१७

# भोवरा

संध्याकाळ झाली होती. रस्त्यावर विचारत विचारत संजयने विनायकच्या डोंबिविलीच्या घरचा पत्ता शोधला. घराची बेल वाजवली. विनायकच्या बायकोने दार उघडले. तिने परिचय विचारला. विनायक घरात नुकताच आला होता. तो ही दरवाज्याजवळ आला.

"कोण आहे ग "

"अहो कुणी संजय म्हणून आले आहेत. "बायको

तेव्हढ्यात संजयने "काका मी संजय महाबळेश्वरला होतो..शिकत."

"अरे हो हो! किती बदलला आहेत तू. कसे आहे तुझे? झाले का शिक्षण? "विनायक

"हो काका झाले. आता मी चांगल्या कंपनीत सेल्स ऑफिसर म्हणून आहे. पगार 20000/- मिळतो. सगळे तुमच्या मुळे झाले."

"अरे कसले मी निमित्त होतो. सर्व तुझी जिद्ध आणि मेहनत. ये बस."त्याने मिठाईचा बॉक्स वहिनीच्या हातात ठेवला. सोफ्यावर बसला. विनायकची बायको स्वैपाकघरात गेली.

विनायक संजयच्या बदलाकडे बघत, डोळ्यासमोर जीवनाचा सर्व पट उभा राहिला.

विनायक तळोजाला जाण्यासाठी दिवा स्टेशन येथे उतरला. फलाट क्रमांक दोन वरुन जाऊ लागला. अचानक त्याला कुणी तरी हात धरून ओढत आहे, "साहेब" साहेब" असे हाक मारत आहे असे जाणवत होते. गर्दीमुळे थांबता येत नव्हते. हाक मारणारा कोण आहे हे गर्दीमुळे कळत नव्हते. अचानक तो पुलावर गर्दीतून त्याच्यासमोर येऊन उभा राहिला. "साहेब" !sss"साहेब" मी, मी संजय! तुम्ही ओळखले नाही का?"तो बोलू लागला. विनायक चालत होता तो बोलत होता

"अहो "! "अहो "!

घाई मध्ये काय करावे हे विनायकला कळत नव्हते. त्याला एका कंपनीत मित्राला भेटण्यासाठी जायचे होते. गाडी लागलेली होती. टाइमटेबल काढून दुसरी गाडी केव्हा आहे हे बघितले. ठरलेल्या वेळेत पोहचू शकत नव्हता. स्टेशन पासून पुढे रिक्षाने जावे लागते ती त्या ठिकाणी मिळणे ही अवघड. त्याने उशिरा येतो असे कळविण्यासाठी मित्राला फोन लावला असता "NOT Reachable"ऐकू आले.

चालत चालतच विनायकने “अरे मी आता घाईत आहे. तू कुठे राहतोस?”तसे त्याला पुलावर एका बाजूला घेऊन विचारले.

“मी पलीकडे कोपर रोडला, दोन दिवस झालेत येऊन, बूट पॉलिशवाल्याने सोय केली. झोपडीत राहतो.”संजय.

“अहो! मी संजय! तुम्ही कोल्हापूरला जाताना, सातारला हॉटेलमध्ये जेवायला उतरायचा. मी तेथे वेटर होतो. तुम्ही माझी चौकशी करीत होतात, “काय करतो, कुठे राहतो. पुढे शिकतो की नाही? “

विनायकला सर्व आठवले. तो कोल्हापूरला जात असताना हॉटेलमध्ये जेवण्यास उतरला होता तेव्हा सहज बोलायचे म्हणून मुलाची चौकशी केली. “अरे तू इथे कसा? “त्याला बाजूला घेत त्याने विचारले.

“काय सांगू साहेब? लय जग वंगाळ आहे. जगण्यासाठी वापरुन घेते. विरोध केला तर पोटची आई सुद्धा ऐकून घेत नाही.सारेच भोवऱ्यात गटांगळया खात होतो.पळून आलो मग काय. इथे फलाटावर झोपतो. भीक मागतो.”

विनायकला बोध होईना. संजय 8वी झालेला, “जग वंगाळ आहे बोलतो. अजून काही बघितले नाही. तोंडी मोठी वाक्ये?. 13-14 वयाचा.मुलाने ओळख ठेवली,हाक मारली. काय त्याच्या मनात खदखदत आहे हे जाणून घेण्यासाठी त्याला स्टेशनजवळ असलेल्या हॉटेलमध्ये घेऊन बसला.

“बोल काय खाणार? काळजी करू नको. इथे कसा? “

"दोन दिवस झाले येथे येऊन" संजय बोलू लागला,"शिकायचे होते म्हणून हॉटेलमध्ये नोकरी पत्करली. आईला मदत करू लागलो. कसच काय! नशिबाने पळायला लावले. बूट पॉलिशचे काम करण्यासाठी भीक मागून पैसे गोळा करीत आहे. त्या पैशातून सामान घेऊन येईन. एक भला माणूस म्हणाला, बस तू इथे. मी आहे.

"अरे तुझी आई घरी एकटी असेल. तिला कोण साथ देणार?"–मी

"पोटात वणवा पेटला की ते काय करायला लावते, काय दाखवते.....न बोललेले बरे. मला जगायच,शिकायचे आहे. जन्मदात्या आईने कसे जगवले, ती कशीही जगली तरी मला तिच्या पदराची, मायेची ऊब हवी, कशीबी असली तरी तिच्या डोळयात सुख पहाणार."विनायकला ह्या वयात एव्हढी पोक्त वाक्ये? नकळत त्याच्या पाठीवर हात ठेवून डोक्यावर हात फिरवला. त्याला ही कळले नाही ही भावना हातात कशी आली. तो संजयकडे बघतच होता.

संजयने उसासा सोडला. थोडा अस्वस्थ होत शून्यात बघत राहिला. डोळयात पाणी आणि त्या प्रतिबिंबात मनातले तरंग उमटू लागले........बांध फुटून वाहू लागला.

"अरे संजय बेटा" उर्मी, त्याची आई म्हणाली,"मी कामाला जाते.तू घरी जेवून अभ्यास कर. शाळेला जा बर! "उर्मी निघून गेली. उर्मी नवऱ्याच्या मूळ

घरापासून 10 कि.मी दूर शेतातील घर भाड्याने घेऊन रहात होती. तिला हे घर,ज्याने लग्न लावून दिले, त्यानेच उर्मी ची कहाणी ऐकल्यावर हे घर बघून दिले. उर्मीचे वय तसे 30 शीतले. दिसायला सावळी, बांधा छान आणि हसरी, हळू बोलणारी. चेहऱ्यावर परिस्थितीचे चटके, जेम तेम 7/8 वी झालेली. आईवडिलांनी 17व्या वर्षीच लग्न लावून दिले. उर्मी ला दोन बहिणी होत्या. वडील अशिक्षित, गावात कापडाच्या दुकानात काम करायचे. घरची परिस्थिति बेताची. परिचित मित्राने स्थळ सुचवलेले, हुंडा देणेघेणे काही नव्हते, मुलगा मुंबईला कारखान्यात काम करतो, शरीरयष्टी पैलवानाची, उंच आणि बीए झालेला, मुलगा वयाने मोठा असला तरी काय झाले? गावी घरची शेती आहे, कुटुंम्ब थोडे एकत्र असलेले. मुलाची मुंबईला नोकरी व्यतिरिक्त, 3 खोल्या भाड्याने दिलेल्या, एव्हढी माहिती. वडिलांनी फोटो आणि गावातले घर जाऊन बघितले. असे स्थळ दवडू नये असे उर्मीच्या आईवडिलांच्या मनात आले. तेही विश्वासू माणसाने सुचवलेले, पैसा नाही, जास्त माहिती काढावी कशी, मुंबईत ओळखीचे कुणी नाही. मित्र विश्वासाचा ह्या माहितीवर लग्न लावले. उर्मीने ज्या वेळी फक्त दाखवण्याचा कार्यक्रम झाला,साखर पुडा झाला,त्या दिवशी होणाऱ्या नवऱ्यास पाहिले. वडिलांना दु:ख नको असा विचार केला. साखर पुडा झाल्यानंतर एखाद्या सुट्टीत गावी आला की दोघे भेटायचे, नदी काठी, डोंगरावर फिरायला जायचे. त्याने दिलेल्या मोबाइल वर संभाषण व्हायचे. दोघांमध्ये 12 वर्षाचे अंतर होते. ह्या भेटीत फक्त त्याच्या 3 खोल्या दिवा मुंब्राच्या वेशीवर आहेत, एव्हढेच कळले. लग्नानंतर उर्मी मुंबईला राहू लागली. दिवस जात होते. नवरा कामावरून येत असे, येताना गजरा वेणी घेऊन येई. लग्नानंतर

उर्मी ठाणे येथील डोंगराच्या पायथ्याला दोन खोल्यांचे बैठे असलेल्या घरात रहात होती. घरात लहान मोरीशिवाय काही नव्हते. संडास सार्वजनिक, वस्तीच्या कोपऱ्यावर. पाणीसुद्धा सार्वजनिक नळावर भरायचे. वस्तीवर भांडणे तर रोजची असायची.कधी कधी तरुण मुली, बाया चांगल्या साड्या गजरे घालून बाहेर जाताना, रात्री कधी उशिरा येताना खिडकीतून बघायची. जगावेगळे, न ऐकलेले शब्द, संभाषण कानावर पडायचे. पण ती लक्ष द्यायची नाही. उर्मीने मुंबईत घराची किंमत जास्त, आपण नाही का लहान घरात राहून, सर्व नदीवर शेतावर उरकायचो असे मनाची समजूत काढून परिस्थितीशी जुळवून घेऊ लागली. देवावर श्रद्धा म्हणून देव घरात ठेवून पुजा करायची. न रहाहून एकदा म्हणाली

“अहो आपण आपल्या तीन घरातील एका घरी राहू. इथे वातावरण चांगले नाही.”उर्मी

“अग! कुठे आपल्याला जास्त काळ राहायचे? माझी कंपनी जवळ आहे. पैशाची बचत होते. दुसरी नोकरी शोधत आहे, बघू “

“एका खोलीचे भाडे मिळणार नाही असे समजू. दोन खोल्यांच्या भाड्यात आणि तुमच्या पगारात भागवू.”

“15000 पगार असला तरी कापून जाऊन हातात, 10000 येतो.”

“भाड्याचे?”उर्मीने विचारले पण बबन फोन आला म्हणून बाहेर गेला.पुन्हा घरात येऊन म्हणाला, ”कंपनीतून फोन आला. मी जातो कामावर”

“अहो तुमची दुसरी पाळी आहे ना? मी जेवण बनवते, जेवून जा “

“नको नको. मी बघीन कंपनीत. तू काळजी करू नको” उर्मीला विश्वास बसावा म्हणून तो महिन्याचे घर खर्चाचे पैसे हातात द्यायचा. कधी येताना भाजी, खाण्यासाठी वेफर्स चकली घेऊन यायचा.उर्मीलाही दिवस गेले होते. म्हणून तो तिला जपत असे. कधीमधी ती गावाकडे आईबाबांनाही भेटायला जात असे. तेथे गेली की सासुरवाडीस राहत असे. आईबाबांच्या घरी ही राही. दीर सासू तिचे आदरातिथ्य करीत असे. शेतीवाडीत बबनचाही हिस्सा होता असे तो सांगे. 2 भाऊ 2 बहिणी आणि आईवडील म्हातारे. बबन अधून मधून शेतीला पैसे पाठवायचा. त्याची शेती ही भाऊ पहायचे. घर तसे मोठे होते. वाटणी झालेली नव्हती. उर्मी गावी गेली की हा सुशीलाकडे येऊन राही. शेजारी कुणाला माहीत नसायचे. कामाकरिता बाहेर जातो असे शेजारी सांगायचा.

बबनने कुणाचा फोन होता हे सांगितले नाही. सुशीलाने फोन केला होता. ती बार मध्ये नर्तकी तर कधी वेटर म्हणून काम करत होती. आधी ती याच वस्तीत राहत होती. गौर वर्णाची, बोलण्यात गावंढळ. अहमदनगर जवळच्या खेड्यातून घरची परिस्थिती हलाख्याची, त्यातून भाऊ भावजयशी भांडण म्हणून मुंबईस नोकरी शोधत आली. सुरवातीला गावातील मैत्रिणीच्या घरी राहिली नंतर तिच्या ओळखीने दुसरीकडे राहू लागली. मैत्रीण कारखान्यात काम करायची. तीही भाड्याने राहत होती. चार घरची धुणीभांडी करून दिवस काढीत होती. एकदा एका घरी मालकीण नाही हे पाहून घर मालकाने नशेचा पदार्थ चहातून दिला. गोड गोड बोलत शुद्ध

हरपली तेव्हा सर्वस्व घेतले. वय तरुण त्यामुळे स्पर्श हवा हवा वाटू लागला. मालक वर पैसे जास्त देऊ लागला. हयातून तिला त्याने बारमध्ये काम केले तर जास्त पैसे मिळतात हा मंत्र दिला. त्यानेच ओळखीने बार मध्ये नोकरीस लावले. बबनही कधी मधी दारू पिण्यास जात असे तेथे ओळख झाली. ती ओळख बबनने वाढवली. त्यातून संबंध निर्माण होऊन मूल झाले. मूल मोठे होत होते, समजायला लागले होते. लग्न न होता झालेले मूल आणि तसेच राहणे. ती भाड्याच्या घरात दिव्याकडे राहत होती. सुशीलाला वस्तीत कुणकुण लागली की त्याचे अजून कुणा विवाहित स्त्रीशी संबंध असावेत. तिने बायकांचे टोमणे बोल ऐकले होते. येथील बायकांनी त्याला स्त्री बरोबर बऱ्याचवेळा पाहिलेलं होत. काय असावे हे कुणी सांगू शकत नव्हते. त्यामुळे तिला असुरक्षित वाटू लागले. हा पैसे देत नाही तर तोच तिच्याकडून पैसे घेतो, काय करतो हे सांगत नसे. लग्नाचे सांगावे तर लग्न करीत नाही. असे बरेच दिवस चालले होते. नवीन लग्न झालेले आहे हे कळले नाही. त्यादिवशी सुशीलाने एकदा काय ते सोक्ष मोक्ष लावायचा असे ठरविले. बबन घरी गेला तेव्हा सुशीला अस्वस्थ होती. तिला खुश करण्यासाठी गजरा आणि तिला आवडणारी जिलेबी मिठाई घेऊन गेला. बबन घरी येताच लहान मुलाने मिठी मारली. “बाबा काय आणले. पिशवी बघू ना.”असे म्हणून त्याने पिशवी हातात घेतली. बबन हात पाय धुवून सुशीलाजवळ गेला. प्रेमाने विचारपूस करू लागला. सुशीला मूल बाजूला आहे हे पाहून बाजूला झाली.

“सुशीले आज जेवायला चांगले कर हा. मी जिलेबी आणली आहे. “

“काय नको. आधी आपण लगीन केव्हा करणार ते सांगा. मला असे राहण्याचा कंटाळा आला आहे.”सुशीला

“अग हो! थांब थोडे. तुला घरी घेऊन कसे जायचे ह्याचा विचार करतो. घरी काय सांगू तुझ्याबद्दल हे कळत नाही. करू. सर्व ठीक होईल. तुला मी भेटत नाही का? मुलाकडे हव नको ते बघत नाही का? “

“हे बघा तुम्हाला मी दोन महिन्याची मुदत देते. त्यात नाही झाले तर मी तुमच्या गावी जाईन. पत्ता शोधायला वेळ लागत नाही.”सुशीला

“तू आधी तुझ्या गावी जा. आई भावाला भेटून ये. त्यांनाही कळले पाहिजे ना? “बबन म्हणाला.सुशीलालाही खरे वाटले. मुलगा बाहेर गेला आहे हे पाहून ती त्याला बिलगली.

“मला तुम्ही सारखे जवळ हवे. रात्री घर एकटे खाण्यास उठते. शेजारी ही वेगळया नजरेने बघत असतात.”बबन ही आवेगाने तिला जवळ ओढून विश्वास देऊ लागला. तेव्हढ्यात मुलगा घरात आला म्हणून दोघे बाजूला झाली. बबन जेवून कामावर जाण्यास निघाला. बाहेर पडताच त्याला सुशीलाच्या लग्नाच्या चिंतेने अस्वस्थ वाटू लागले.हा तिढा कसा सोडवायचा हे कळेना. दिवस चालले होते. मुदत जवळ येत चालली. सुशीला ही आता तिच्या जवळ राहण्याचा आग्रह करू लागली. तरी तो तिला हे मला कामावर जाण्यास लांब पडते म्हणून तिथेच राहणे चांगले

पटवून टाळू लागला. सुशीला अहमद्नगरला गेली तर काय करायचे. प्रसंग कसा हाताळायचा हा प्रश्न पडला.

घरी येताच उर्मीने हसून स्वागत केले. दरवाजा बंद करून त्याला बिलगली. बरेच दिवस ती दूर होती.

"अग केव्हा आलीस? अगोदर कळवले नाहीस? "

उर्मी छातीवर प्रेमाने मान घासत "तुमचं फोन लागत नव्हता. त्यातून डॉक्टर ने दिलेली गोड बातमी देऊन आश्चर्यचकित करावे असे वाटले. गावी डॉक्टरला आईबाबांनी दाखवले, टेस्ट केली, बाळाची वाढ चांगली होत आहे हे सांगितले"

.

बबन मात्र हू हू करत ऐकत होता. त्याला सुशीलाचा प्रश्न कसा सोडवायचा ही चिंता होती. कसा विश्वास बसावा हा विचार करीत असताना,पैसे देऊन वेळ मारून नेऊ हा पर्याय सुचला. त्याने वेळ मारून न्यायची ही शक्कल लढवली.त्याकरिता पैसे कसे उभे करायचे हा विचार करू लागला. नोकरी ही शिफ्ट मध्ये असल्याने रात्रीची शिफ्ट चांगली. काही वेळ झोप काढता येते आणि सहकारी यांच्याशिवाय कुणीच नसते. पोस्टिंग हे कुठेही असले तरी फॅक्टरीत सर्व ठिकाणी राऊंड मारावे लागतात. बबन कॉंट्रॅक्ट सेक्युर्टी मध्ये कामाला होता हे घरी कुणाला माहीत नव्हते. त्याने रात्रपाळी मागून घेतली. कंपनीचे आवार नीट न्याहाळले. कंपनी इंगिनीरिंग असल्यामुळे स्क्रॅप लोखंड मोकळ्या जागेत पडलेले असते. तसेच काही ठिकाणी प्रॉडक्शनला लागणारा मालही ठेवलेला असतो. फेन्सिंग्ला भिंतीवर तारा

बसवलेल्या असतात. कंपनीत कुठे काय आहे ह्याचा अंदाज घेतला. बबनने निश्चयं केला कंपनीचा माल विकून पैसे गोळा करायचे. स्क्रॅपवाला माल घेऊन जाताना वजनाचा काटा मारून तो पैसे घ्यायचा हे कुणाला माहीत नव्हते. बबनने आपल्या बोलण्यातून चांगली प्रामाणिक प्रतिमा निर्माण केली होती. त्यामुळे कुणी सहज आरोप करणार नाही ह्याची खात्री होती. त्याने सुटीच्या दिवशी किंवा इतर वेळी मध्यरात्री काही काळं ठरवून सहकारी झोपतात तेव्हा ते झोपलेले आहेत की नाही ह्याची खातरजमा केली. गेट ही नीट कुलूप लावून बंद केलेले होते. ही संधी साधून कंपनीतील वजनदार स्क्रॅप भिंतीवरून बाहेर टाकले ह्यात फेंसिंगची तार तर वाकलीच पण मोठा आवाज झाला. पाठीमागे डोंगर आणि झाडी असल्यामुळे कोणालाच कळले नाही. कंपनीचे गेट दुसऱ्याबाजुला कोपऱ्यावर होते. कंपनीत सुटी असल्यामुळे कामगार नव्हते. मागच्या बाजूला त्याने आपल्या मित्राला गाडी बोलावून ते उचलण्यास सांगितले. त्यांनी दुकानाचा जो पत्ता दिला त्यावर नेऊन देण्यास सांगितले. अंदाजे वजन माहीत असल्यामुळे त्याने थोडे पैसे दुकांनदाराकडून उचल म्हणून घेतले होते. बबनला मागील भाग सीसीटीव्ही कॅमेरात नोंद झालेला आहे ह्याची कल्पना नव्हती. सकाळी बबन ड्यूटि संपवून घरी गेला. नेहमी प्रमाणे तो दुपारी बाहेर जातो सांगून आधी दुकानदाराला माल मिळाला की नाही हे पाहून किती वजन झाले हे पाहिले. उरलेले पैसे घेऊन तो सुशिलेच्या घरी गेला. स्क्रॅपचे 25000/- मिळाले होते. त्याने त्यातील 20000/- सुशिलेला दिले आणि गावी जाऊन चांगला मुहूर्त महिन्यांनंतरचा बघ म्हणजे गावी जाऊन लग्न लावता येईल असे सांगितले. सुशीलाही खूप आनंदित झाली. तिने त्याला जेवायला केले. जेवण

झाल्यावर जायच्या आधी, मुलगा झोपला हे पाहून त्याने सुशिलेला जवळ घेतले. सुशीलाही खुश झाली होती. आज तिने बबनला अडवले नाही. तिलाही सुख हवे होते. बबन तिच्या सर्व अंगावरून हात फिरवू लागला. डोक्यावरुन हात फिरवताना सुशिलेला आश्वासक स्पर्श सुखावत होता. ती आणखीन मिठीत त्याला जवळ ओढू लागली. बबनचे लक्ष घड्याळाकडे गेले. घरी उर्मीही वाट बघत असेल. उशीर होईल. त्याने सुशिलेला कानाजवळ जाऊन हळूच पाळीला चावत “आता पुर. कामावर जायचे आहे.”तिनेही समजून घेतले. बबन घरी आला. उर्मी वाटच बघत होती. रात्रपाळी करावयाची असल्याने उर्मीला सांगून बिछान्यावर अंग टाकले तरी मनाला स्वस्थता नव्हती. सुशिलेची चिंता छळत होती. तिढा कसा सोडवायचा हे कळत नव्हते. दारावर टकटक झाली. चार वाजले होते. उर्मीने दार उघडले.

“बबन आहेत का घरी? कंपनीतून आलो आहोत.”बबनही जागा झाला.

“या या साहेब. बसा.बसा. चहा घेणार? ’ बबन “अग, चहा टाक लवकर. साळुंके साहेब आमचे प्रथमच आले आहेत.”बबनला ही आश्चर्य वाटले आज साहेब कसे घरी आले.

“नको नको. तुम्हाला साहेबांनी कंपनीत बोलावले आहे. चला लवकर जाऊ. तेथे गेल्यावर घेऊ चाय” साळुंकेंनी बायकोकडे बघून सांगितले. बबन कपडे घालून ती दोघे घराबाहेर पडली. उर्मीला काही कळेना आता का बोलावणे आले. तिने ही असेल काही म्हणून विचार केला नाही. कंपनीत चोरी झाली ह्याची बोंबाबोंब झाली होती. मॅनेजरने सीसीटीव्ही कॅमेरात असलेले चित्रण पाहिले, किती माल गेला

आहे, तिथे कोण कोण होते ही सर्व माहिती अगोदर पोलिस ठाण्यात जाऊन दिली होती. पोलिस ही कारखान्यात पंचनामा करण्यासाठी आले होते. बबनने हे जेव्हा पाहिले तेव्हा आता आपली काही धडकत नाही हे जाणले. पोलिसांनी त्याला मॅनेजरच्या खोलीत बोलावले आणि त्याच्या कडून जबाब घेऊ लागले तेव्हा त्याने हे नाकारले. त्याने मॅनेजरला सांगितले’ ”

“साहेब तुम्ही मला ओळखता. मी असा करेन का?. मी तर मेन गेट वर असतो. रात्री फक्त राऊंड घेतो” .

“मग तुझा फोटो कसा? पोलिस इंस्पेक्टर

“साहेब मी राऊंड घेत होतो तेव्हा तो आला असेल.”बबन

“मग तू वर चढून काय करीत होतास. ही तार कशी वाकली? “पोलिस इंस्पेक्टर

“मी राऊंड वर होतो. मला ती वाकलेली दिसली म्हणून मी वर चढलो.”बबन

“खरे बोल नाहीतर.............”पोलिस इंस्पेक्टरनी मारण्यासाठी हात वर केला.

सीसीटीव्ही फुटेज मध्ये बाहेरचा भाग, गाडी, तिचा नंबर, ड्रायव्हरचा फोटो ही आला होता. बबनला माहीत नव्हते की पोलिसांनी टेम्पो गाडी, ड्रायव्हर माल कुठे

गेला हे सर्व अगोदर शोधले आहे. त्यांना पोलिसांनी पकडून कंपनीत आणले होते. त्यांना दुसऱ्या केबिन मध्ये लपवून ठेवले होते.

पोलिस इंस्पेक्टरनी त्याची कॉलर पकडली आणि शिवी हासडून जोरदार कानाखाली मारली. त्यांनी आपल्या सहकारी लोकांना बोलावून सर्व लोकांना मॅनेजरच्या रूम मध्ये घेऊन या असे सांगितले. ते सर्व आत आले.

“आता बोल, हे होते ना? ह्यांनाच तू बरोबर घेऊन माल नेऊन दिलास ना? ह्या स्क्रॅपवाल्याला माल विकलास ना?”इंस्पेक्टरनी पुन्हा जोरदार त्याच्या कानाखाली मारली. बबन आता उघडा पडला होता. त्याला कबुल करण्यावाचून पर्याय नव्हता. पोलिसांनी त्यासंबंधी रीपोर्ट बनवून पोलिस स्टेशन मध्ये FIR नोंदवून चोरीचा गुन्हा नोंदवला त्याला अटक केली. बबन पोलिसांना गयावया करू लागला. रात्र फार झाली. उर्मी घरी बबन का नाही आला ह्या काळजीने वाट बघत होती. तिने फोन केला तरी फोन लागत नव्हता. पोलिस स्टेशन मधून पोलिस रात्री घरी आलेत. बबनने चोरी केली म्हणून त्याला अटक झाल्याची माहिती सांगितली. हे ऐकताच ती भितीने कावरी बावरी झाली. रात्रभर एकटीच घरी होती. सकाळी सर्व वस्तीला कळले, पेपर मध्ये बातमी आली, चर्चा सुरू झाली. शेजारी बायका काय झाले म्हणून घरी विचारायला आल्या तेव्हा त्यातील दोघीजणी तिला म्हणाल्या, “तुम्ही नवीन. ओळख नाही म्हणून जास्त बोलता आले नाही. लग्ना आधी चौकशी केली होती का?

"अहो अगोदरही त्याचे एक लग्न झाले आहे. ती सुशीला तिच्या बरोबर ह्याचे लफडे होते. पूर्वी ती इथेच रहायची. आता ती कुठे राहते, काय करते, माहीत नाही."

"आमच्या ह्यांच्या कंपनीत ही फार पूर्वी तो कामाला होता. एका विवाहित, मुलगा असलेल्या, बाई बरोबर ह्याचे संबंध होते. ती दिवा का मुंब्रा येथे राहते.ती कंपनीत सेकुरिटी गार्ड अशी काम करीत होती. बबन ही पूर्वी तेथे काम करायचे. "

उर्मी ला काही बोध होत नव्हता. ती भयभीत झाली. म्हणजे ह्यांचे किती बायकांशी लफडे होते याचा अंदाज येई ना. ती पोलिस स्टेशनला गेली. काय झाले, कसे झाले, माहिती जाणून घेऊ लागली. पोलिसांनी तिला सर्व माहिती सांगत असताना, सुशीला तेथे आली. तिनेही पेपर मध्ये ही बातमी वाचली होती. त्या वस्तीवर ही चर्चा सुरू झालेली होती. सुशीलाने पोलिसांना विचारले, "अहो बबन कुठे आहे? काय झाले? खरे आहे का हे?

"तुम्ही कोण? तुमचं काय संबंध?"पोलिस चक्रावले. उर्मी कडे बघू लागले.

"अहो हा माझा होणारा नवरा आहे. आम्ही दोघे बरेच वर्ष एकत्र राहत होतो. त्याच्या पासून हे बघा मूल आहे मला."सुशीला.

"पुरावा काय? काय तरी काय बोलता? त्यांची बायको येथे आहे."पोलिस "ह्या काय इथे बसल्या आहेत."सुशीलाने तिच्याकडे आश्चर्याने पाहिले.

“अहो आम्ही आता लग्न करणार होतो. इतके वर्ष आम्ही असेच राहत होतो. आमची ओळख बार मध्ये हे यायचे तेव्हा पासूनची आहे.”सुशीला

“तुम्ही दिवा येथे कसे राहता? “पोलिस “पूर्वी कुठे रहायचा?”

“अहो मी बार मध्ये काम करते. पूर्वी मी ठाण्यात डोंगऱ्याच्या पायथ्याला असलेल्या वस्तीत रहायचे. मुंब्रा जवळ नवीन बार मध्ये नोकरी मिळाली. म्हणून मी दिवा येथे घर घेतले. तेथून बार जवळ पडतो. “सुशीला

“हे मूल त्याचेच कशावरून?”पोलिस प्रश्नांचा मारा करू लागले. उर्मी शांतपणे सर्व ऐकत होती. ती ताण असह्य होऊन अस्वस्थ होत होती.

“हा बघा मुलाच्या जन्माचा दाखला. त्यावर त्याचे नाव आहे. हा हा फोटो त्याने जन्म झाल्यावर, काढलेला. बाळाला घेतलेला आम्हा तिघांचा फोटो “सुशीला.

पोलिस चक्राऊन गेले. हे काय लफडे आहे? उर्मी तर फार हादरून गेली. तिला भोवळ आली. पोलिसांनी ताबडतोब स्त्री पोलिसांच्या मदतीने बाजूला घेऊन लिंबूपाणी दिले. तिच्या वस्तीवर पोलिस पाठवून शेजारील माणसांना बोलावून घेतले. खरे खोटे जाणून घेतले. शेजारी सुद्धा उर्मी ही आताच सहा महीने त्याच्या बरोबर लग्न होऊन वस्तीवर राहत आहे. हे कबूल केले. सुशीला ही अगोदर या वस्तीवर राहत होती हे मान्य केले.

सुशीला आणि उर्मी समोरा समोर आल्या. उर्मीने लग्न पत्रिका, कुटुंबाचे फोटो पोलिसांना दाखवले. दोघींना काय बोलावे हे कळेना.

"अहो दादा हे बघा काल त्याने मला 20000/- लग्नासाठी आणून दिले आणि मला गावी जाऊन आईबाबाशी बोलून लग्नाचा मुहूर्त काढ असे सांगितले. मी दोन दिवसात जाणार होते. आज पेपर मध्ये वाचले तेव्हा हे खरे खोटे करण्यासाठी येथे धावून आले. "सुशीला

"पोलिसांनी सुशिलेला त्यांनी भंगारचे पैसे तिला दिले आहेत हे कबूल केलेले आहे. तशी लिखित कबुली दिलेला FIR दाखविला. हे सर्व ज्याच्याकडे माल विकला त्याने, टेम्पोवाल्याने सर्वांनी हा माल त्यांना विकला हे लिखित सांगितले आहे. पुरावे दाखवले."सुशीला हबकली.

तिला बबनचे" तुझ्याशी लग्न करायचे हे घरी कसे सांगू? अजून ठरवले नाही.तो पर्यन्त तू अहमद्नगरला गावी जाऊन मुहूर्त काढ" ह्या वाक्याचा संदर्भ लागला.

"दादा आता काय करायचे "सुशीला

"जा वकिलाकडे आणि जामीनासाठी कोर्टात अर्ज करा. आम्ही केस दाखल केली आहे ती बोर्डावर येईल दोन तीन दिवसात "पोलिस

उर्मी पोलिसांच्या परवांगीने बबनला भेटली. तिने "तुम्ही हे काय केले माझ्याबरोबर? का माझ्या आयुष्याशी खेळला? "बबनला काय उत्तर द्यावे हे कळत

नव्हते. तेव्हढ्यात सुशीला आली. तिने तर बार मधे वापरल्या जाणाऱ्या शिव्यांनी लाखोली वाहिली. स्वत:ची चप्पल काढून मारली.

"मरने दो ईसीको. मरने के बाद गिधाडोंको खिलाओ."सुशीला पोलिसांना जाऊन म्हणाली. निघून गेली.

उर्मीला हे सर्व नवीन होते. मुंबई किंवा ठाणे येथील काहीच माहिती नव्हती. तिला आपण भोवरा हून फिरत आहोत असे वाटू लागले. परीघ मात्र दिसत नव्हता. समोर काय काय उभे राहणार हे कळत नव्हते. ती घरी आली तिने वडिलांना फोन लावला. वडील ही हादरले बबनला अटक झाली ऐकून. उर्मीने बबन ची इतर लफडी लपवून ठेवली. आता पुढे काय करायचे हे गावीच जाऊन ठरवू असे ठरवून ती ब्यागा भरू लागली. बबनने घर खर्चाला पैसे दिले होते म्हणून जाण्याचा खर्च सुटला, पुढचे पुढे बघू. असे ठरवून गावी आली.

"बाबा तुम्ही ज्यांनी हे लग्न लावले त्यांच्या कानावर घाला."उर्मीने एव्हढेच सांगितले. उर्मीला सहावा महिना होता. आता पुढे काय होणार याची काळजी लागली.

उर्मीची आई हाय खाऊन आजारी झाली. वडील धक्याने खचले. काय करावे ते सुचेना. उर्मीच्या बाबाने त्यांचे मित्र रमेश यांना घरी बोलावून सर्व घटना कानावर घातली. रमेश ही हादरले. हा माणूस असा निघेल असे माहीत नव्हते. उर्मी घरी गावी आली. आईची अवस्था पाहून ती ही हादरली. तरी आल्या प्रसंगाला तोंड देणे आवश्यक आहे. त्यातून 6 महिन्याचे मूल पोटात आहे. त्यावर परिणाम होता कामा

नये. तिने आता बबनशी कधीच संबंध ठेवायचे नाहीत असा निर्णय घेतला. परंतु बबनच्या घरी जाऊन राहण्याची व्यवस्था होते का, बघायला हवी किंवा सासुरवाडीच्या आधाराने काही होते का ह्याचाही अंदाज घ्यावा असे मनात आले. नीट सविस्तर बोलता यावे म्हणून ती रमेशकाका यांना भेटायला त्यांच्या घरी गेली. आईबाबांना फक्त चोरीची केसच्या व्यतिरिक्त बाकी काही सांगितले नव्हते, हे रमेशना स्पष्ट केले. त्यांना मी आता काय सांगते हे कळता कामा नये हे ही सांगितले. उर्मीच्या पोटी मूल वाढत आहे हे त्यांना माहीत होते. उर्मीने रमेशकाकांना त्याच्या बायकांच्या लफड्याविषयी सर्व कहाणी सांगितली. रमेशही चक्रावून गेला. हे फक्त आईबाबांना कळता कामा नये अशी अट पुन्हा घातली. रमेश उर्मीला घेऊन आपल्या नात्यातील वकिलाकडे गेला. वकिलाने ह्या परिस्थितीत गोड बोलून त्याची जमीन किती आहे, नावावर आहे का ही माहिति काढायला सांगितली. म्हणजे मालकी हक्काच्या वाट्यासाठी दावा लावता येईल. केसला फार वेळ लागतो. लढण्यासाठी जिद्द, संयम हवा हे सांगितले. पैसे आधी थोडे घेईन पण रमेश मध्ये आहेत तर थोडे थोडे ध्या. पण तुम्ही कच खाता कामा नये. हे उर्मीला सांगितले. उर्मीनेही मनोमन निश्चय केला. काहीही झाले तरी हार पत्करायची नाही. बबनच्या मालकी हक्काच्या जागेवर/वाट्यात दावा सांगायचा हे मनोमन ठरविले. रमेश आणि ती सासूच्या घरी गेली. नेहमी एकटी येणारी, आज रमेश बरोबर आलेली पाहून, सासू सासरे भाऊ आश्चर्यचकित झाले. त्यांना ही बबनच्या मित्राने फोन करून सर्व पेपर मधील घटना सांगितली होती. त्याची बायकांची लफडी ही कानावर घातली होती.

सर्व मालकीची जमीन अजून सासू सासरे यांच्या नावावर होती. वाटणी झाली नव्हती.

“सासूबाई, बबनने मला धोका दिला.”उर्मी

“काय झाले असे? “सासू. तिने पेपर मधील बातमी आणि पोलिस तक्रारीची छाया प्रत त्यांच्यासमोर टाकली. “हे बघा. त्याने चोरी केली असती तरी मी घटना पचवली असती. पण त्याचे संबंध? हे मी कसे पचवू. मला आता आधार हवा आहे तो तुम्हीच आहात “उर्मी

“अग हे सर्व माझ्या कानावर फार पूर्वीच आले होते. “सासू

“तरी तुम्ही हे लपवून... मला फसवलेत? काय मिळाले तुम्हाला? “उर्मी

“अग हे सर्व तुमचे लग्न झाल्यावर कळले. मी काय करू? “सासू

“आता माझ्या मुलाची माझी जबाबदारी कोण घेणार? मला घरात राहू द्यात. वारसा हक्काचे काही मला देऊन काही सोय करा. पोटात वाढणाऱ्या तुमच्या नातवाची सोय करा.”उर्मी

“ती सुशीला ही इथे आली होती. ती ही गळ्यात पडत होती. हे बघ आम्ही आता हे लफडे सहन करू शकत नाही. आम्ही त्याच्याशी संबंध तोडले आहेत. वारसा हक्काचे त्याला काही देणार नाही. आम्ही जीवंत असे पर्यन्त कुणाच्या नावावर करणार नाही.”सासू

"अहो सासूबाई! मी त्यांची लग्नाची बायको आहे. तुमची सून आहे. अहो! लग्न सर्वांच्या समोर विधिव्रत झाले आहे."उर्मी

"असू दे ना. तुला हवे तर, त्यांनी शेतीला जे आजवर पैसे दिलेत ते काही पैसे देऊ. हिस्शातले काही मिळणार नाही."सासू "अहो त्याने आता पर्यन्त मला माहीत आहे त्याप्रमाणे 3 लाख दिलेत ते देऊन टाकू. हवे तर 2 आपल्याकडून देऊ "सासू नवऱ्याला म्हणाली. उर्मी कडे पाहून

"तुला हे चालेल का? कारण तुझे लग्न माझ्या समोर झालेले आहे. म्हणून हे मला आता करावेसे वाटते. ह्यावर मी काही करू शकणार नाही."सासूच्या पुढे कुणीच काही बोलत नव्हते.

"त्यांनी किती दिले हे मला माहीत नाही. त्यांनी काय होणार? माझे संपूर्ण आयुष्य पुढे आहे. मी कशी राहू?"उर्मी

उर्मीने रमेशकाकाकडे बघितले. त्याने डोळ्याने आता तू घे असे सुचवले. उर्मीने सासूने दिलेले 5 लाख रुपये घेतले. सासूने हे होणार असे गृहीत धरून आधीच पैसे आणून ठेवले असावेत असे वाटले. गपचूप घरी आली. रमेशकाकाने कायद्याची लढाई फार काळ चालणारी असते. पण हक्क शाबूत ठेवावा, मागणी लावून धरावी, काहींना काही मिळेल, असे सुचवले.उर्मीने रमेशकाकाचे ऐकायचे ठरविले. ती घरी आली. आईला बाबांना काही तरी वेगळे घडत आहे याची शंका येत होती. शेवटी उर्मीने आई बाबांना सर्व खरे सांगितले. आईला तर शॉक बसला. काही काळाने आईबाबा ह्या धक्क्याने मृत्यू पावले. उर्मी आणि बहिणी उघड्या पडल्या. बहिणी

मामा कडे राहण्यास गेल्या. सासुसासरे ह्यांच्या विरोधात कोर्टात वारसा हक्काचा दावा लावला. हे घर भाड्याने काही तर आधार असावा म्हणून घर भाड्याने द्यायचे ठरविले. उर्मी, रामेशकाकाने त्यांच्या ओळखीने दाखवलेल्या, सरपंचाच्याशी बोलून, भाडे ठरवून, शेतावरच्या घरात राहू लागली. कोर्टाच्या केससाठी गावातच राहणे आवश्यक होते. संजय मोठा होऊ लागला. शाळेत जाऊ लागला.

उर्मी काही तरी करून पोट भरावे म्हणून कुणाच्या शेतावर जा, उस काप तर कधी लोकांची भांडी घास तर कधी लोकांच्या घरी कार्याला जाऊन स्वैपाक,भांडी घासणे असे करीत होती. संजयला ती घरात ठेवून शेजारी सरपंचांच्या बायकोला सांगून जात असे. घरामध्ये आंबेडकर,शिवाजीचे फोटो भिंतीवर होते. कदाचित घर मालकाने आधीच लावून ठेवले असतील. संजय एकटा असला की फोटो कडे टक लावून बघत बसे. आपण ही ह्यांच्यासारखे मोठे व्हायचे. आईला सुखात ठेवायचे. त्याला नेहमी प्रश्न सतावत होता,"आपले वडील कोण, कुठे आहेत?"काहीच कळत नव्हते कुणीच सांगत नव्हते.वडिलांना कधीच पाहिले नाही. आईला विचारले तर ती टाळत होती.

"तुला सर्व मिळते ना? मग कशाला चिंता करतो? शिक मोठा हो! मी आहे पैसे द्यायला."वय कळण्यापलीकडले, स्वप्नात रमणारे, ना कुणाचे बोलणे कळणारे.घर मालक शेजारीच राहत होते त्यांच्या घरातून तो थोरा मोठ्यांची असलेली पुस्तके आणून वाचण्याचा प्रयत्न करीत असे. कधी पेपरमधील बातम्या वाचीत असे. उत्सव असला की मालकाच्या अंगणातील लहानश्या देवळात कीर्तन ऐकायला बसे. शाळेत नेहमी प्रार्थना झाली की मास्तर प्रत्येक मुलाला त्याने काय

वाचले किंवा वर्तमान पत्रातील बातमी सांगण्यासाठी आग्रह करीत. संजय हा नेहमीच पुढे असे त्यामुळे शिक्षकांचा तो आवडता होता.तो जो वाचे तेच सांगत असे.

मालक शेतावर पाणी सुरू करून घरी आला. संजय घरात जेवण घेत होता.”काय रे आई गेली का कामाला?

“होय! आताशी गेली हाय. काका मी घरी पेपर दिले हायेत “

“अरे हो रे कळले. शाळेला जा बर. अभ्यास कर. काळजी नको मी हाय तुझ्या मागे. तुला काय बी लागलं तर मी देईन. पण शिक चांगला मोठा हो.!

संजयला मालक नेहमीच प्रोहत्सान देत असे. मालक 42 शी तला दिसायला चांगला, शेतीवाला होता. गावचा सरपंच होता. घरी बायको आणि दोन मुले साधारण 14-18 वर्षाची शाळा कॉलेज मध्ये शिकणारी. उर्मीला दिलेले घर मालकाच्या पुढे दाट ऊसाच्या, भाजीपाला, पेरूचिकूच्या शेतात पलीकडील कोपऱ्यात होते. त्यामुळे कोठेही जायचे झाले तर शेताला वळसा घालून जावे लागे. वस्ती ही घरा पासून लांब. संजय जेव्हा जेव्हा पेपर घेण्यास घरी जाई तेव्हा तेव्हा मालकाची बायको, मुलांना सांगे,“बघा पोरांनो! कसा अभ्यास करतो, नाहीतर तुम्ही. सर्व मिळून सुद्धा बोंब.”मालकाची बायको तशी श्रीमंतीच्या तोऱ्यात वावरायची पण मालकापुढे खास नव्हती.

संजयने निश्चय केला आपला बाप कोण, आपण असे का एकटे राहतो हे आईकडून जाणून घ्यायचे. संध्याकाळी जेवण झाल्यावर संजय आईच्या खुशीत शिरला. उर्मी त्याला थोपटू लागली. डोळ्यात पाणी, तोंडातून शब्द बाहेर पडले,

"दुर्दैवाचे फेरे चुकवित, मार्ग चालीते मी एक शापित" डोळ्यातील थेंब संजयच्या गालावर पडला. तो ताडकन उठला.

"आई काय झाले. ए सांग ना "संजय

"काय सांगू. आपले भोग "

"काय झाले मी तुझा मुलगा आहे ना? मला नाही सांगणार. मी लहान असलो म्हणून काय झाले. "संजय, "माझे बाबा कुठे आहेत? बोल ना?

"अरे काय सांगू. नशीब आपले, भोग दुसरे काय. सहन होत नाही किती दिवस स्वत:ला जाळून घ्यायचे, भोवऱ्यातून कसे बाहेर पडायचे"

"आई काय बोलते मला समजेल असे सांग ना" संजय

"अरे तुझा बाप सैतान निघाला. तीन बायकांशी संबंध ठेवलेत. मुले जन्माला घातली. चोरी खुनाच्या मामल्यात तुरुंगात खडी फोडत बसला "

"त्या दोघी कुठे आहेत? कुठे राहतात."संजय

उर्मीने कोठे आहे हे सांगितले नाही. खोटेच सांगितले. "त्याने दोघींचा खून केला "

संजय हादरला. आईला मिठी मारून, “मी आहे, काळजी करू नको. मी खूप शिकेन. मोठा होईन. तुला संभाळीन” असे गद्गदल्या स्वरात सांगू लागला. उर्मी त्याला थोपटवत त्याला झोपवून स्वत: लाइट घालवून झोपली. तिला झोप लागत नव्हती. भोवरा साखी फिरत आहे असे वाटे. बाहेर चपलांचा आवाज ऐकला. तिला संशय आला आपले बोलणे कोणी ऐकले असेल काय? कधी कधी तिला घर मालकाची नजर वाईट आहे असे वाटत होते. ती निर्णयाप्रत येत नव्हती. कदाचित मन उद्ध्वस्त झालेले, पोळले आहे म्हणून वाटत असेल. उर्मीने ओळखीने जवळच असलेल्या कारखान्यात पॅकिंगची नोकरी बघितली होती तिथे कामाला जात असल्यामुळे संजय करिता वेळ देता येत होता. घरी बसून काही काम करता आले तर ते ही करीत होती. तिला लोकांची धुनी भांडी, शेतावरची कामे करून कंटाळा आला होता. शारीरिक, मानसिक, त्यातच एकटेपणाचा त्रास, जीव घुसमटत होता. संध्याकाळी ती एकटीच घरी असायची. आईला मदत म्हणून संजयने हॉटेल मध्ये वेटरची उर्मीला सांगून नोकरी पत्करली. त्यामुळे तो दुपारी शाळा सुटली की हॉटेल मध्ये नोकरीला जात होता. रात्री 10 वाजता घरी येई. सकाळी उठून तो अभ्यास करी. दिवस जात होते. उर्मी आपल्या कोर्टाच्या केससाठी जिद्दीने लढत होती. रमेश ही आपल्या हातून एका मुलीचे नुकसान झाले म्हणून सर्वतोपरीने मदत करीत होता. उर्मीच्या मागे लागलेले वाईट नजरांचे, टोमण्यांचे बाण काही टाळता येत नव्हते. ती दुर्लक्ष करीत होती. शेतावरच्या घरी नेहमीच लाइट जात असे त्यावेळी सरपंचना सांगितल्या शिवाय काही करत येत नव्हते.फ्यूज हा त्यांच्या घराकडे आणि मेन तिच्या घराच्या मागे होता. सरपंच नेहमीच घरी येऊन विचारपूस करीत असे. कधी

मधी चहाही घेऊन जाई. उर्मी त्याच्याकडे आधार म्हणून पाहत होती. तो ही तिला अडीअडचणीला मदत करीत असे. एकदा संध्याकाळी अंधार पडला होता. सरपंचचे कुटुंब ही गावी माघारपणाला मुलांसहित गेले होते. सरपंच येत असताना तेव्हाढ्यात लाइट गेले. उर्मीने हाक मारली. उर्मीच्या मनात सरळपणा होता. सरपंचाकडे भावासारखे पाहत होती.

“काय झालं ग. “

“अहो लाइट गेले” उर्मी.

“जरा मेणबत्ती घेऊन ये” असे म्हणून तो घरात आला. उर्मी मेणबत्ती आणण्यास आत वळली. अंधार असल्यामुळे मेणबत्ती काही सापडेना. म्हणून अंधारात तो ही शोधू लागला. आपल्याजवळची काडी त्याने पेटवली. तिच्याजवळ जाऊन तो उजेड दाखवू लागला. त्यातच त्याला उर्मीचा स्पर्श दोन तीन वेळा झाला. तो ही संधीची वाट पाहत होता. मेणबत्ती लावली तेव्हा दोघे एकमेकांच्या जवळ होते. श्वास ही गरम बाहेर पडू लागले. सरपंचाने तिला एकदम जवळ ओढले. ओठावर ओठ ठेवत तिला मिठीत गच्च आवळू लागला. उर्मीला सुटता येत नव्हते.

“अहो असे काय करताय. तुम्हाला मी भावासारखे समजत होते. तुम्ही हे काय करताय? “उर्मी

“अग तू मला लय आवडतेस. तुला बी कोण नाय. तुझा नवरा बी तुरुंगात आहे. मला सर्व भानगड कळली आहे. हे बघ झाकली मूठ सव्वालाखाची. कोणाला

कळणार नाही. मी आहे नव तुयला साथ द्यायला.तुला कधी अंतर देणार नाय. हवे नको ते देत जाईन. “सरपंच

“तुमची बायको आहे मूल मोठी आहेत. त्यांना कळले तर? “उर्मी नवीन भोवरा निर्माण झाला आणि आपण त्यात अडकत चाललेलो आहोत असे वाटू लागले.

“त्याची तू चिंता करू नको. वाटले तर तुला दुसरे घर लांब देईन पण साथ देईन. माझी बायली आजारी असते. मला सुख मिळत नाही. कुणाला कळणार बी नाय “

त्याने तिला आणखी जवळ ओढून सर्व अंगावर हात फिरवू लागला. ओठांचे स्पर्श सर्व अंगावर करू लागला. पदर ही त्याने सोडला. उर्मी ही एकटेपणाला कंटाळली होती. तिलाही मन मोकळे करायला साथ हवी होती. सुख हवे होते. नाही तरी तिचे वय तरुण होते त्यात चांगला बांधा होता. ती ही आता मोकळी झाली. साथ देऊ लागली. पर्याय नव्हता. भोवरा गरगर फिरत होता ती अडकत फिरत होती.

“अहो संजय मोठा आहे तो काय म्हणेल त्याला कळले तर.”उर्मी

“काळजी करू नको मी आहे त्याला शिक्षणाला मदत करेन. मुलासारखा वागवेन “

संजय यायची वेळ झाली होती. तिने सरपंचला दूर करीत सांगितले,”पुर आता. संजय येईल.”सरपंच तिच्याकडील दोन भाकऱ्या आणि भाजी घेऊन घरी गेला. असे

आता नेहमी होऊ लागले उर्मीही टाळू शकत नव्हती. तरुण वयाला आधार हवा होता.तिच्या दोन बहिणी त्यांचे शिक्षण, लग्न हे तिलाच करावे लागणार होते. ती सकाळी कामावर जायची तेव्हा सरपंच संजय अभ्यास करतो की नाही, काय करतो हे पाहू लागला.कंपनीचा मालक ही तिला उशिरा ठेवून कामात गुंतवत राहिला. तो ही एकटेपणाचा फायदा घेऊ लागला. त्याबदल्यात तिला जास्त पैसे देऊ लागला. उर्मी हताश होऊन भोगण्याशिवाय काही इलाज नाही. परिस्थितीला शरण जाऊन सर्व जबाबदारी ध्यानात घेऊन जुळवून घेऊ लागली. तिला संजयला मोठे करायचे होते. खटला जिंकायचा होता. त्याला यातले काही कळता कामा नये. ह्याची दक्षता घेत होती.

संजयला ठसका लागला. घाम फुटून डोळ्यात पाणी आले. विनायकने पाणी दिले. "अरे काय झाले. हळू हळू खा."विनायकला ही वाईट वाटले. त्याची ओळख फक्त कोल्हापूरला जाताना तो सातारला हॉटेल मध्ये जेवण्यास जाई तेव्हा जेवताना बोलणे होई त्यावरून कळत होते. त्याने आपला घरचा पत्ता नकळत दिला होता. तेव्हा ही तो शिकायचं आहे असे त्याला सांगत होता. विनायकने काही मदत लागली तर भेट म्हणाला. त्याला कळले नाही हे असे होईल. त्यालाही दया आली.

"अहो तसे नाय. आईची आठवण आली ती काय करीत असेल."संजय

"अरे मग का आलास इथे. हॉटेलची नोकरी होती. आई जवळ होती."विनायक

"काय सांगू. एकदा सटवाई मागे लागली की सर्वांना हैराण करते. सुखाने जगू देत नाय. मला शिकायचे आहे म्हणून मी नोकरी धरली. शेतावरच्या घरात काय करू एकटा. घर खर्च, शिक्षण, दोन मावश्यांचे शिक्षण. आईला ही झेपत नव्हते. त्यातून...."

"काय त्यातून. काय झाले "विनायक. संजयला ही काय कसे सांगावे असा प्रश्न पडला. शब्द तर निघून गेले होते. मनाचा धीर करून खरे सांगू लागला.

"काय सांगू तो मालक ही मला त्रास देऊ लागला. कधी शिव्या दे नाही तर घराचे काम सांगून घरी बोलावू लागला. शारीरिक छळ करू लागला. असह्य होऊ लागले घरी आईला त्रास होईल म्हणून सांगता येईना. मग काय एकदा हाणला जोरदार. दात पाडले. तो बदला घेईल म्हणून घरी रात्री धूम पळालो."

"अरे इथे कसा आलास. घरी आईला काय सांगितले.? "विनायक

"आईला सर्व घटना सांगितली. तुमचा पत्ता, कार्ड दाखवले. तिने विचारले "तू कसा शोधशील."

"शोधेन" म्हणालो. मला हॉटेल मालकाच्या तावडीतून सुटायचे होते. काय करणार?"संजय.

"मालक काही घरी जाणार नाही. सरपंचकाका बघून घेतील सारे."संजयला आईचे संबंध सरपंचाशी आहेत हे कानावर आले होते. पण आईला जाब विचारायचे

धाडस झाले नाही. तिने खूप भोगले होते. त्याने स्वीकारले होते. आईने जाऊ नको हे खूप सांगितले. पण त्याने तिथे राहायचं नाही हा निश्चय केला.

विनायकचे डोके सुन्न झाले. आता काय करायचे कळेना. हा तर आपला शोध काढीत आला. त्याने पुन्हा संजयला विचारले, “तू नक्की शिकणार. तुला बोर्डिंग मध्ये ठेवू? तू तिथे राहशील? तुझे जेवणखाण सर्व होईल. कपडे मिळतील. पण मधून पळून जायचे नाही.”

“अहो पण माझ्याकडे पैका नाही. मी जरी हो म्हटले तरी कसे होईल हे”

“तुला काय करायचे आहे ते मी पाहीन. “विनायक. संजय हो म्हणाला. त्याला आपल्या घरी घेऊन गेला. आईला सर्व कहाणी सांगितली. आईने त्याला महाबळेश्वर येथे बोर्डिंग मध्ये ठेवण्यास अनुमती दिली. त्याला ही समाधान वाटले. आपण एका मुलाला मार्गाला लावीत आहोत. ज्याने आपल्याला मार्ग दाखविला त्यांचेही ऋण फेडत आहोत. त्याने संजयला महाबळेश्वरला शिकायला ठेवले. संजयने आईला हे कळविले. तिलाही बरे वाटले. ती संजयला गावी खुष आहे असे सांगत होती. विनायकला त्याची प्रगती मास्तरांकडून कळत होती. तो ही आपल्या श्रमाचे चीज झाले म्हणून आनंदित होता.

आज तोच संजय जाणीव ठेवून भेटायला आला होता. कधीमधी होस्टेलच्या फोन वरुन बोलत होता. प्रत्यक्ष भेट काही होत नव्हती. विनायक कामामुळे काही तेथे जात नव्हता. पैसे मात्र तो बँकेतून पाठवायचा.

वहिनी चहा बिस्किटे घेऊन आल्या. पाणी ठेवले. आधी तो दोघांच्या पाया पडला. आई मात्र नव्हती. संजयने आजी कुठे आहेत म्हणून विचारले तोच त्याला भिंतीवर आजींचा फोटो दिसला. घरी विनायकने बायकोची ओळख करून दिली. आजी गेल्याचे समजतात त्याने फोटो कडे जाऊन तिच्या फोटोला डोके टेकवले.त्याच्या डोळयातले अश्रु मात्र बांध फुटून वाहू लागले. आजीनेच विनायकचे कौतुक केले. विनायक शिक्षण करण्यासाठी मदत करणार आहे म्हणून त्याच्या समोर शाबासकी दिली होती. संजयला जवळ घेऊन डोक्यावरुन हात फिरवला होता.

"मला तुम्ही आधार झालात. पण हे पाहायला तुमची आई नाही. तुम्ही ही आधार हरवून बसलात."

विनायक त्याची बायको पाहत बसले. त्याला जवळ घेऊन पाठीवर हात फिरवू लागले.

तो भोवऱ्यातून बाहेर पडला होता.

******************************

लव अंकुश दिवाळी अंक २०१८

# लग्न

रमेश, त्याचे आई वडील आणि रेवती सारेच पोलिस स्टेशन मध्ये पोहचले. रेवती रमेशच्या घरी कायमची राहण्यास आली होती. रमेशच्या घरून विरोध नव्हता. पण रेवतीच्या घरी विरोध होता. माहीत असूनही आईने विरोध ही केला नव्हता. ह्या दोघांच्या प्रेमाची तिला कल्पना होती. जेव्हा वडिलांना घरी कळले तेव्हा विस्फोट झाला. रमेशच्या आईवडिलांनी त्यांच्यावर मुलीला पळविल्याचा आरोप होऊन बदनामी होऊ नये, कारवाई टाळण्यासाठी पोलिस स्टेशनला कळविणे पत्करले.

‘काय आहे तुमचे? काय झाले? पोलिस अधीक्षक

‘माझ्या मुलाचे आणि ह्या मुलीचे प्रेम संबंध आहेत. ते दोघे लग्न करू इच्छितात. परंतु हिचे आईवडील विरोध करीत आहेत. ही आमच्या घरी त्यांना न सांगता आली आहे म्हणून आम्ही आलो आहोत. आम्हाला त्रास होऊ नये हीच इच्छा.’ श्री अशोक यांनी खुलासा केला. सौ कलावती, रमेशच्या आईने त्याला होकारार्थी मान हलवून साथ दिली.

'हिचे आईवडील कुठे आहेत त्यांना बोलवा 'अधीक्षक ' मुलीवर तुमच्या मुलांनी जबरदस्ती किंवा धमकावले काय? खरे सांगा'

' अहो तसे काही नाही. आम्ही चांगल्या घरातील आहोत. आमच्यावर असे आरोप करू नका. असे काही असते तर आम्ही का आलो असतो '? कलावतीने घाबरत सांगितले.

'साहेब आम्ही त्यांना बोलवण्यापेक्षा तुम्हीच फोन करून बोलवा. ते जास्त चांगले आहे. आपले ऐकतील' . श्री अशोक ' बरे बसा तुम्ही बाहेर. मी बोलवतो फोन करून ' अधीक्षकाने सांगितले. सर्वजण त्यांच्या केबिनच्या बाहेर येऊन पोलिस स्टेशनच्या आवारात असलेल्या झाडाखाली बाकड्यावर बसले.आता किती वेळ लागेल हे कुणालाच माहीत नव्हते. श्री अशोक आणि कलावतीच्या आयुष्यात हा पहिलाच प्रसंग. काय होईल काय नाही ह्याची चिंता कलावतींना छळू लागली.त्यांना दोन मुले रमेश आणि गोपाळ. त्यांचा स्वत:चा पितळे स्टीलची किंवा घराला लागणारे सर्व सामान विकण्याचा वडीलोपार्जित व्यवसाय. गोपाळ 11वीच्या वर्गात तर रमेश केटरींगचा डिप्लोमा पूर्ण करून इंडिगो कंपनीत नोकरीला नुकताच लागला. तो ही वडिलांना धंद्यात मदत करीत असे. रेवती सकाळी सकाळी नेसत्या कपड्यांनीशी वडील घरी नाहीत आणि आई आंघोळीला गेली हे पाहून गुपचुप बाहेर पडली. तिला काही दिवस कोंडून ठेवले होते. तिला घरातून बाहेर पडण्याची बंदी होती.तरी आई मुलीचे मन ह्याचा विचार करून थोडी मोकळीक देत असे. निघताना

तिन्हे आईला ती कुठे जात आहे हे कळावे म्हणून चिठ्ठी लिहून ठेवली. रेवती आणि रमेश दोघेही बाजूला होऊन बोलू लागले.

‘ मी बाहेर हॉटेल मध्ये जाऊन आपल्याला काहीतरी घेऊन येतो. किती वेळ लागेल कळत नाही.’ रमेश

‘नको थांब मला भीती वाटते’ रेवती. ‘आता काय त्याचे? झाले आहे ते घडून गेले आता पाहत राहायचे. तू आईकडे थांब. मी येतोच लवकर’ . तो आईवडिलांना सांगून जाऊ लागला. ‘अरे कशाला जातोस तिचे वडील येतील ना? ‘कलावती. ‘अग. वेळ लागेल. ते काही येणार नाहीत. पोलिसांनाच जावे लागेल घरी. मी काही तरी जाऊन घेऊन येतो’ असे म्हणून तो गेला.

रेवती रमेशच्या आईकडे जवळ येऊन उभी राहिली. त्यांनी तिला जवळ घेतले. तिच्या पाठीवरून आणि डोक्यावरुन हात फिरवू लागल्या.’ काही काळजी करू नको. होईल शेवट गोड. ‘

रेवतीला जगण्याची उभारी आली. तिला तरी तिच्या आईकडून मानसिक आधार हवा होता. आईचा आश्वासक मायेचा पाठीवरून हात फिरावा असे वाटत होते. आईनेच माहीत असूनही भक्कम साथ दिली नाही याचे वाईट वाटले. वडिलांच्यापुढे तिने शरणागती का पत्करली.आठवणींची पाने पाचोळा उडावा तशी भोवरा होऊन डोक्यात फिरू लागली.

रेवतीला नवीन नवीन पदार्थ करण्याची आवड. त्यामुळे तिने ही केटरींगला प्रवेश घेतला होता. जमलेच तर ट्रॅवल कंपनीत काम करावे हा हेतु. रमेश तसा दिसायला देखणा, उत्साही आणि तिच्याच शाळेतून चांगल्या मार्कांने पास झाला होता.रेवती मारवाडी एकदम मध्यमवर्ग आर्थिक कुटुंबातील होती. वडील कुठे पेपर कंपनीत कामाला होते. शहाडजवळ बैठ्या चाळवजा दोन खोल्यांमधील घरात रहात होते. राजस्थान मधील बीकानेर जवळ वडीलोपार्जित घर आणि सोनेचांदीचा व्यवसाय होता. घरी जुन्या चालीरीती, देवधर्माचरण व्रत वैकल्य पाळले जात होते. वडीलोपार्जित घरात फक्त ते वाटेकरी होते. तरी वडील, त्यांचे दोन भाऊ गावी गेल्यावर यथाशक्ती मदत करत होते.आई जुन्या धार्मिक वळणाची. घरात जरी मारवाडी बोलत असले तरी तिचे आणि भावाचे शिक्षण मराठी शाळेतून झाले.रेवतीला भरतनाट्यमची आवड होती. ती रीतसर शिकत होती. कॉलेजच्या सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेतला होता त्यामुळे रमेश आणि रेवती जवळ येत चालली. रमेशला नाटकातून काम करणे, गाणे याचीही आवड होती.रमेशला गाण्यात बक्षीस मिळाले.

कॉलेजचे लेक्चर सुरू होते. ती हळूच रमेशकडे पहात होती.रमेश तिला मंनापासून आवडत होता. ही भावना व्यक्त कशी करावी हे कळत नव्हते.तिलाही अजून त्याचा अंदाज येत नव्हता. रेवतीला रमेशला भेटून कधी अभिनंदन करू असे झाले होते. बाहेर अंधारून आले. गडगडाट होऊन विजा चमकू लागल्या. कॉलेज लवकर सुटले. तसे मित्र मैत्रिणी समवेत दोघेही चौपाटीजवळ समुद्राची मौज मज्या

बघण्यास गेले. समुद्राच्या पाण्यातून चालता चालता सर्वजण रमेशचे गाण्यात बक्षीस मिळाले म्हणून अभिनंदन करीत एकमेकांचे सेल्फी काढत होते. रमेश प्रत्येकाला बाजूलाच असलेल्या कुल्फीवाल्याकडुन कुल्फी देत होता. रेवतीनेही त्याचे अभिनंदन केले. त्याने दिलेली कुल्फी घेऊन बाजूलाच सेल्फी काढला. पाऊस जोरदार सुरू झाला तसे सर्वजण पांगले, निघून गेलेत. रमेश आणि रेवती मागे राहिले. काय करावे दोघांना कळेना. दोघेही पाऊस थांबेल ह्या आशेने भिंतीच्या आडोशाला उभे राहिले.अंधार वाढू लागला. दादरहून शहाडला जायचे म्हणजे गर्दी दोन तास जाणार. दोघेही भिजले होते. कसेबसे पुस्तके महत्वाचे पैशाचे पाकीट दुकानातून प्लॅस्टिक पिशवी घेऊन त्यात ठेवून चालू लागले. चालताना दोघांना एकमेकाला खेटत चालावे लागत होते कारण माणसांची, वाहनांची गर्दी वाढू लागली होती. पदपथ दुकानामुळे गजबजला होता. रेवतीला स्पर्श हवा हवा वाटत होता. कधी कधी दोघांचे हात एकमेकांना लागून बोटेही अडकत होती. रमेशचा श्वास गरम होऊ लागला. कळतनकळत तो ही चालताना अडकत होता. भराभर पुढे चालत होता. रेवती गर्दीमुळे कधी कधी मागे राहत होती. सारे अनपेक्षित घडत होते. त्याने रेवतीकडे ह्या भूमिकेतून पाहिलेच नाही. रेवती तशी दिसायला सर्वसाधारण चांगली.

‘ अरे थांब रे. किती भराभर चालतोस.’ रेवतीने त्याचा हात पकडून थांबवले आणि चालू लागली.

‘ अग! किती उशीर झाला आहे. त्यातून पाऊस जोरदार पडत आहे. गाड्यांना गर्दी होईल. ‘ रमेश

दोघेही भराभर एकमेकाला खेटत चालू लागली. दोघे स्टेशनवर आलेत. अपेक्षेप्रमाणे गाडीला गर्दी होऊ लागली.गाड्या उशीरा धावत आहेत याची उद्घोषणा होत होती. दोघांचा पास प्रथमश्रेणीचा जरी होता तरी गर्दीमुळे चढणे शक्य होत नव्हते. काय करावे हे कळत नव्हते. दोघांनी किती पैसे आहेत याचा अंदाज घेत त्यांनी थोडावेळ थांबून गाडीत चढता येते काय हे बघायचे ठरविले. दोघांनी एकमेकांचे फोन नंबर घेतले. जो आधी घरी जाईल त्यांनी पोहचल्याचे कळवायचे ठरले. रेवतीला रमेशचा फोन मिळाला याचा आनंद झाला.उशीर होऊ लागला.गाडीत काही चढता येईल असे लक्षण दिसेना. दोघांनी पैशाचा अंदाज घेऊन टॅक्सी घेऊन जितके जाता येईल तितके जायचे ठरविले.एटीएम मधून रमेशने पैसे काढले. रेवतीला रमेशचा सहवास मिळेल याचा आनंद वाटला. दोघांनी शेयरिंग टॅक्सीने प्रवासी कोण कोण आहेत हे बघून ठरविले.

‘रमेश मला थंडी वाजत आहे. ‘

‘अग काच वरती कर ना.’ रमेशने शेजारील प्रवाशांची परवानगी घेऊन काच वरती केली. रेवतीने रमेशच्या खांद्यावर डोके ठेवले. रमेशला अवघडल्यासारखे झाले.ती मात्र सुखाच्या स्वप्नात रममाण झाली. तेव्हढ्यात तिचा फोन वाजला. घरून वडील बोलत होते.

‘ छोरी कठे हे तू? अकेली आवो के? कठे पोहे गई?’

‘आवू मै. मारो साथ क्लास मे रमेश हे ना उसके साथ टॅक्सी मे आवू कल्याणतक. चिंता कोनी करे.’

रेवतीने घरी पोहचल्यावर पावसामुळे कसा उशीर झाला ही कहाणी सांगितली. रमेश आणि रेवती दोघेही एकमेकात गुंतत चालली. दोघे ही अभ्यासाचे निमित काढून मित्र मैत्रिणी समवेत एकमेकांच्या घरी जात येत असत. त्यामुळे घरातले ही ओळखू लागले होते. रमेशला ही ती आवडायला लागली होती. दररोज समुद्रावर फिरून घरी जाऊ लागले.रात्री उशिरापर्यंत फोनवर हळू हळू बोलणे चाले. कधी कधी व्हाट्स मेसेज ने बोलणे चाले.रेवतीच्या आईने त्या दोघांचे बोलणे चालणे या वरुन त्यांच्यातील काहीबाही आहे हे ताडले. एकदा रेवती रमेशशी ज्या तऱ्हेने बोलत होती त्यावरून तिची खात्रीच झाली. तेव्हा तिने छेडले असता रेवतीने सर्व खुलासा केला. आईने ही घरी कोण कोण आहेत याची चौकशी रमेश घरी आला असताना केली. रमेश बद्दल तिची खात्री पटली. मौनाने रेवतीला समंती दिली. रमेशला ही त्याच्या आईला घरी घेऊन ये असे सांगितले. रमेशने अजून घरी सांगितले नव्हते. त्याला शिक्षण पूर्ण करायचे होते. दोघांच्या परीक्षेला दोन महीने राहिले होते. दोघेही समुद्रावर नेहमीप्रमाणे बसले होते. रेवती रमेशला बिलगून बसली. रमेशने ही तिला मिठीत जवळ घेतले. हळूच कानात ओठाने कुजबूज करू लागला. ती ही सुखावत मिठीत विसावली.

‘रेवती तू काय ठरविले आहेस परीक्षेचे ‘?

‘ परीक्षेचा अभ्यास करणार आणि आपण दोघेही पास झाले पाहिजे ‘ त्याच्या कानाशी कुजबुजत बोलू लागली.

‘मग काय? तुझ्या घरी माहीत आहे काय आपल्या दोघांचे? आपण जर नेहमीच असे बसून उशिरा गेल्यावर अभ्यास कसा होणार ‘?

‘ नाही रे सोडवत तुला. तुझ्या सहवासात मला एक नवीन उत्साह मिळतो. माझ्या आईला कळले आहे आपल्या बोलण्यावरून आणि मी ही मग सांगितले. तुझ्या घरी माहीत आहे आपले? ’

‘ लहान भावाने आपले मेसेज वाचले आहेत त्याने सांगितले असेल आईबाबांना ‘

‘ अरे तुझा मोबाइल तो कसा बघतो? ‘ तिने चमकून त्याच्याकडे पाहिले

‘त्यात काय मी ही त्याचा बघतो. माझ्या घरी काही विरोध होणार नाही. तुझे संस्कार चालीरीती सर्व वेगळे आहेत. तू कशी जमवून घेशील?

‘त्यात काय आहे? आपण सारे मराठी बोलतो ना. माझे तुझ्या घराशी नाते होणार आहे. आमच्या घराची कशाला चिंता? नाही तरी आपण एकमेकांच्या घरी येऊन जातो अभ्यासाच्या निमिताने. मला तुझे घर आवडले. मला काही इशू नाही. फक्त माझ्या वडिलांची मला भीती वाटते? ’

‘अग मला अजून नोकरी नाही. वडिलांचा जरि व्यवसाय असला तरी तो मला आवडत नाही. मला वेगळे काही तरी करायचे आहे.’

‘ होईल रे. मिळेल नोकरी. तो पर्यन्त थांबायची तयारी आहे. नोकरी मिळेस्तोवर वडिलांचा धंदा सांभाळ मी ही काहीबाही करेन नोकरी चांगल्या स्टार हॉटेल मध्ये नाही तर बघू आपल्याच व्यवसायातील घरी बसून काही तरी.’ तिने त्याच्या ओठावर ओठ टेकवले. त्याला अगदी जवळ घेतले.

तेव्हढ्यात रेवतीच्या वस्तीतील केशव शेजारी राहणारा समोरून गेला. तो ही त्याच्या मित्रांबरोबर चौपाटीला फिरत होता. त्याने त्याच्या घरी सांगितले. केशवच्या वडिलांनी हे ऐकले. सहजच केशवच्या वडिलांनी रेवतीच्या वडिलांना घरात मुलीचे लग्न ठरले का असे विचारले. रेवतीचे वडील चमकून गेले. काही न बोलता ते शांतपणे ते जे जे सांगत होते ते ऐकत होते. रेवतीची गोष्ट ऐकून त्यांचा राग अनावर झाला. घरी रेवती आली की तिला विचारायचे, सोक्षमोक्ष लावायचा हे ठरविले. ते रागातच घरी आलेत. त्यांनी बायकोला दमात घेतले. तिला माहीत आहे का हे ही विचारले. आईने काहीच उत्तर दिले नाही.

रात्री 9 वाजता रेवती घरी आली. वडिलांनी तिच्याकडे रागातच बघितले. आईमात्र काय होईल काय नाही ह्यामुळे कावरीबावरी झाली. छोटा भाऊ ही घरात होता. त्यालाही प्रकरण माहीत होते पण तो ही काही बोलत नव्हता. रेवती घरात येऊन चप्पल काढत ‘ मा मने भूक लगीयो ’ हे वाक्य ऐकून वडील संतापले. त्यांनी तिला हाताला पकडून जोरात ओढले.

‘ इतनी देर कठे गै थी? ‘ वडील ‘ पापा कै हो ग्यो. मो कॉलेजमे गई थी ‘

‘ तू मने सिखाइओ के? रेवतीच्या थोबाडात मारत ‘ तू पडाई करे या लफडा करे. मारे सब पता होए. थारो रिस्तो ने माने ‘

‘ पापा मो वणी प्यार करू ‘ रेवतीने धाडस करीत म्हटले

‘प्यार करू? प्यार का अर्थ संमजो के? छोरा कठे रेहे? छोरो कै काम करे? ’

‘ छोरो पापानो धंदा देखे. वो सब कल्याण मे रेवो ‘

‘आपणे रिवाज, भाषा अलग हे उनके अलग ‘

‘मारे आपणे रिवाज पसंत ने हे. मारे लास काढवो पसंत ने हे. मो मराठी आवे ‘ तिने आपल्या घुंगट रिवाज आणि चालीरीती बद्दल ना पसंती व्यक्त केली

‘ थो पडाई मा ध्यान दे. मोए रिश्तो मन कईके ‘ वडिलांनी प्रेमाला विरोध केला

रेवती ऐकत नाही हे ऐकून वडील संतापले. आईला त्यांनी कडक शब्दात समज देऊन तिला कॉलेजला जाऊ देऊ नकोस मी तिचे लग्न आपल्या रिवाजाने लावून देईन. तिला घरात कोंडून ठेव. अशी कडक समज दिली. आईने ही ‘ नो वणी रे बाई हो वणी हाते अवो कतो करो. मोए मन कई के’ आईने आपल्या स्त्रीची वेदना आणि लोक काय म्हणतील हे बोलून दाखवले. त्यांनी रेवतीला ‘ छोरी थे पन ने तो मो थोए कही ने आलो ‘ म्हणजेच मी काही देणार नाही तुला माझ्या घरातले असे

समजावले. रेवतीने तेव्हढ्याच जिद्दीने ‘ थई रो मारे कही ने सावे’ काहीच नको म्हणून आपल्या प्रेमावर खंबीर राहिली.

इतक्यात रमेश तिच्या जवळ आला तशी ती भानावर आली. त्याने तिचे वडील आई आले आहेत आणि आपल्याला पोलिसांनी बोलावले आहे असे सांगितले.सर्व आत गेले. पोलिसांनी वडिलांना ‘ तुमचा विरोध का आहे असे दोघांना विचारले? ’

‘ ये तो आम्हारे जात के नही. हमे पसंत नही’

‘ बेटीका उमर कितना है? वह तो सज्ञान है.? ’ वडिलांनी हे ऐकताच आपले काही चालणार नाही हे ताडले ते गप्प राहीले. पोलिसांनी रेवतीला विचारले ‘ तुला हे पसंत आहे? तू स्वत:हून लग्न करण्याचा निर्णय घेतलास? तूच ह्यांच्या घरी आपणहून आलीस का तुझ्यावर जबरदस्ती झाली? ’ रेवतीने त्यांच्या घरी येऊन राहण्याचा सर्वस्व तिचाच निर्णय आहे, तिचे प्रेम आहे हे कबुल केले. पोलिसांनी रमेशला आणि त्याच्या आईवडिलांना लग्नाबद्दल विचारले असता ‘ ही केस बंद झाली, आमच्यावर काही आरोप होणार नसतील तर लग्न लगेच रजिस्टर पद्धतीने करू. वाटल्यास तुम्हाला ही ते सर्टिफिकेट आणून दाखवू’ असे लिखित कबुल केले.

रेवती रमेशच्या घरात रूळलि. रमेशला नोकरी मिळाली म्हणून वडिलांनी आपल्या एका दुकानाचे रूपांतर आईस्क्रीम, snack corner मध्ये केले.सर्वच रेवती

पाहू लागली.कालांतराने रेवतीच्या आईवडिलांना आपल्या चुकीची उपरती झाली. काळाप्रमाणे बदलायला हवे, धर्म, जात ह्या रूढी तोडायला हव्यात हे कळले. त्यांनी ही नाते स्वीकारून त्यांच्या कडे जाऊन येऊन राहू लागले. वडिलांनी झाल्या प्रकाराची क्षमा मागून जावयाला सोन्याची चेन भेट दिली.

**************

सा. आघाडी मालवण दिवाळी अंक २०१८

# पेंटर

कोर्ट खचाखच भरले होते. दीपकची बाजू ऐकून त्याच्या केसवर न्यायालय निकाल देणार होते. न्यायाधीशानी दीपकला विचारले, ‘ तुला तुझी बाजू काय मांडायची आहे? तुझे कोणी वकील आहेत काय ‘?

‘ साहेब मी लग्न झालेला गरीब माणूस. नुकताच टेम्पररी काम करीत होतो. ह्या केसमुळे ती ही नोकरी गेली. वकील काही मी ठेवू शकत नाही. पण मी एकच सांगतो, मी एव्हढा मोठा गुन्हा केला नाही. मी दोन तीन थपडा मारल्या देवेन्द्रभाईला. माझ्या जागी तुम्ही असता तरी हेच केले असते. मी देवभक्त आणि दादांचा अनुयायी आहे....’ दीपक सांगत होता

‘मुद्दयाचे बोला इतर नाही’

‘ साहेब तेच सांगतो, याने माझ्या बायकोबरोबर सुत जमवून पळविले आहे. ती मला टाकून दोन्ही मुलांना घेऊन याच्याकडे गेली. हा तिला पैशाची लालूच दाखवून मजा मारायचा, तिची चूक बी हाय. पण यांनी शेजारधर्म आणि मैत्रीचा घात केला आहे. मी फक्त काही महिने तुरुंगात शिक्षा भोगेन, पण सुटून आल्यानंतर याला

मात्र सोडणार नाही. याला असा मारेन की याला याची किंमत चुकवावी लागेल. यांनी पोलिसांना पैसे देऊन केस फुगवली आहे.... '

'कोर्टाचा अवमान करीत आहात.... '

' मी अवमान नाही करीत. पण सर्व खोटे रचून माझ्यासारख्या प्रामाणिक माणसाला जर शिक्षा होणार असेल तर मग न्याय कुठ आहे? मी काहीच मोठा गुन्हा केला नसताना जर पोलिस केस करतात, तर मग माझ्यावर झालेल्या अन्यायाला याला मारूनच मी शिक्षा भोगेन. सुटल्या नंतर मी कलंक माथी लावून फिरणार तर मग कोर्टासमोर जाहीर सांगून केले तर काय बिघडले? '

सर्वच कोर्ट अवाक झाले. लोक त्याच्या निर्भीड आणि प्रामाणिकपणाचे कौतुक करू लागले. कोर्टाने हातोडा आपटत, ' ऑर्डर ऑर्डर शांतता राखा ' असे सांगून न्यायपत्र जाहीर करीत आहे असे कोर्ट क्लार्कने सांगितले...

' श्री दीपकने कोर्टाचा अवमान केला आहे म्हणून त्याला कोर्ट 1000 रुपये दंड ठोठावत आहे आणि रुपये 20 000/- च्या जामीनावर ताकीद देऊन सोडत आहे. जामीनाचे पैसे लगेच भरवायचे आहेत.

दीपक बाहेर आला. आईने त्याला जवळ घेत तोंडावरून हात फिरवला. देवेन्द्रभाईकडे त्याने खुन्नस कटाक्ष टाकला. देवेन्द्रभाई मनात चरकला. त्याने पुढचा अनर्थ टाळण्यासाठी त्याचा दंड आणि जामीन भरून टाकला. दीपक सुटला. पण मूल आणि बायको देवेन्द्रभाईकडे राहू लागले. सुरवातीला दीपक त्याचे कुटुंब आणि आई बहीण त्यांच्या वडिलांच्या मालकीच्या घरी एकत्र रहात होते. परंतु आई आणि

बायकोचे पटेनासे होऊन भांडणे होऊ लागली म्हणून ते वेगळे रहायला लागले. ती चाळ दीपकभाई यांच्या चारभावांच्या मालकीची होती. तेव्हा हे प्रकरण घडले.

बहिणीला माझ्या घरी कार्य आहे म्हणून पेंटर ओळखीचा असेल तर सुचव असे सांगितले तेव्हा तिने दीपकची सर्व माहिती सांगून त्याचे नाव सुचवले. ती माहिती सांगत असताना कोर्टाचा सीन डोळ्यासमोर उभा राहिला. 'अग! तू अशा माणसाचे नाव सुचवतेस? मी घरा बाहेर कामासाठी असतो, घरी दोघीच असतात.' माझी चिंता व्यक्त केली.

' अरे तू काळजी करू नकोस. माझ्या घरी हा गेले 8 वर्ष काम करतो आणि आमच्या 'दादांच्या ' बैठकीतला आहे. तो चांगला आहे. माझ्या घरी काम असले की मी घर त्याच्या जिवावर सोपवून बाहेर जाते. तो काम करतो, पूर्ण साफसफाई करून जातो. कुठल्याही गोष्टीला हात लावणार नाही. डोळे झाकून दे. जास्त भाव सांगणार नाही.' बहिणीने वर आश्वासक प्रशस्तीपत्र दिले.

मी सौ च्या कानावर घातले. आपण नवीन आहोत या भागात. बघू काय होते ते, घेऊ अनुभव, ती आहेच मधे.....

दीपक मला फोन करून भेटायला आला. बहिणीची ओळख सांगितली. त्याला पाहताच धडकी भरली. दीपक उंच, धिप्पाड, गावंढळ, रांगडा, काळा, प्रथमदर्शनी वेगळेच व्यक्तिमत्व आहे ही भावना कुणा सर्वसामान्याची होईल असा. घरी आल्यावर त्याचे बोलणेही त्याच स्टाईलचे. बायकोलाही आधी भीती वाटली, काम

द्यावे की नाही? .... परंतु त्यालाच काम द्यायचे ठरले होते. देवाण घेवाण पक्के झाल्यावर त्यानेच सांगितले ‘ साहेब मला आल्या आल्या आणि दोन एक तासाने चहा लागतो. त्याशिवाय काम करायला किक लागत नाही.’ मला उचकी लागल्यासारखे झाले.‘ बोलण्यात आगरी गावठीपणा. मी ही बायकोला न विचारता, तिच्याकडे पहात ‘ कबूल. पण किती दिवसात तुम्ही काम पूर्ण करणार आणि किती माणसे बरोबर कामाला घेणार? मला काम लवकर व्हायला पाहिजे. रेंगाळत नको. तुम्ही माणसे कुठून आणणार? ’ माझा चिंतेचा स्वर..

‘साहेब तुम्ही काही काळजी करू नका. माझ्याबरोबर एक माणूस असेल त्याची जबाबदारी माझी. आठवडयाच्या आत काम पूर्ण होईल. अहो, आम्ही बैठकीतली माणसे. सद्गुरूमुळे मला हा चांगला मार्ग सुचला. मी मागून घेईन दोन पैसे.. पण कुणाला फसवणार नाही की दगा फटका करणार नाही. आमच्या बैठकीतील शिकवण आहे.. प्रामाणिक रहा, फसवू नका. माझा मित्र विश्वासातला आहे. तुम्ही काळजी करू नका. जेवणा नंतर थोडी विश्रांती घेतो. तुम्हाला काय बी अडचण नाय. वेळेत काम करणार.स्वच्छ करून जाणार. तुम्ही बिनधास्त असा. ‘त्याला शोभेल असे त्याने हात वर करत, वाक्य पूर्ण केले.

‘ तुमचे जेवण खाण? ’ माझा दूसरा प्रश्न. ’ नाय साहेब आम्ही घरून आणतो. माझी बायको प्रेमाने करून देते, मला बाहेरचे काही चालत नाही, खात नाही. ती माझी लई काळजी घेते. तिच्या जेवणाने मला काम करायची उर्मी येते ‘ मला काहीच कळे ना. माझ्या मनातील ‘ इतर लोकांना काय प्रेमाने मिळत नाही? इतरांच्या बायका काय काळजी घेत नाहीत?’ चुकून वात्रट प्रश्न तोंडातून निघून गेला.

‘ तसे नाय साहेब. माझी स्टोरी येगळी आहे. ‘ दीपक. मी त्याच्याकडे पहात बसलो.

‘ अहो बाहेर जायचे आहे लवकर आटपा ना. ‘ बायकोने चर्चा लांबणार याचा अंदाज घेऊन अलाराम दिला. बोलणे तिथेच खुंटले. काम सुरू करण्याचा दिवस ठरला. मी ही ज्या दिवशी काम चालू राहील त्यादिवशी घरीच रहायचे ठरविले. बहिणीने सांगितलेली कथा आणि याने सांगितलेले ‘ बायको प्रेमाची ’ याची संगती लागे ना.

ठरलेल्या दिवशी दीपक त्याच्या माणसाला घेऊन आला. आम्ही काम सुरू होणार म्हणून आवरून तयार होतो. तो किचन पासून सुरवात करू म्हणून आत गेला.त्याने अगोदरच कामाची दिशा सांगितलेली होती.किचन पासून काम सुरू करत बाहेरच्या हॉल मध्ये शेवटी काम करू.तो कपडे बदलून बाहेर आला.

‘ साहेब! थोडा चहा मिळेल ना? , म्हणजे काम सुरू करता येईल ’ हाताने खुणावत म्हटले

‘ हो.. हो ना. अग! जरा चहा टाक ना ‘ ही आत चहा टाकण्यासाठी गेली. मुलगी क्लासला गेली होती.

‘ काय दीपक, आज काय डबा दिला बायकोने? ’ मलाही चैन पडे ना. बहिणीने जे सांगितले आणि यांनी जे सांगितले ते खरे काय हे कळल्याशिवाय चैन

पडत नव्हते. बायकोने चहा दिला. चहा घेत घेत काही तरी बोलायचे म्हणून सुरू झाले, तो बोलू लागला.

‘ हि बायको लई चांगली पायगुणाची आहे. हिच्यामुळे मला काम मिळू लागली. देवदेव करणारी आहे.’

‘ असे? म्हणजे काय? ‘

‘ अहो घरी किती बी उशीर झाला तरी मला गरम गरम करून जेवण वाढते, मी घरी गेल्याबिगर जेवत नाही. घरी गेल्या गेल्या गरम पानी आणि टॉवेल देते. ‘

‘ तुम्ही फारच भाग्यवान आहात.’ मी काही बोलायचे म्हणून बोललो.

‘ अहो साहेब! रात्री झोपताना डोक्याला तेल बी लावते आणि तांब्याच्या वाटीने तेल लावून पाय चोळते’ दीपक भरभरून बोलू लागला. मी उडालोच

‘ खरेच तुम्ही भाग्यवान आहात. आज कुठली बायको एव्हढे करते. मला हेवा वाटतो’ हे वाक्य उच्चारले न लगेच सौ ने स्वर लावला

‘ अहो कामाचे काय? संध्याकाळी उशीर होईल ना? ’ बायको माझी, त्याच्या बायकोची स्तुती ऐकल्यामुळे की काय कोण जाणे तिने आठवण करून दिली.

‘ वैनी तुम्ही काय बी चिंता करू नका. माझा मित्र आत भिंतीचे सफाई कपची काढतोय ना? त्याचे झाल्याशिवाय पुढे हात मारता येत नाही ना ‘ मला त्याच्या

कामातील वापरात येणाऱ्या शब्दांची गंमत वाटू लागली. माझ्यात हि स्फुरण चढू लागले. करायचे काय नुसते बसून? त्यालाही समजून घ्यावे.

‘ कधी लग्न झाले? किती मुले ‘

‘ झाली दोन वर्ष. मुलगा मोठा नुकताच कॉलेज शिकला कुठला तरी कम्प्युटरचा कोर्स करतो’ हे वाक्य म्हणताना पुन्हा तोंडाचा चंबू झाला. कम्प्युटर शब्द उचरताना थोडे कठीण गेले. ‘ धाकटा 10 वीत आहे.’

‘ लग्न होऊन दोनच वर्ष झाली ना? ’ माझ्या चेहऱ्यावरचे आश्चर्य त्याला कळले.

‘ अहो हि पहिल्या बायकोची ‘ त्याचा खुलासा.

‘ मग आता काय संबंध? ती तर तुमच्याकडे रहात नाहीत मग? ’ आता थोडी संगती लागेल इतक्यात..

‘ ओ दीपकभाय! हो गया. मै जरा नीचे जा के, पिके आता हूं! ‘ दीपकचा सहकारी ‘ हा जा के जलदी पिके आजा. मै तबतक हात मारना चालू करता हूं ‘ दीपक आत उठून जाऊ लागला.

बायकोने माझ्याकडे प्रश्नार्थक नजरेने पाहिले. तो सिगरेट पिण्यास गेला आहे हे मी ताडले. मला त्यांचे संभाषण ऐकून हसू फुटले. बायकोचे शंका निरसन व्हावे आणि वातावरण हलकेच रहावे म्हणून ‘ अहो काय पिऊन येणार ‘?

‘ अहो तो विडी प्यायला गेला. तसे काय नाय. तुम्ही काळजी करू नका ‘ दीपकच्या खुलाशाने तिचा जीव भांड्यात पडला. मी आत जात ‘ तुम्ही पिता की नाही? ’

‘ मी पूर्वी प्यायचो आता नाही. दादांच्या सेवेत रमल्या नंतर सर्व सोडले. हा sss फक्त सिगरेट पितो. आमच्या लायनीत काम करून थकवा येतो ना? ’ दीपक रंगात आला

‘बायकोला माहीत आहे? ’

‘ हा ss हा मी काय बी तिच्या पासून लपवत नाय. अहो तिच्या पायगुणामुळे मला मोठे मोठे काम मिळत गेले. दादांच्या आशीर्वादाने तिची माझी ओळख झाली. मी लपवत काय नाय. काय खोटे बोलून करायचे. मी सर्व माझे पास्ट तिला सांगितले. परत तिला विचारले ‘ बघ तुला पसंत हाय नव्ह? नंतर लफड नको. मी सणकी हाय खोटेपणाला. सहन होत नाही मी गाडून टाकतो. अहो हे सर्व दादांसमोर सांगितले. त्यांनीच आमचे लग्न लावले’ . अहो दादांनीभी हा चांगला हाय कर तू लगीन असे तिला सांगितले ‘ दीपक रंग लावता रंगात बोलत होता.

दुपार नंतर दीपक चहाची तल्लफ आली म्हणून चहासाठी बोलला. थोडा वेळ बसला. बायकोने काही बोलू नका. वेळ खर्च करू नका हात डोक्यावर मारीत, खुणावून मला गप्प केले. दीपक रोज येत होता आणि मीही मोकळेपणाने बोलत त्याच्यातील माणूस समजून घेत होतो. तिसऱ्या दिवशी सकाळीच दीपक पेढे घेऊन

आला, आनंदाने ‘ माझा मुलगा CA झाला. त्याचे पेढे. त्याच्या कंपनीने त्याला काही कंपन्यांचे ऑडिट करायला पाठविले, पोरांने बगा त्यांची लफडी बाहेर काढली. प्रामाणिकपणावर फिदा होऊन त्याला त्या मालकाने याला नोकरीसाठी ऑफर देऊ केली. ‘

‘अभिनंदन तुमच्या श्रमाचे फळ झाले. प्रमाणिकपणाचे फळ चांगलेच असते अरे पण हा मुलगा कोठे असतो.? ’ मी बोलून गेलो.

‘अहो मुले आई जवळ रहातात. मुलांनी काय चूक केली. धाकटा येतो माझ्या घरी,…. आजीकडे. मोठ्याला मी पैसे शिक्षणाला देतो. त्यांनी काय नुकसान केले? त्या सालीला मी उभा करीत नाय. तो तिचा यार तिला आणि मुलांना पैसे देतो ते तिथेच रहातात.’ दीपक

‘ अरे पण तुझी हि बायको तिचे ss? माझे वाक्य पूर्ण होण्या आधीच ‘ती काय बी बोलत नाय माझे सर्व पैसे तिच्याकडे देतो. तीच म्हणते तुम्ही ठरवा काय चांगले काय वाईट’ .

‘ अरे त्या देवेन्द्रभाईचे लग्न झालेले असेल ना ‘? माझी संशोधक वृती गप्प बसू देई ना.’ हाय ना साल्याला दोन मुले आणि बायको. त्याच्याजवळच राहतात. त्यांची पूर्ण इमारत आहे. तो नोकरी करतो माझगाव गोदीत.’

‘ त्याची बायको काही बोलत नाही या बद्दल ‘? मी

‘ कशाल्ला बोलेल? हा लफडेवाला तीही तशीच लफडेवाली. बाहेर फिरत असते अनेकांबरोबर. हे तिच्या मुलांना बी माहिति आहे आणि नवऱ्याला बी.’

‘ तो काही बोलत नाही ‘?

“काय बोलणार? तो बोलला की ही त्याचे लफडे तोंडावर मारते. तो गप्प. त्याच्या सर्व भावानाही माहीत आहे. त्यांनी ही याला सोडून दिले. ते लफड्यात पडत नाहीत लोक बघते सर्व तमाशा’

‘ तुझी बायको....पूर्वीची... ती काय करते? ’ मी ‘ तिला काय देणे घेणे नाही जो पर्यन्त पैसा मिळतो. राहायला जेवायला मिळते. ती ही कुठे कुठे भांडीधुनी करते.’ दीपक

‘ तुझ्या आईकडे कोण बघते? तिचा सांभाळ तुझे वडील....’ मी चाचरत चाचरत विचारले

‘ माझा बाप कधीच गेला. तो मिलटरीत होता. त्याचा देशी बार होता. लय प्रामाणिक कुणाला पैसा द्यायचा नाय आन घ्यायचा बी नाय. पोलिस त्याला घाबरायचे ‘

‘ म्हणजे ‘ मी

‘ लई टेर्रोर होता. पोलिसाच्या कानाखाली सगळ्यांसमोर मारायचा. तो होता तो पर्यन्त पैसा होता, मी लय लहान होतो. तो गेला, आमची आय धूंनीभांडी

करायला लागली. मी आयला पैसे देतो. तिला काय बी कमी पडून देत नाय. ती पण बैठकीला येते. बहीणपण डॉक्टरकडे कामाला हाय ‘

‘ मुले आजीकडे....’

‘ ती जातात आईकडे. माझी ही बायकोपण आईची काळजी घेते. या बायकोमुळे लय सुख लाभले आन मी बी तिला काय बी कमी पडून देत नाही. वडखळला तिच्या नावाचे घर आहे शेती आहे.‘

‘ मुलांचे कसे काय करणार? ’

‘ मी त्यांच्या शिक्षणाचे पैसे देतो. लहान येतो त्याला ही प्रेमाने देतो. ती मुले विचारतात स्वत:हून, जरि तिच्याकडे रहात असतील तरी. साहेब मला कष्ट करायला लागले तरी चालेल पण मुलांवर अन्याय नाय होऊ देणार. मी भोगले.... त्यांना शिकवणार. ‘

‘अरे हे कष्टाचे काम किती करणार. या रंगकामामुळे काही विकार नाही होत? ’

‘ काय करणार? आता लय कंटाळा आला. आता वाटते रिक्शा घेऊन ती चालवावी आणि सुखाने घरी रात्री झोपावे ’

चवथा दिवस संपला होता काम ही पूर्ण झाले. दीपक साफसफाई करून कपडे बदलत होता. हात पाय धुवून, बाहेर येत त्याने ‘ संपले काम सारे, अहो s वयनी... आता चहा पाहिजे शेवटचा. ताईच्या लगींनाला येणार. कुठे आहे? ’

दीपकला मग पत्रिका द्यावीच लागली. टाळता येई ना. दीपक मधील माणूस आठ दिवसात कळला. माणूस वाईट नसतो परिस्थिती त्याला वाईट मार्गाला लावते. पण आतील माणूस जर चांगला असेल तर संस्कार, संगत नक्कीच वरचढ होऊन सर्व गोष्टीवर मात करतात हे दीपकवरुन कळले. स्वामी विवेकानंदांच्या वाक्याची आठवण झाली ‘ माणसाने आपल्या आतील माणसाला ओळखले पाहिजे आधी. तर जग बदलेल’ .

***********************************

रणांगण दिवाळी अंक २०१८

# निरोप समारंभ

अविनाशच्या शाळेच्या ग्रुपने शाळा/कॉलेज झाल्यानंतर, नोकरी कुठेही असो किंवा लग्न झाले तरी दरवर्षी नवीन वर्षाला भेटण्याचे ठरविले. आपला ग्रुप कायम राहून एकमेकाला विसरायचे नाही असा निश्चय केला. तसेच कोणी कुठलाही व्यवसाय करो पण मैत्रीला बाधा येणार नाही हे सर्व पाहतील, पाळतील असा दृढनिश्चय केला. मंग्याचे काय करायचे हा प्रश्न प्रत्येकाला सतावत होता. जो पर्यन्त मर्यादेत होता तो पर्यन्त कधीतरी न बोलवता येई. त्यालाही ते खात होते पण तो व्यक्त करीत नसे. आता 50 शी उलटली तरी अव्याहत भेटण्याचे चालूच होते. सर्वच आपआपल्या व्यवसायात, संसारात रमले तरी नवीन वर्षाची एकमेकांना भेटण्याची ओढ,परंपरा यात कधीच खंड पडला नाही.अविनाश मोठ्या हुद्द्यावर खाजगी कंपनीत होता तर नामदेव मध्यम स्वरुपाच्या कारखान्याचा मालक झाला होता. विनायक रेडियो टेलीविजन मेकॅनिक. सतीश चांगला पत्रकार लेखक आणि नट झाला. सर्वचजण कामगार वसाहतीत लहानाचे मोठे झालेत.सर्वच नेहमी एकमेकांना त्यांच्या खाजगी वाढदिवस किंवा कुठलाही समारंभ असला तरी भेटत असत.एकमेकाला निरपेक्षपणे मदत करीत. ह्या कार्यक्रमात कुटुंब बरोबर असे. पण त्यांचे वार्षिक नवीन वर्षी भेटणे हे निव्वळ मित्रांचे असे. घरचे कुणीच सहभागी नसे.

त्यात निखळ आनंद, टवाळकी, वात्रटूपणा हाच हेतु केंद्रस्थानी असे. त्यामुळे प्रत्येकजण आपण कोण आहोत हे विसरत असत.काही झाले तरी मैत्रीला तडा जाणार नाही हे कटाक्षाने पहात. ह्या भेटीचे ठिकाण नेहमीच शहराबाहेरचे ठरवीत असत.अविनाशकडे सर्वांना निरोप धाडून एकत्र करणे हे काम होते. मंग्याला कसे बोलवयाचे किंवा बोलवायचे नाही हा प्रश्न होता. मंग्याभायचे रसायन एक वेगळेच प्रकरण होते. अविनाश स्वत:शीच हसला.

‘ हसताय काय स्वत:शी ‘ देविका बायको पहात म्हणाली, मुलेही वडिलांकडे पाहू लागलीत.

‘ नेहमीचेच या मंग्याला नवीन वर्षी बोलवायचे की नाही? नाही बोलावले तरी मैत्रीला जागत नाही असा शिक्का आणि बोलावले तरी समाजाच्या मनात किंवा त्याला ओळखणारे हे आमच्या विषयी काय म्हणतील? ’ हा पेच नेहमीच असतो.‘

‘ आता पर्यन्त काय करीत होतात? ’ देविका

‘ मी नेहमी टाळायचो पण त्याला खबर मिळायचीच. तो येऊन उभ्या उभ्या सटकायचा. शिव्या देऊन जायचा. ’

‘ बाबा तुम्ही त्याला का टाळता? तुमच्या स्टेटसचा नाही का? पण तुम्ही मैत्रीत हा दुजाभाव ठेवत नाही ना............ मग? ’ संचित मुलगा

‘ ते एक वेगळेच रसायन, प्रकरण आहे. कसे सांगू. तो आमचा भाय झाला होता? ’

‘ म्हणजे काय? ‘ संचित सांगण्यासाठी आग्रह करू लागला.

‘ एका अटीवर! ह्याची कुठेच वाच्यता करायची नाही किंवा मित्रांमध्ये बोलायचे नाही. जर कुणी माझे मित्र घरी आले तरी सांगायचे नाही किंवा जास्त विचारायचे नाही तर ‘ अविनाश आठवणीत हरवला....

सुधीर, यशवंत,नामदेव, सतीश, बबन, विनायक आणि मंगेश हे सर्व सरस्वती विद्या मंदिर शाळेतून जुनी 11 वी झालेत. शाळेत असल्यापासून म्हणजे पाचवी यत्ते पासून हे सर्व सदैव एकत्र दूधसेंटर वर एकत्र जमून जाणे हा नेहमीचा दिनक्रम. ग्रुपचे बसण्याचे ठिकाण शेवटची बाके वर्गाच्या दुसऱ्या उघड्या दरवाज्या जवळ. कंटाळा आला की मंग्या हळूच दरवाजा आणि टेबल यात झोपायचा तो एकदम शेजारच्या बिल्डिंग मधील घरात चहाचा वास आला की उठायचा. खास गणिताच्या बाई आल्या की ग्रुपचा व्रात्यपणा सुरू व्हायचा. कुणी आवाज काढीत तर कुणी समोरच्या बाकावरील मुलांना बाईंचे लक्ष फळ्याकडे असले की खडू फेकून मारीत. सुधीर, यशवंत,नामदेव, सतीश, विनायक हे अभ्यासू तसेच खेळात ही पारंगत होते. बबन हा चित्रकलेत पारंगत होता. त्याने शाळेला चित्रकलेस्पर्धेत नाव मिळवून दिलेच पण त्यालाही बरीच बक्षिसे मिळाली. सतीश आणि यशवंत यांना साहित्य, नाटक, सांस्कृतिक कार्यक्रम यात जास्त अभिरुची होती.मंगेशला मंग्याभाय असेच सर्व म्हणायचे. मंग्याभाय तब्येतीने आडदांड होता. अभ्यासात डोके जरी असले तरी यथातथा पण पास होत असे. घरची परिस्थिती बिकट. वडील गिरणी कामगार, तीन भाऊ आई असा परिवार. गिरणी संपामुळे वडील घरी बसले ते कायमचे. घर

सांभाळण्यासाठी सकाळी दूध टाकणे, पेपर टाकणे असे काम करून घराला हातभार लावी. आई दुसऱ्याची कामे करी. घरात कुणीच लक्ष द्यायला नव्हते. बाकीची भावंडे ही यथा तथा होती पण ती कुणाच्या अध्यात नाही की मध्यात. समजून अभ्यास करीत. तब्येतीने चांगला असल्यामुळे त्याची वट होती. मुले ही टरकून असत. नियमित तो व्यायाम शाळेत जात असे. तो क्रिकेट आणि कबड्डी खेळात तरबेज होता. त्यानेही शाळेला अनेक मेडल मिळवून दिलेत.मैत्रीत तो पक्का आणि माणूस म्हणूनही फार चांगला, मदतीला धावणारा. शाळेत दोन ग्रुप होते. दुसऱ्या ग्रुप मध्ये तिघेजण होते. गणपत, दिनेश व प्रकाश. तिघेही अभ्यासात बरे होते पण त्यातील दोघे भांडखोर होते, तब्येतीने चांगले होते. नेहमीच अभ्यासात किंवा खेळात चढाओढ करीत त्यातून खटके उडत.पीटीच्या खेळात मुद्दामून जोरात मारत. नेहमीच मंग्या सोडून एकेकट्याला गाठून खोड्या काढून टपलीत मारून पळत. हे मंग्याला कळले तेव्हा त्याने शाळेत येताना दोघांना रस्त्यात गाठून बदडले. प्रकरण प्राचार्यापर्यंत गेले. त्याच्या आईवडिलांसमोर त्याला केबिन मध्ये बोलावले......

‘ अरे तू खेळात हुशार. एव्हढा चांगला मुलगा. असे का वागलास? ’ प्राचार्य. वडिलांनी डोळे मोठे करून बघितले. ‘ सर...... हे तिघे...... नेहमीच आमच्या ग्रुपची खोडी काढून, मला सोडून एकेकट्याला गाठून मारायचे. माझे मित्र मला म्हणाले म्हणून मी त्यांना जाब विचारला. ते मलाच उलटा दम देऊ लागले. आईबहिणी वरुन शिव्या देऊ लागलेत. म्हणून दोघांना हाणले’ मंग्याने समर्थन केले

‘ अरे पण तुझी त्यांनी खोडी नाही काढली ना? ’ प्राचार्य

‘ सर आमचा ग्रुप आहे. आम्ही कुणाच्या वाटेला जात नाही. पण हे लोक आमच्यावर खार खातात कारण काय माहीत नाही. माझ्या ग्रुप मधील कुणाला मारले हे मला नाही आवडायचे ‘ मंग्या भोळेपणाने म्हणाला. ’ म्हणजे तू काय नेता आहेस काय मुलांचा ‘? प्राचार्य

‘ सर मी मैत्रीला जागणारा आहे. मी त्यांच्या घरी अभ्यासाला जातो तेव्हा त्याची आई वडील शिकवतात, माझी घरची परिस्थिती नाही. एकदा दोनदा माझ्या फीचे पैसे सतीशच्या आईने दिलेत. जर मला कुणी फुकट शिकवत असेल तर मी त्यांना अडचणीत मदत करू नको? ‘ मंग्या तसूभर मागे हटला नाही की बोलण्यास घाबरला नाही. प्राचार्यांनाही ह्याचे अप्रूप वाटले. वडिलांशी बोलून त्याला समज देऊन सोडून दिले.

मंग्याचे मारामारीचे प्रकरण वाढू लागले. प्राचार्य त्याला, मुलगा भोळा, खेळात चांगला म्हणून समज देऊन सोडून देत. घरी कुणी लक्ष देत नाही. शाळा काही सारखे लक्ष देऊन त्याला सुधारू शकत नाही. मंग्या राजकीय पक्षाशी सोयरीक करू लागला. त्यांच्या कार्यक्रमाला जाऊ लागला. जेथे हे कामगार वस्तीत राहायचे तेथे सर्व प्रकारचे लोक राहत असत, त्याचा सर्व तऱ्हेचा मित्र परिवार वाढू लागला. पुढारी गर्दीसाठी चार लोक असावेत म्हणून पैसे देऊन घेऊन जात. मंग्याचे व्यक्तिमत्व डोळयात भरणारे असल्यामुळे त्याला ही कामाचे पैसे देऊन त्याच्या कडून पोस्टर

लावणे, सभेची व्यवस्था बघणे इत्यादी जी कामे सोपवली जायची तो करायचा. जे पैसे मिळत ते तो आईकडे द्यायचा. कधी कधी कुठेतरी माल पोचवण्यास ही सांगितले जाई. तपशील कळायचा नाही महत्वाचे तेव्हढे सांगितले जायचे. ते तो चार पैसे घरासाठी मिळतील म्हणून गपचूप करायचा. यामुळे तो नगरसेवक, आमदार यांच्याबरोबर ऊठबस करू लागला.अभ्यासाकडे दुर्लक्ष होत असे.

‘ अरे तू हल्ली अभ्यास करायला जात नाही तो अविनाश म्हणत होता.’ वडील

‘ हो बाबा. काय करू. चार पैसे जास्त मिळावेत घरी उपयोगाला येतील, बाकीच्या भावांची फी पुस्तके येतील म्हणून जातो. काही बाही काम करतो ‘ मंग्या

‘ अरे पण तू शिकला नाहीस तर मोठा कसा होणार? शाळेत जातोस ना? वडील

‘ मी कसाही 11 वी होणारच त्याची काळजी करू नका. शाळेत जातो मी. पण मला नोकरी नाय करायची’ मंग्या शाळेत यायचा पण उशीरा यायचा. कधी कधी वर्गात झोप ही शेवटच्या बाकावर काढायचा.

‘ मग........काय करणार? ’ वडील ‘ काही तरी धंदा वेगळा ज्यातून चार लोकांना मदत होइल,‘

मंग्या परीक्षेचा अभ्यास करू लागला. त्याला गणित काही जमे ना.सतीशच्या वडिलांनी जे इंग्रजी शिकवले आणि त्याच्या आई भूमितीची प्रमेय पाठ करून घ्यायची. बाकी तो गाईड घेऊन पाठांतर करे. त्यावर तो पास होईल इतका आत्मविश्वास होता. मंग्याचा वर्गातील ग्रुप अभ्यासू जितका होता तितकाच वात्रट होता. त्यांना शिक्षकांचे/बाईंचे कुणाचे काय चालते हे बरोबर कळायचे. मंग्या मात्र ते लक्षात ठेवून देई. बाई त्याला वर्गात चार मुलान समोर एकदा असेच गणित सोडवण्यास सांगितले ते काही जमले नाही. तेव्हा बाई म्हणाल्या ‘ तुझे कसे होणार? कसा पास होणार? ’

‘ त्याची काही चिंता नाही. मला गणितात 35 पेक्षा जास्त मार्क नकोत त्या पेक्षा कमी ही घेणार नाही ‘

‘ अरे कसे जमणार तुला काहीच गणित येत नाही ‘ बाई

‘ मी होणारच. काय करायचे आहे गणित घेऊन. मला ते पुढे उपयोगी पडणार नाही. कसे तरी जमवेन. पण पास होईन. ’

‘ अरे कसे? ’ बाईने आपला हेका सोडला नाही. मंग्याचा वात्रटपणा जागा झाला. ‘ तुम्ही दोन गुणिले दोन चार करता पण मी पाच करतो ’

‘कसे रे? ’ बाई ‘ अहो तुम्ही गंभीर चेहऱ्याच्या......कधी प्रेम केले नाही पण तुमच्या कडून प्रेम करून घेतले ना....त्यांनी....पीटीच्या सरांनी? ’ मंग्या बेधडक बोलून गेला. वर्गात हशा पिकला. बाई लाजेने चूर झाल्या. मुले आता वयात आली

होती. त्यातून आता शेवटचा महिना. नंतर मुले शाळेचा उंबरठा ओलांडून कुणी कॉलेज मध्ये, कुणी वेगळ्या व्यवसायात जाणार होते. सर्व शिक्षक काही बोलू शकत नव्हते. नेहमी प्रमाणे बाईंनी मंग्याला दोन छड्या मारून वर्गाबाहेर उभे केले.

बोर्डाची परीक्षा मार्च मध्ये असायची.त्यामुळे शाळेचा शेवटचा दिवस फेब्रुवारी मध्ये असायचा. प्राचार्य बाहेरच्या प्रतिष्ठित व्यक्तिला बोलावून विध्यार्थ्यांचा निरोप समारंभ करायचे. यावेळेला आमदार निरोप समारंभाला येणार होते. आमदार यांच्याविषयी मुलांना काहीच माहिती नव्हती पण ते एक मोठी वजनदार आसामी, प्राचाऱ्यांच्या कोल्हापूर गावाकडील आहेत येव्हढीच माहिती. वर्गातील मुलांमध्ये एकीकडे शाळेतून बाहेर पडून वेगळ्या विश्वात प्रवेश करणार म्हणून उत्साह होता दुसरीकडे शाळेचे वातावरण मित्रपरिवार यांना मुकणार हे वैषम्य ही होते.

शाळेच्या निरोप समारंभाचा दिवस उजाडला. सर्व नटूनथटून आलेत. प्राचार्यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. दिसायला पहिलवान आणि राकट होते. मंग्याचे नेटवर्किंग चांगले होते मंग्यांनी त्यांची पत्रिका अगोदरच ग्रुपमध्ये मांडली होती तो गावाकडचा पोहचलेला आसामी आहे ही माहिती सांगितली. पाहुण्यांनी त्यांचे भाषण करण्यागोदर प्रत्येक विद्यार्थ्याला स्वत:ची ओळख आणि त्याला कोण व्हायचे आहे, का व्हायचे हे थोडक्यात सांगण्यास सांगितले.प्रत्येकाने हवेत बाण मारत कोणी सायन्स, कोणी इंजिनियरिंग, कोणी आर्ट्स असेच सांगितले. मंग्याच्या ग्रुपमध्ये सर्वांनी बहुतेकांनी हेच सांगितले. सतीशने त्याला मराठी, तत्वज्ञान घेऊन

प्राध्यापक पत्रकार व्हायचे आहे हे सांगितले. आमदार थोडे हसले त्यांना वेगळे ऐकायला मिळाले म्हणून त्यांनी खोलात जाऊन विचारले ‘ का व्हावेसे वाटते? ’

‘ नेहमी मला हे विश्व कसे निर्माण झाले,मन म्हणजे काय असे प्रश्न पडतात. पत्रकार ह्या पेशामुळे समाजाच्या सर्व स्तरात जाऊन शिकायला मिळते. व्यक्तिमत्व प्रगल्भं होते. ‘सतीशने मोठ्या शब्दात हवेत बाण मारले. वात्रट मुले एक सुरात म्हणालीत ‘ वा विवेकानंद ‘ ‘कुठल्या चॅनलवर जाणार? ’

आता मंग्याची वेळ आली. सर्वच हा काय बोलतो हयाकडे लक्ष लागले. शिक्षक व प्राचार्य ह्यांची ही उत्सुकता वाढली. त्याचा व्रात्यपणा आणि बेधडक स्वभाव माहिती होता.

‘तू रे बाळा ‘आमदार त्याच्याकडे अंगुलीनिर्देश करून म्हणाले. मंग्या खांदे उडवत केसावरून हात फिरवत आजूबाजूला बघत म्हणाला, ‘ मला की नाही नगरसेवक आमदार होऊन लोकांची सेवा करायची आहे’ त्याने हे उच्चारले अन सगळीकडे हास्यकल्लोळ उडाला. प्राचार्यांनी कपाळावरचा घाम पुसत कधी पाहुण्यांकडे कधी त्याच्याकडे बघू लागले. आमदारांनाही हसू आले. सर्वांना ह्या दोघांची जुगलबंदी सुरू होणार असे वाटू लागले. तोच आमदारांनी ‘ का रे? असे का? ’

‘त्याला जास्त शिक्षण लागत नाही. माझ्याकडे पैसे नसल्यामुळे मी काही पुढे शिकू शकणार नाही ‘ मंग्या. वर्गात हशा पिकला. आमदारांनाही बोलावेसे वाटू लागले

‘शिकूनही होता येते ना? तुला माहिती आहे नागरिकांच्या समस्येसाठी मोर्चा काढावा लागतो, कधी पोलिसांच्या लाठ्या काठ्या खाव्या लागतात प्रसंगी जेल मध्ये रहावे लागते, वेळेचे बंधन नसते कुणी कधी बोलवतो’ .

‘ हल्ली बहुतेक पुढारी कमी शिकलेले असतात. आपला कायदा कुठे म्हणतो शिकायला पाहिजे. साहेब, मोर्चा मध्ये गेलो होतो, जेल मध्ये काय आमच्या साहेबांनी म्यानेज केले म्हणून लगेच बाहेर आलो. ते काय नवीन नाही’ . साहेब सर्वांना माझ्याच कडे पाठवतात. वेळ काय... चालायचेच. ‘ मंग्या......आता मात्र आमदार ग्लास मधील पाणी पीत कपाळावरचा घाम पुसूत म्हणाले ‘ नोकरी पैसा कसा मिळवणार. घरचे कुणी मागे असले पाहिजे किंवा आर्थिक स्थिरता ‘

‘ त्याचे काय अहो........ तुम्ही एकदा का त्या चेन मध्ये घुसला की सर्व आपोआप टक्केवारी मिळत जाते. त्यात काय? ’

आता मात्र आमदार बोलायचे बंद झालेत. कुठून याला प्रश्न विचारत गेलो असे झाले असेल. प्राचार्य तर अवाक झाले.मुलेही अवाक झालीत.प्रत्येकाच्या चेहऱ्यावर हा कधी मोर्चा, जेल मध्ये गेला होता असा प्रश्नार्थक भाव उमटला. आमदारांनी पुढच्या मुलाला विचारले. भराभर ‘ कोण व्हायचे आहे ‘ सत्र संपविले.

सर्वांचे लक्ष आता पाव्हणे काय बोलतात ह्या कडे लागले. त्यांनी ‘मला बाहेर मिटिंगला जायचे आहे त्यामुळे जास्त बोलणार नाही. परंतु कराल ते मन लावून करा.

यशस्वी व्हा ‘ एव्हढेच बोलून प्राचार्याकडे पाहून निघायची खूण केली. प्राचार्य यांनी दिलेला पुष्पगुच्छ देऊन ते जायला निघाले. प्राचार्य यांनी मुलांकडे पाहत कार्यक्रम संपल्याची घोषणा केली. मंग्या क्लासचा हीरो झाला. मुलांना आणि शिक्षकांना वाटले मंग्याचे काही खरे नाही. प्राचार्य ह्याची चांगली वाजवणार..प्राचार्यांनी लगेच मंग्याला केबिनमध्ये बोलावले. बरोबर वर्गाच्या शिक्षक होत्याच.

‘ मंग्या....काय हे असे बोलतात? ’

‘ मी काय चुकीचे बोललो सर?त्यांनी विचारले ‘ काय व्हायचे आहे’ मी खरे ते सांगितले.तुम्हीच प्रामाणिकपणे बोला असे सांगितले होते. खोटे कसे बोलू? तेच पुढे पुढे विचारत गेलेत त्यात माझी काय चुकी? मी उत्तर दिले नसते तर खोटा ठरलो असतो. खोटे बोलू नये, खोटे करू नये, खोट वागू नये या शाळेच्या घोष वाक्याला डाग नसता का लागला? ’ प्राचार्य पुरे गारे गार झाले. कपाळावर हात मारत,

‘ अरे गधड्या तू असे बोललास आणि माझे शाळेचे होणारे काम होणार नाही. गावी पुन्हा नाचक्की’ प्राचार्य

‘ मला काय माहीत...........ते तुमच्या गावचे आहेत....शाळेचे काम.....शाळेतले संस्कार असे पर्यन्त पाळले पाहिजेत’

‘ म्हणजे नंतर......... तू........हे सर्व......? ’

‘ पुढारी झालो तर सिस्टमचा आदर्श...........त्यांचे घोष वाक्य नको पाळायला? तुम्ही आणलेले पाव्हणे ह्याच मालिकेतील आहेत.’ मंग्याने हे वाक्य उच्चारताच सरांनी त्याला हात जोडून बाहेर जाण्यास सांगितले.

बोर्डाच्या परीक्षा झाल्या. मंग्या सांगितल्याप्रमाणे पास झाला. काही वर्ष तो भेटत होता, नवीन वर्षाच्या कार्यक्रमाला हजेरी लावून जायचा. कधी कधी सर्व खर्च तोच करायचा.ग्रुप मधील मुले कॉलेज संपवून नोकरी, व्यवसायाच्या निमित्ताने दूर दूर विखुरली. काही वेळा मंग्या ग्यांगवार मध्ये अडकला, तुरुंगात गेला,तुरुंगातून सतीशने आपल्या पत्रकार ओळखीने त्याला सोडवले. नगरसेवक झाला.,चांगली कामे करता करता, दहशत बसवू लागला. काहींना त्यांनी देवळे बांधून दिली तर काहींच्या झोपड्या सरकारी जागेवर उभ्या केल्या. हे तो कसं करायचं हे कुणालाच माहिती नाही. काहींचा तो देव झाला तर काहींचा शत्रू. एक पथ्य त्याने पाळले त्याच्या एरिया मध्ये कुठल्याही मुलीला किंवा स्त्रियांना त्रास होईल असे काही केले नाही. ज्याने कुणी केले त्याला अद्दल घडविली. काहींची तुटलेली लग्न जमविली. असा मंग्या त्याच्या आईवडिलांपासून, कुटुंबापासून कायमचा दुरावला. शाळेला मात्र तो विसरला नाही. शाळेसाठी भरघोस मदत देणगीच्या रूपाने केली. कुटुंबापासून जरी दुरावला तरी त्याने आईवडिलांच्या नावे गावी शाळा कॉलेज उभे केले.

अविनाश मध्येच फोन आला म्हणून थांबला. सतीशने फोन केला होता. महाबळेश्वरला सर्वांनी जाण्याचे ठरविले. मंग्याचा कुणालाच ठावठिकाणा नव्हता. प्रत्येकजण त्याचे नाव ऐकत होते. त्याचे प्रताप कानावर येत होते. उगीच कुठे

अडकायला नको म्हणून सर्वानुमते त्याला न बोलवण्याचे ठरले.अविनाश बाहेर गेला फोन घरी ठेवला होता. कुटुंबाला सर्व हकीकत कळली. त्यांनी ही अविनाशाला शांत राहण्याचा सल्ला दिला. अविनाश घरी नसताना त्याचा फोन वाजला. नाव दिसत नव्हते. पलिकडून आवाज ‘ देविका वहिनी मी मंग्या भाऊजी बोलत आहे. कसे आहात तुम्ही सर्व? आमचा पुतण्या काय म्हणतो? अभ्यास कसा चालला आहे. सांगा चांगला शिक. या मंग्याकाका सारखा होऊ नकोस ‘

‘ सर्व ठीक आहे. हे आताच खाली बाहेर गेलेत ‘ देविका

‘ असू द्या असू द्या. अविनाश आणि ग्रुपला सांगा मी महाबळेश्वरला त्यांना कसे ही भेटून जाईन.’

‘ बर बर….सांगेन हां ‘ पलिकडून फोन कट झाला. समोर अविनाश ऐकत उभा होता. त्याने सर्व हकीकत ग्रुप मध्ये कळवली. महाबळेश्वरला जायच्या दिवसा आधी दोन दिवस ‘ ख्रिसमस पार्टीत गोळीबार – थोर समाजसेवक मंगेश यांचे निधन ’ पेपर मध्ये बातमी झळकली. पेपर बघत अविनाश उभा होता.

***************

रणांगण दिवाळी अंक २०१८

# भोग

'आई....! किती वेळ आंघोळीला लागतो. आटपा लवकर. येताना तुमचे कपडे धुवून टाका. मला शाळेला जायचे आहे' . यशोदा... मंदाकिनीच्या धाकटया सुनेने नेहमी प्रमाणे आज्ञेच्या सुरात सूचना दिली. मंदाकिनी वय वर्ष 79. घरात वॉशिंग मशीन असूनसुद्धा तिने असे म्हणावे हे मंदाकिनीना खटकले. सुरेश गेल्यानंतर दहा दिवसाच्या गणपतीच्या सणात नेहमी धाकट्या मुलाकडे येतात. इतर वेळी मात्र एकट्याच ठाण्याला वाडीवजा कौलारू जुन्या चाळीत पूर्वीपासूनच 60 वर्षे तिथे राहत असत.आयुष्यच तेथे गेलेले त्याबरोबर आठवणी चिकटलेल्या. दुसरीकडे जास्तकाळ चैन पडत नाही.

' आले ग.... जरा उठायला वेळ लागतो. वय झाले ना. होत नाही काही.'

' अग तू काय धुते कपडे···. तुझे वय आहे का? ' योगेश

मंदाकिनीना चार मुले, रेखा, सुरेखा दोन मुली आणि संजय आणि योगेश दोन मुलगे. संजय सर्वात मोठा. दोन्ही मुलींची लग्न झालेली. जावई चांगले मिळाले. त्यांचे कौतुक दोघे सर्वांना सांगत. संजय 11 वी झाला होता. थोडेबहुत typing येत होते. दिसायला चांगला होता. दोन्ही मुलांची अभ्यासात गती विशेष नव्हती तरी सुरेश मंदाकिनीला त्यांचा अभिमान होता. सुरेशला सिनेमा हिन्दी गाण्यांची आवड. तिच मुलांमध्ये भिनलेली. कधी मधी मेव्हण्याबरोबर सिनेमाला जाणे व्हायचे. दोन्ही मुलांचे बोलणे हे फिल्मी स्टाइलचे होते. सिनेमा गाणी चांगली पाठ होती. शाळेत संजय भाग घ्यायचा.सुरेश त्याचे फार गोडवे आपल्या मित्रात व नातेवाईकांच्याकडे गायचा. मामा आपल्या भाच्यांना चांगले कपडे आणून देत. योगेश छोटीमोठी कामे करत नुकताच ओळखीने कारखान्यात कामगार म्हणून लागलेला. आर्थिक दृष्ट्या स्थिरावत होता. त्याचे ही लग्न करून दिले होते. जागेच्या अडचणीमुळे तो वेगळा भाड्याच्या खोलीत अंबरनाथला रहात होता. सूनही शाळेत कारकुनाची नोकरी करणारी मिळाली. त्यालाही मुलगी होती.

‘ मी संजयचा मित्र गोव्याहून बोलत आहे ‘ गणेश ‘ कोण बोलत आहे ‘? टेलिफोनवरून पलीकडून आवाज आला

‘ मी संजयचा बाबा. बोला ‘ सुरेश जरा काळजीत बोलला.

मंदाकिनीच्या मनात पाल चुकचुकली. हृदयाचे ठोके वाढले. ती ही शेजारी गेली.

‘ संजयची तब्येत बरी नाही. आम्ही विमानाने तासाभरात पोहचत आहोत. आमच्या बरोबर डॉक्टर ही आहेत. तुम्ही फक्त त्याला कुठल्या हॉस्पिटल मध्ये घेऊन येऊ एव्हढे सांगा. ॲम्ब्युलेन्सची सोय केली आहे.’

‘ अहो काय झाले? ‘ सुरेश ‘ बोलायला वेळ नाही. फ्लाइट आता उड्डाण करेल. लवकर हॉस्पिटलचा पत्ता सांगा किंवा एसएमएस करा. सुरेश बर म्हणायच्या आत लाइन कट झाली. सुरेशने मुलुंडच्या घराजवळील हॉस्पिटलचा पत्ता एसएमएस करून पाठविला. त्याने डॉक्टरला फोन लावून व्यवस्था केली. मेव्हणा विनायकला फोन करून त्याला घरी बोलावले.

‘ अहो काय झाले? ’ मंदाकिनी

‘ काही माहिती नाही पण संजयच्या मित्राने हॉस्पिटल मध्ये ताबडतोब घेऊन जावे लागेल असे सांगितले.मी आपल्या नेहमीच्या डॉक्टरच्या हॉस्पिटलचा पत्ता दिला आहे.’ मंदाकिनी सैरभैर झाली. जे बोलली ते खरे झाले ही अशुभ बातमी कानावर आली. ती घाबरून डोक्याला हात लावून बसली. पुन्हा फोन वाजला. शेजाऱ्यांनी सुरेखाच्या नवऱ्याचा फोन आहे असे सांगितले. सुरेखाही गरोदर बाळंतीन होस्पिटला होती. तिची पहिलीच डेलिवेरी. कधीही होईल अशी अवस्था होती.

‘ हा बाबा. वाईट बातमी आहे. अहो कसे सांगू… तो गहीवरत बोलत होता. सुरेखाची मुलगी झाल्या झाल्या गेली.’ सुरेशला आता मंदाकिनीला काय सांगायचे

हा प्रश्न पडला. त्याने जावयाला संजयची बातमी हळू सांगितली. सुरेखाला आता कळू नको देऊ असेही बजावले.'

'अग... असा धीर गाळू नकोस. आता वसंताला फोन लावून बोलावं. आता धावाधाव करण्यास माणूसबळ हवे.

'रेखा, सुरेखा, जावईबापू? '

त्यांना ही कळवावे लागेल. ते नंतर कळवू.मी आणि विनायक हॉस्पिटलमध्ये जातो. तू आणि वसंत मागाहून ये.' सुरेखाची बातमी त्याने लगेच सांगितली नाही. पण त्यालाही राहवले नाही. नंतर त्रास नको. तिला जवळ घेत सांगितली. तिला हा धक्का होता. पण पोटच्या गोळ्याचे दु:ख त्याहून मोठे होते.

सुरेश ६५ वर्षे वयाचा. तरी शांतपणे वास्तवता स्वीकारत मंदाकिनीला समजूत घालूत म्हणाला. कुणाला काहीच कळे ना संजयला काय झाले आहे. तो 9 वर्षापूर्वीच सरकारी इंजिनियरिंग कारखान्यात ठाण्यात जवळच नोकरीला टायपिस्ट क्लार्क म्हणून लागला होता. संजयला सिगारेटची सवय लागली होती. कधीमधी तो मुलांबरोबर पार्टी मध्ये बियर घेत असे हे घरी माहीत होते. कारण तोच येऊन सांगे. दोघे ही त्याला व्यसनाच्या आहारी जाऊ नको असा इशारा देत असत.बहिणी साडू आणि मुली जावई हॉस्पिटल मध्ये पोहचले. सर्व संजय आणि त्यांच्या मित्रांची वाट पहात हॉस्पिटलच्या एमर्जन्सि वार्डजवळ उभे राहिले.

ॲम्ब्युलेन्स आवारात पोहचली. संजयला स्ट्रेचरवरून एमर्जेन्सि रूम मध्ये नेले. संजयचे मित्र, सुरेश आणि विनायक काऊंटरवर फॉर्म भरू लागले. सुरेशने सही करून दिली. फॉर्म भरताना डॉक्टर यांनी सुरेश आणि त्याच्या मित्राला काय झाले, कुठल्या डॉक्टरकडे प्राथमिक उपचार काय काय केले ही माहिती विचारली. सुरेशने गोव्याहून आलेल्या डॉक्टरला माहिती सांगावयास सांगितले. सर्व कुटुंबीय एमर्जेन्सि रूमच्या बाहेर उभे राहिले. मंदाकिनी यांचा धीर खचला. त्यांना काही कळेच ना काय झाले आहे. त्या संजयच्या मित्राला खोदून खोदून विचारू लागल्या तेव्हा कुठे गणेश बोलू लागला.....' अहो आम्ही दिवसभर फिरून रात्री पार्टी केली आणि जेवलो. काही वेळाने संजय ओकायला लागला. कसे तरी डोळे फिरवायला लागला म्हणून स्थानिक हॉस्पिटलच्या डॉक्टरला बोलावले.त्यांनी काही प्रमाणात जेवणातून विषबाधा झाली असावी असे निदान केले. त्यांनी औषोधोपचार केले. आम्हीच निर्णय घेतला कुठल्याही परिस्थितीत मुंबईला लगेच निघून फॅमिली डॉक्टरकडे दाखवू,तेही तुमच्या समोर. खर्चाची तुम्ही चिंता करू नका. आम्ही कंपनीत कळवले आहे. आम्ही मित्र ही सर्व मदत देवू.'

सुरेश आणि मंदाकिनीला काहीच कळेना. मंदाकिनी म्हणाली, ' अरे विषबाधा असेल तर इतरांना का नाही झाली. हयालाच का असे झाले?' गणेशकडे उत्तर नव्हते. तो त्याचा मित्र आणि बरोबर आलेला डॉक्टर एकमेकांकडे बघू लागले.

' आई तुम्ही म्हणता तेही खरे आहे पण काहीच कळत नाही ' गणेश

' डॉक्टर तुम्ही काय पाहिले? '

‘ वेळ रात्रीची होती.त्यातून मुख्य निदान करण्यास वेळ नाही मिळाला. पण हे विष जास्त भीनत जाऊ नये, त्याचा गंभीर परिणाम पसरू नये म्हणून तातडीचा उपचार केला. यांनी येथे आणण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे एमर्जन्सि ग्राउंडवर विमानाची तिकिटे काढून लगेच आलो.’

‘ अरे गणेश.... मी आता निघतो माझे परतीचे विमान आहे पोहचण्यास वेळ लागेल. आई बाबा काही काळजी करू नका. तसे काही सिरियस नाही. होईल बरा.’ डॉक्टर बाहेर जाऊ लागले. डॉक्टरने बाहेर पडताच कपाळावरचा घाम पुसत सुस्कारा टाकला “सुटलो जबाबदारीतून.. गणेशजवळ पुटपुटले” गणेश आणि त्याचा मित्र त्यांना पोहचवण्यास बाहेर आला. बाजूला कोपऱ्यात त्यांची फी त्यांना देऊन,’ अहो डॉक्टर, तुमच्या निदानात काही वेडेवाकडे लिहिले नाही ना? आम्ही सारेच फसले जाऊ “

‘ काही नाही. काळजी करू नका’ . डॉक्टर

‘ तुम्ही आमच्या दोस्तांचे डॉक्टर आहात. ते तुमच्याकडे येतात......कसले तरी इंजेक्शन घ्यायला......’’डॉक्टर थोडे त्रासिक झाले. टॅक्सी मिळते का पाहत उभे राहिले.

संजयची बातमी वाडीत पसरली होती. मंदाकिनीच्या इमारतीमधील मैत्रिणी भजनासाठी हॉस्पिटलच्या गेटजवळून जात असताना गळयात टेथेस्कोप

अडकवलेला डॉक्टर व गणेश सुरेशला गेटवर आल्याचे पाहिले. पुन्हा बोलणे झाल्यावर सुरेशला हॉस्पिटलमध्ये आत जाताना पाहिले. सुरेशबरोबरची ती दोघे गेटच्या बाहेर उभे राहून बोलताना, जवळून जात असताना त्यांना अस्पष्ट ऐकले. म्हणून त्या थोडावेळ बाजूला थांबल्या. ते दोघे पुन्हा श्री सुरेश व सौ मंदाकिनी यांच्याकडे आत जाऊन काहीबाही बोलताना, धीर देताना पाहिले. मैत्रिणी चक्रावून गेल्या. हे आत बाहेर जाणे काय चालू आहे? मैत्रिणीमधील सुनंदाच्या विचक्षणं नजरेने दोघांचे संशयातीत बोलणे, चेहऱ्यावरील भाव पाहून काही घोळ असावा असा संशय आला. त्यांची जवळ उभे राहून बोलण्याची पद्धत विचित्र वाटली. ती पुन्हा थांबून त्यांच्या जवळ जात, त्यांचे लक्ष नाही असे पाहून,काही ऐकायला मिळते का हे पाहत होती. तो पर्यन्त डॉक्टर निघून गेले होते. गणेश पुन्हा सुरेशकडे जायला हॉस्पिटलमध्ये वळल्याचे पाहिले. सर्वच जणी तिथेच थांबल्या. सुनंदा व तिच्या मैत्रिणी मंदाकिनीला भेटण्यास कधी जायचे हे ठरवू लागल्या. सुनंदा मध्येच म्हणाली ‘,अग माझा मुलगा संजयच्या मित्राला ओळखतो. त्याच्या ग्रुप मधील दोघे वाईट सवयीचे आहेत. ते सिगरेट मधून नशा घेतात असे कळले. त्यांनी तर काही घातले नसेल दारुत.? ’ नमिता ‘उगीच काही बाही बोलू नये तो संजय चांगला आहे. त्याला वाईट सवयी नाहीत. मंदाकिनी व त्यांच्या मिस्टरांनी फार खस्ता खाल्या आहेत आणि उतारवयात असे व्हावे हे वाईट वाटते. ही काही बोलायची वेळ नाही ‘

‘ अग पण मी त्याला सिगारेट पिताना पाहिला आहे. तसेच माझ्या मुलाने एकदा बार मधून बाहेर येताना पाहिले आहे. आपल्यात बोलत आहोत. ‘

‘सिगरेट काय......कधी तरी घेणे काय.. ह्याला वाईट हल्ली म्हणता येत नाही. तो एक वयाचा शौक आहे. हे कॉमन आहे. आमचे हे..... मुलगा ही पितात... कधी मधी ऑफिसच्या पार्टीत. पण तो स्वभाव होऊ नये सवय जडू नये’

‘ अग उगाच का चर्चा करताय? आपण केव्हा जाऊ भेटायला.. हॉस्पिटलमध्ये... हे ठरवा’ योगिनीने निरर्थक बडबड थांबविली. सर्वांनी संध्याकाळी हॉस्पिटल मध्ये जायचे ठरविले.

सुरेशने गणेशला गोव्यातील डॉक्टरच्या फी विषयी विचारले. गणेशने ‘ अहो काका तुम्ही काळजी करू नका. हॉस्पिटलचा खर्च कंपनी करेल. कळविले आहे आम्ही.

‘ अरे गोव्यातील सर्व खर्च ‘

‘ त्याची काळजी नको आम्ही मित्रांनी केला आहे. आमचीपण मित्र म्हणून जबाबदारी आहे ना... काही. आम्ही बघून घेऊ’

तितक्यात डॉक्टर ICU मधून बाहेर आलेत. ‘ सुरेशने विचारले काय झाले आहे? ’

‘ अजून तो शुद्धीवर.....डॉक्टर अडखळले ‘ सुरेश व गणेश डॉक्टर ना बाजूला घेऊन गेले. त्यांना खोदून खोदून विचारू लागले.

‘ आमचे प्रयत्न चालू आहेत. रक्ताची तपासणी रिपोर्ट आल्यावर कळेल तो पर्यन्त नाही. अजून तो शुद्धीवर येत नाही. त्याला औषधं दिली आहेत.......त्यामुळे काहीच आता बोलू शकत नाहीत. देवच आता सर्व आहे. विष नसावे दुसरेच काही असावे. तो कोमात जावू नये यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

सुरेशला काय डॉक्टर बोलत आहेत हे कळेना. तो ही अस्वस्थ झाला. गणेशने हे ऐकताच तो ही धास्तावला. कोठून ही पार्टी केली असे झाले, उगीच बाहेरील मित्रांना बरोबर घेऊन गोव्याला त्यांच्या घरी उतरलो. सुरेशला त्याने कामाचे कारण सांगून ‘मी जरा घरी जाऊन येतो.तुम्ही काळजी करू नका. कंपनीत कळविले आहे सारे’ काढता पाय घेतला. बहिणी मंदाकिनीला आधार देत होत्या. सारे हॉस्पिटलमध्ये रेपोर्ट्स केव्हा येतील याची वाट पाहू लागले. संजयच्या कंपनीतले सर्व अधिकारी भेटायला आले. त्यांनी ही सुरेश मंदाकिनी यांना धीर दिला. कंपनीच्या हॉस्पिटलच्या स्कीम योजनेअंतर्गत कंपनी सर्व खर्च करेल असे आश्वासन दिले. शिवाय काही खर्चाला रक्कम त्यांच्या हातात ठेवली. उतारवयात हाताशी आलेला मुलगा एकाएकी आजारी पडावा हे दु:ख न भरून येणारे होते. त्यातून संजय मोठा मुलगा. त्याच्या लग्नाची गोष्ट ही सुरू झाली होती. काळाने हा घाव घालावा असे काय पाप केले हे सारखे मंदाकिनी जो येईल त्याला सांगत होत्या. बहिणी, साडू रेखा, जावई, सुरेश मंदाकिनीला आधार देत होते. हॉस्पिटलच्या खर्चाचे सर्व पाहत होते.जावई चांगले मिळाले होते. त्या प्रत्येकाला जावयांची कौतुके सांगत होत्या.

गणेश धास्तावला होता. डॉक्टरचा रक्ताचा मेडिकलचा रीपोर्ट काय येतो याची चिंता लागून राहिली. गोव्याला ऑफिस मधील संजय, उमेश धरून तिघे आले होते. तर दुसरे दोघे गणेशचे गाडीतील मित्र होते. ते बँकेत नोकरीला होते. दोघेही गोव्याचे होते. त्यांची शेतीवाडी. त्यांच्याच बंगल्यावर उतरले होते. तेथून कलंगूट बीच जवळ होता. दिवसभर ते गोव्यात फिरून संध्याकाळी सर्व बीचवर गेले. गणेशच्या मित्रांनी मटन पाव विस्की, काजूफेणी आणली. सारेजण बीचवर एका कोपऱ्यात चांगल्या जागेत बसले. समुद्राची गाज लाटांच्या आवाजाने अंगावर शहारे आणत होती. सूर्य ही अस्ताला जात होता. गारवारा सुटला. गणेश, संजय, हे उमेश वगळता सर्वजण धुंदीत हर्षाने नाचत होते.

‘ अरे गणेश तेरे दोस्त का कया नाम है? ‘ संजय

‘ विकी, रोड्रिक्क्स’ गणेश

‘ हा विकी तुम्हारा घर बहोत बडा अच्छा है ‘ संजय

‘ अरे गणेश संजय मजा करो. घर आपका है. कभी भी आवो’ विकी. विकिने खिशातून पुडी काढली. बाजूला जाऊन त्यात सिगरेट धरून धूर सोडला. संजयने ते पाहिले. सर्व दारूने हॅगओव्हर झाले होते.

‘ गणेश अरे विकी कया पुडीमे लेके आया. भाई अकेले अकेले क्यो? ’ संजय

‘ संजय यह तेरे बात की चीज नही. ’ विकी ‘ इधर ध्यान देना नही ‘

‘संजय ए आता पुरे ‘ उमेश. उमेश मात्र संयमित होता. तो वहात गेला नाही.गणेश मात्र दारूच पित होता. तो त्यांच्या मित्रा पासून लांब राहिला. विकी, रोड्रिक्क्स मात्र यात मुरलेले होते, त्यांचे नित्याचे होते.

‘ बस कया हम सब दोस्त है ना? ऐसा क्यो? मुझे बताओ ‘ संजय विकी जवळ जाऊन त्याच्या हातातली पुडी ओढली, हुंगून त्यातील पावडर दारुत टाकली. घोट चटकन प्यायला’ विकी पहात राहिला. त्याला भीती वाटली. संजयला मात्र थोड्याच वेळात उलट्या होऊ लागल्या. तो कसं तरी करायला लागला. गणेशला काय होत आहे कळत नव्हते.

‘ अरे विकी कया किया तुमने. तुमको समजता नही कया? तुमने क्यो लाया ऐसे चीज? ’

‘मैने कया किया उसनेही छिन के लिया. हमे तो आद्त है. उसको समजना चाइए ‘

सर्व घाबरले. आजूबाजूचे लोक जमा होऊ लागले. विकी इतर जवळ असलेल्या लोकांनी त्याला विकीच्या गाडीत कसे तरी बसवले. विकी त्यांच्या डॉक्टरकडे घेऊन गेला. त्याने सर्व वृतांत कथन केला.

डॉक्टरने तपासल्यावर गांभीर्य ओळखले.

‘विकी तुला कळत नाही कुणाला काय द्यावे? ह्याला सवय नाही. फार गंभीर झाले आहे. माझ्या पलीकडील गोष्ट आहे.’ डॉक्टर

‘ डॉक्टर तुम्ही काही ही करा पण तातडीचे उपाय करा ‘ विकी, गणेश

‘ मी त्याला जुजबी इंजेक्शन देतो तुम्ही त्याला ताबडतोब मुंबईला घरी न्या. त्यांच्या कुटुंबासोबत राहून त्यांच्या फॅमिली डॉक्टरकडे उपचार होऊ द्यात. मी जबाबदारी घेणार नाही. हा कोमातही जाईल.’ डॉक्टर,’ तुम्हाला तुमची जबाबदारी कळत नाही?’

‘ डॉक्टर आम्ही विमानाची तिकीट काढतो तुम्ही या आमच्याबरोबर. सर्व तयारी करतो तिकडे गेल्यावर बघू. तुम्ही मात्र त्यांना हर्ट होणार नाही असे हाताळले पाहिजे.’ गणेश. तातडीने सर्व मुंबईला हॉस्पिटल मध्ये घेऊन आले.

डॉक्टर आणि नर्स आल्या आल्या त्याला ICU मध्ये घेऊन गेले. संजय शुद्धीवर न येता कोमात गेला होता. डॉक्टर चिंतेत पडले. काय करावे समजेना. ह्यावर पुढचा इलाज करण्यास यंत्रासामुग्री नव्हती. ते बाहेर आले. सुरेश व मंदाकिनी डॉक्टर जवळ आलेत. त्यांनी चौकशी केली. ‘संजय कोमात गेला आहे. ‘ इथे जे शक्य झाले ते केले. पण पुढील उपचार केईएम मध्ये घेऊन जा किंवा चांगल्या हॉस्पिटल मध्ये घेऊन जा. आधुनिक उपचाराची यंत्रणा आमच्याकडे नाही. ‘

‘अहो पण डॉक्टर त्याचे रिपोर्ट्स आले का?’ सुरेश मंदाकिनी ‘रिपोर्ट काय सांगत आहेत?’

‘हो आलेत.राग मानू नका. मन घट्ट करा. त्याने दारुतून ड्रग घेतल्याचे दिसते ’ डॉक्टर

मंदाकिनी व सुरेश पूर्ण हबकले. संजय तर कधी नेहमी दारू घेणारा नव्हता. मग हे कसे झाले? वाद घालण्याची वेळ नव्हती. मंदाकिनी व त्यांच्या बहिणी ही हबकल्या.

‘ अहो हे कसे शक्य आहे? काहीतरी निदान आहे. ह्यांच्या सलाईनमध्येच भेसळ असेल ते झाकण्यासाठी हे कारण पुढे केले असेल.’ मंदाकिनी.

डॉक्टर संतापून, ’ काही बाही आरोप करू नका’ सुरेश मंदाकिनीला शांत करत

‘ अग आधी आपल्या हातात काय आहे ते प्रथम करू मग बाकी बघू. घडायचे ते घडले आहे’ सुरेश. ‘डॉक्टर क्षमा करा आम्हाला. ती भावनेच्या भरात काहीबाही बोलली. आईचे हृदय आहे.’

सुरेशने व मेव्हण्यांनी ॲम्ब्युलेन्स मधून त्याला केईएम मधे आणले. केईएम मध्ये नात्यातील भावाने सर्व बोलून सोय केली. खाजगी हॉस्पिटल मधील खर्च परवडणारा नव्हता. तुटपुंजे पेन्शन होते. मेव्हणा किंवा मेव्हणीकडे जास्त मागू शकत नव्हते आधीच ते घरखर्चाची मदत करत होते. जावई यांनी ही त्यांच्या परीने मदत केली. आपलेच भोग म्हणायचे. आपण संस्कार करण्यात कमी पडलो का? काय

कमी केले? शिकण्यासाठी सर्व केले. पण शिकायची इच्छा नाही. ओळखीने नोकरीला लावले. वय तरुण म्हणून त्याला कधी दारू घेतली तर ओरडलो नाही. नवीन बदलत्या काळानुसार रहा, पण अतिरेक करू नको हे बिंबवले. अजून काय करणार? हे सर्व प्रश्न सुरेशला सतावत होते. त्याला गणेशचा राग आला. त्याने ड्रग पोटात गेले आहे हे सत्य का लपविले?. भेटताच त्याला जाब विचारायचे ठरविले. मंदाकिनी हॉस्पिटल मधून त्याच्या जवळून हलायला तयार नव्हती. संजय चार दिवस झाले बोलला नाही की डोळे उघडले नाही. हा धक्का तिला बसला होता. तिला ही मी काय कुणाचे वाकडे केले म्हणून मला असे भोग भोगायची वेळ आली हा प्रश्न सारखा तिच्या बहिणींकडे विचारत होती. सुरेखाच्या मुलीचे निधन याचे दु:ख ती सांगत होती. सर्व बहिणी श्रद्धाळू, भाविक होत्या. त्यांनी पत्रिका दाखविली. ज्योतिषाने तो कोमातून बाहेर येईल. कदाचित महिना जाईल असे भविष्य सांगितले. जे कुणी अंगारे देत होते ते लावीत होते. उपवास केले. कोणी सांगितले शिर्डीला जा व नवस करा. ते करून झाले. देवाचे सांगितलेले सर्व उपाय केले. पण काही सुधारणा दिसत नव्हती.

मंदाकिनीच्या सर्व मैत्रिणी भेटण्यासाठी केईएम मध्ये आल्या. मैत्रिणी नेहमीच्या संध्याकाळच्या भजनी मंडळातील. घराजवळील हॉस्पिटलमध्ये भेटू शकल्या नाहीत. मंदाकिनींना मैत्रिणींना पाहताच भरून आले. हुंदकाच फुटला. सुनंदा व नमिता साधारण मंदाकिनीच्या वयाच्या. वाडीत राहणाऱ्या. सुनंदा त्यांना जवळ घेऊन पाठीवर हात फिरवत धीर देऊ लागली.

'अग! वाडीत बातमी कळली. आम्ही त्या दिवशीच भजनाला जात असताना हॉस्पिटलजवळ तुम्हाला पाहिले. त्यावेळीच येणार होतो. जमले नाही.'

' बघ ना असे कसे झाले? डॉक्टर म्हणत आहेत पोटामध्ये ड्रग सेवन केल्याचे आढळले. तो असे काही करत नाही. आम्हाला माहिती आहे तो कधीकधी विस्की पितो, कधी मधी सिगरेट ही ओढतो. घरी सांगतो तो बाहेर काय काय करतो.' मंदाकिनी

सुनंदा व मैत्रिणी गप्प राहून ऐकत होत्या. सुनंदा पाठीवरून हात फिरवत सांत्वन करीत होती.

'काळजी करू नको. होईल बरा. तू स्वामींचे एव्हढे करतेस. ' नमिता

'आठवडा होऊन गेला अजून शुद्ध आली नाही. काही बोलला नाही. कस वाटते आईच्या मनाला. त्यातून आजच सुरेखाची मुलगी गेली ती हॉस्पिटल मध्ये आहे. काय भोग हे? '

' अग ताई, आता रडून का काही होणार आहे. आपल्याला वास्तव स्वीकारायला हवे. जरा शांत हो बघू.' तब्येतीवर परिणाम होईल.

' ह्यांचे आता ६५ वय माझे ५९ ह्या वयात हे पाहणे आले नशिबी' .

सुरेश आणि मंदाकिनी हॉस्पिटल मधून घरी गेलेच नाही.कधीमधी दादरला नातेवाईकांच्या घरी आंघोळ करून लगेच यायचे. डॉक्टरानी आम्ही काळजी घेऊ, तुम्ही आराम करा, सांगून ऐकत नव्हत्या. वेळ झाली म्हणून सर्व मैत्रिणी भेटून

निघाल्या. बाहेर पडल्यावर ‘ काय सांगितले, माझा अंदाज खरा निघाला. विषबाधा काही नाही. गोव्याला उघडपणे सर्व चालते.’ सुनंदा

‘हो ग! झाले आता काय करणार? आपण चर्चा करायची नाही जास्त.’नमिता

‘मुल बाहेर काय करतात कळत नाही. घरात कितीही चांगले वागत असले तरी बाहेर संगतीने वहात जातात दुसरे काय “? सुनंदा

‘लहानपणापासून मुलांना काही चांगले छंद लावले पाहिजेत. नुसती मोकळीक देऊन चालत नाही. त्यांच्याबरोबर आपणही काही केले पाहिजे म्हणजे आवड निर्माण होते.’ नमिता

‘ म्हणून तर आम्ही मुलांना ट्रेक, पियानो, गाणे याचे छंद लावले. ह्यांना आवड नाही तरी आम्ही त्यांना संगीताच्या मैफलीला घेऊन जातो. ट्रेकला पाठविण्या अगोदर मुले कोण आहेत याची चौकशी करतो’ योगिता.

‘ अग त्यांची आर्थिक परिस्थिती काय? त्यांना काय पेन्शन मिळत असेल. मंदाकिनीचे भाऊ बहिणी मदत करायचे म्हणून चालायचे. शेवटी त्यांना ही त्यांचे जीवन आहे ना? ’ नमिता

‘ सर्व विधी लिखित असते. जे व्हायचे ते टळत नाही. असेच म्हणायचे’ योगिता

पंधरा दिवस होऊन गेले. परिस्थितीत काहीच फरक पडत नव्हता. काय करायचे कळत. नव्हते. अंगारे धुपारे नवस सर्व करून झाले. सुरेश व मंदाकिनी सारेच काळजीत पडले. तेव्हढ्यात डॉक्टर आलेत. त्यांनी तब्येत पाहिली. सर्व नॉर्मल आहे.

‘ अहो काय फरक जाणवतो का? किती दिवस असे बघायचे? ’ मंदाकिनी

‘ आई, काय करायचे? आपल्या हातात जे आहे ते करीत आहोत “डॉक्टर

‘ अहो त्याच्याशी बोललो नाही की तो डोळे उघडत नाही. जीवाची घालमेल होते. जग एव्हढे पुढे चालले आहे. अशी काही यंत्रणा नाही काय त्याच्या मनात काय चालले आहे ते कळेल. हृदय नीट चालावे म्हणून स्पेसमेकर बसवतात तसे एखादे यंत्र? ’

‘ अजून नाही ना. तशी प्रगती नाही झाली अजून ’ डॉक्टर ‘ तुम्हाला मी सत्य परिस्थिती सांगतो, तो शुद्धीवर जरी आला तरी तो नॉर्मल माणसासारखा होणार नाही. सर्व स्मृति काही येणार नाहीत. कोणी ना कोणी त्याच्या आजूबाजूला राहवेच लागेल. त्याचे करावे लागेल. नोकरीवर नाही जाऊ शकणार. त्याच्या कलाने घ्यावे लागेल. जणू लहान मुलच.’

सुरेश, मंदाकिनीला ऐकून धक्काच बसला. म्हणजे नुसते चालते बोलते कलेवर सांभाळायचे. त्यांना ही परिस्थिती कळून चुकली. घरात त्यांच्या वडिलांना ही अर्धांगवायू होऊन ते कोमात गेले होते. बाहेर आल्यावर त्यांचे कसे सर्व करावे

लागले याचे चित्र पुढे उभे राहिले. त्यावेळी त्यांचे करायला वय व उमेद, माणसे होती. पण संजयचे कसे करायचे हा प्रश्नच होता. दोघांची ही वय वाढली होती. आर्थिक शारीरिक बळ ही नव्हते. मुलगा सून, मुली, जावई सून सगळे तरी कसे, किती येणार. त्यांची नोकरी, मुलांची शाळा आहेच. भयाण वास्तव मनात काहूर माजवू लागले. आयुष्य ही आपल्या हातात नसते. जो पर्यन्त असते तो पर्यन्त जगायला हवे. करायला हवे. गुरुपौर्णिमेला संजय शुद्धीवर आला. पण ओळखू शकत नव्हता की बोलत नव्हता. मुलाला बघायला मिळाले तेव्हढेच समाधान मिळाले. स्वामींची कृपा आहे याचा प्रत्यय आला. त्यांनी मठात जाऊन नारळतोरण चढविले. डॉक्टरानी आठवड्याभराच्या इलाजानंतर घरी सोडले. आता दोघांची ड्यूटी घरी नर्सिंगरूमची झाली. त्याचे सर्व बेडवरच करावे लागेल असे गृहीत धरून तसा हॉस्पिटलचा पलंग आणला. एका जुन्या खोलीतील संसार आता पर्यन्त आठ माणसांचा केला.सर्व लहान असताना बाहेर वरांड्यात सर्व झोपायचे. तीच अवस्था पण हा एकटाच आणि दोघे म्हातारे. मुली व जावई यांनीही मदतीला येण्याची तयारी दाखवली. बहिणी ही येऊ म्हणाल्यात. सर्व आले तरी उतारवयात सगळ्यांची ऊठबस, लोक बघायला येणार, खर्च वाढणार.सर्वांची झोपण्याची अडचण. आर्थिक ओढाताण.पैसा कुठून आणायचा? वाढत्या वयाबरोबर त्यांच्या औषधाचा खर्च ही वाढू लागला. चित्र भयंकर दिसू लागलं. इच्छा मरणाचे विचार डोक्यात येऊ लागले तसे संजयचे कोण करणार हा प्रश्न आतडे पिळवटू लागला.

संजयची प्रगती होऊ लागली. त्याला मागचे आठवत नव्हते. पण माणसे ओळखू लागला. ह्या अवस्थेत १० वर्षे गेलीत.कंपनीचे साहेब घरी बघायला नियमाने येत होते. त्यांच्याबरोबर गणेश ही कधीमधी येई. इतर ही येत. सर्वांना आधार देऊन जात. गणेश मात्र ज्या ज्या वेळी येई त्यावेळी तो अंग चोरून उभा राही. बोलण्यात मोकळेपणा नसे. हे सुरेश मंदाकिनीच्या लक्षात आले. साहेबांनी, वातावरणात फरक पडून संजयची प्रगती व्हावी म्हणून त्याला कंपनीत यावयास परवानगी दिली. त्याला गाडीने कंपनीत घेऊन जाण्याची व आणून सोडण्याची तयारी दाखवलीच शिवाय त्याच्याकडे व्यक्तिगत लक्ष पुरवण्याची जबाबदारी घेतली.

‘साहेब खरेच आम्ही ऋणी आहोत पण तो काही करू शकत नाही. हव नको ते बघायला लागते. सर्व नैसर्गिक विधीला घेऊन जावे लागते. हे कसे होईल? ’ सुरेश

‘ त्याची काळजी करू नका. कंपनीचा हॉस्पिटलचा माणूस सर्व पाहिलं.शिवाय त्याला महिन्याचा पगार ही कंपनी देईल. कंपनीच्या धोरणाप्रमाणे एकवर्ष ढकलत नेऊ. तुम्हालाही तेव्हढाच हातभार ‘

साहेबांचे हे शब्द ऐकल्यावर सुरेश मंदाकिनीला गहिवरून आल. सरकारी उपक्रमाची कंपनी कर्मचारी वर्गाची इतकी काळजी घेते हे पाहून आश्चर्य वाटले. तरी कर्मचारी संतुष्ट का नाहीत हा प्रश्न ही उभा राहिला. सुरेशला त्याला पगार मिळणार ही बातमी ऐकून खरच देव पावला असे वाटले.

‘ धन्यवाद साहेब आपले खरच उपकार आहेत ‘

साहेब व गणेश जायला निघाले. सुरेशने गणेशला हॉस्पिटलचा रिपोर्ट दाखविला. त्याने खोटी माहिती दिली याची जाणीव हळूच करून दिली. गणेशाचा चेहरा पडला.

संजय हळूहळू स्वत:चे थोडे बहुत करू लागला.नित्य कामावर जाऊ लागला. त्याच्यासाठी वेळेचे बंधन नव्हते. सणवाराला आला गेल्याशी बोलू लागला. सुरेश मंदाकिनी यांना संजय बोलतो पण त्याच्या चेहऱ्यावरचे हावभाव आपण आईवडिलांना भार झालो आहोत हेच जास्त जाणवून देते असे वाटते. नातेवाईक कोणी आले आणि त्याला जवळ घेऊन बोलू लागले तर तो चेहऱ्याने हाताने ‘ नको हे जीणे, देवाने असे का ठेवले ‘ असे बोले तेव्हा त्याच्या डोळयात पाणी येई. वर्षभराची नोकरी संपली. पुन्हा घरी बसून सुरेश मंदाकिनीवर पुन्हा जबाबदारी आली. काळ पुढे सरकत होता. संजयचे आजारपण होऊन १५ वर्ष सरली. प्रगती जेमतेमच. कधी मधी फेफरे येत.औषधे सुरूच होती. सुरेशचे वय ही 80च्या घरात तर मंदाकिनी 75. त्यांनाही जड होऊ लागले. संजय बाहेर असला की दोघे एकांतात बोलत

‘ आपल्या आधी तो सुटला तर बरे होईल. कोण करेल त्याचे?’ सुरेश

‘ हो ना! मला तीच काळजी ‘

‘ मी आधी गेलो तर तुझे कसे होईल. मला ही काळजी जास्त छळते. झोप लागत नाही ‘ सुरेश

‘ जाऊ दे! आहे ते बघत राहायचे. आपल्या हातात दुसरे काय. हा हॉस्पिटल मधे जगेल का वाचेल ही चिंता होती. त्याचवेळी आपल्या सुरेखाची मुलगी झाल्या झाल्याचं गेली. हा वाचला. आपल्या हातून सेवा घडायची होती असे म्हणायचे’ मंदाकिनी

‘ आपले श्वास किती राहिले. पण एक गोष्ट लक्षात ठेव आपल्यापैकी कुणीही आधी जाऊ दे. आपण देहदान करायचे. हे विसरू नकोस ‘ सुरेश

संजय जरी बाहेर बसला असला तरी त्याला खुर्चीतून आईवडील काळजीतून आपल्याविषयी बोलत आहेत हे समजे. तो ही दु:खी होई. स्वत:च कपाळावर हात मारीत दैवाला दोष देई.

एके दिवशी सुरेशला छातीत कळ आली. घरात मंदाकिनी व संजय होता. संजयला वडील असे काय करत आहेत, काही तरी वेगळे घडत आहे हे पाहून तसाच उठून कसातरी शेजारी आला व त्यांना खुणेने सांगू लागला व ओढत घरात चला असे म्हणाला. शेजाऱ्यांनी घरी येऊन पाहिले तर सुरेश घामाघूम झालेला. शेजाऱ्यांनी लगेच त्याला उचलून हॉस्पिटल मध्ये नेले. त्याला मासिव्ह अटॅक आलेला होता. मंदाकिनीच्या चेहऱ्यावर काळजीने घेरले. हॉस्पिटल मध्ये कसे जायचे, मुलाकडे कोण बघेल. जावई मुली जरी आल्या तरी आपला माणूस ज्याच्या बरोबर जीवन काढले त्याला अश्या स्थितीत एकटे सोडावे? तिलाही सहन होत नव्हते. सून मुली, बहिणी तिला सोडत नव्हत्या. संजय सुद्धा हे पाहून सैरभैर झाला. त्याला ही कळेना

आता काय होईल आपले. आपल्या त्रासाने दोघांना अशी परिस्थिति आली. तो ही बहिणी, मावशी मामाला हाताने, बोबड्या बोलानी, स्वत:ला मारून घेत बोलू लागला. बाजूला जाऊन रडू लागला. त्याचाही जीव बाबाला बघायला तडफडू लागला. पुन्हा त्याला फेफरे येऊन शुद्ध हरपायला लागली. मंदाकिनी ही काळजीत पडली. डॉक्टर याने संजयला झोपेचे औषध दिले जेणे करून त्याला आणि इतरांना त्रास होऊ नये. हॉस्पिटल मध्ये सुरेशची तब्येत गंभीर झाली. डॉक्टरानी आता खरे नाही असे संकेत देऊन सर्वांना बोलवयाला सांगितले. मंदाकिनीची घालमेल झाली. आता कसे होणार. आपला आधार जाणार. शेवटी व्हायचे तेच झाले. सुरेशने मंदाकिनीचे नाव घेत शेवटचा श्वास सोडला. बातमी कळल्यावर तिने मन घट्ट करून खंभीर होऊ लागली. सुरेशची देहदानाची इच्छा ठरल्याप्रमाणे लोकांचा विरोध पत्करून पूर्ण केली. ॲम्ब्युलेन्स सुरेशची बॉडी घेऊन गेले. आता संजयला काय सांगायचे, कसे समजावयाचे हा प्रश्न उभा राहिला. नेले त्यावेळी तो झोपेतच होता. म्हणून वेळ टळली. सुरेशचे जाणे ही न भरून येणारी जखम. प्रसंगाला सामोरे जावेच लागेल. डॉक्टर संजयला धक्का बसू नये, झोपेचे औषध द्यायचे. घरात 10 वा विधी कार्य सुरू झाले. संजयसाठी विधी वाडीतच करायचे असा निर्णय घेऊन मालकाची अनुमती घेतली. मालकाने उदार मनाने अनुमती दिली. पिंडाला कावळा शिवत नव्हता. देऊळ वाडीतच होते.. संजयला कसे तरी उभे केले, धरून वाडीतील विहीरीजवळ आणले. थोडी शुद्ध आली. त्याला सुरेश दिसला नाही. काय चालले आहे हे त्याने जाणले.जवळ बसलेल्या मंदाकिनीला खुणेने विचारले. मंदाकिनीने

अश्रू अनावर होत त्याला जवळ घेतले. अश्रू त्याचा गालावर पडले तो ही समजला. त्यालाही रडू कोसळले, खूणेने तो ही मला 'नाही राहायचे ' असे म्हणू लागला.

' अरे योगेश, भावाचा सांभाळ करेन, लक्ष देईन असे तरी म्हण. मला माहिती आहे तुझी बायको कुरबुर करेल. अरे त्यांना आश्वासून मुक्ती दे.''सर्वांसमोर मंदाकिनी रडून म्हणाल्या. मी नंतर तुझ्याकडे येणार नाही. मी आणि तो राहीन या वाडीतील खोलीत.'

' योगेशने मी सांभाळ करीन' असे म्हणताच पिंडाला कावळा शिवला. कसा तरी 13 वा उरकला. सर्व विधी झाल्यावर मुली मंदाकिनी कडे राहिल्या. सर्व घरी गेले. संजयची तब्येत बिघडली. त्याला ही धक्का बसला. सैरभैर झाला. मध्य रात्री अचानक टाहो फोडून त्याने ही शेवटचा श्वास सोडला. मंदाकिनीला दुसरा धक्का बसला. आज नवऱ्याचे 13 वे झाले आणि लगेच मुलाचे विधी बघावे लागले. मंदाकिनीने संजयचे ही देहदान केले. मुलांनी जावयांनी आईची इच्छा मोडली नाही. शेजारी, मैत्रिणी जेव्हा भेटायला आले तेव्हा सर्वांनी मंदाकिनीच्या ह्या परिस्थितीत जो खंबीर निर्णय घेतला त्याचे कौतुक केले.

सुनंदाने मंदाकिनीला जवळ घेतले. त्यांनाही धक्का बसला होता. नाही म्हटले तरी त्या समवयस्क होत्या.

‘ अहो काय नशिबाने घाला घातला. आता पर्यन्त मी कुणासाठी तरी जगत होते. आता सारेच संपले. कोणासाठी जगायचे? हे होते म्हणून दोघे एकमेकाला आधार देत सावरत होतो. आता नाही जगायचे’ . मंदाकिनी

‘ आम्ही आहोत ना जवळचे. सून आहे. मुली जावई आहेत’ सुनंदा

‘ बघू नशिबात काय आहे. आता कशातही राम वाटत नाही.’

‘ अहो झाली का आंघोळ? किती वेळ लागतो. काय करत आहात ’ सुनेने हाक मारली.

‘ नाही ग. कंबर दुखत होती म्हणून तेल लावत होते.’ मंदाकिनी ‘ काय सांगणार आता पूर्वी सारखे होत नाही’ भानावर येत म्हणाल्या

‘ मी शाळेत जात आहे. जेवण करून घ्या. नीट रहा. हे पण घरी नाहीत. मुग्धा ही कॉलेजला जाईल ’

‘ आता गणपती गेलेत. मी घरी जाईन संध्याकाळी योगेश आल्यावर’

‘ अग आजी कशाला जातेस? रहा इथेच. तू एकटी काय करणार तिकडे? ‘ मुग्धा नात म्हणाली’ नातीला जवळ घेत, माझी मी एकटी माझ्या घरी राहीन. तुम्ही येऊन जाऊन रहा घरी वाटले तर. शेवटचा श्वास माझ्या घरट्यातच.......जाऊ दे ’ नात मुग्धा हिरमुसून गेली.

सूनबाईला कळेना, ह्यावर काय प्रतिक्रिया द्यावी. मनातून बरे वाटत होते पण लोक काय म्हणतील ह्याचा विचार तिच्या मनात येई. ती गप्प झाली. मंदाकिनीला तिच्या मौनाचा अर्थ कळला.

‘ तू काही मनाला लावून घेऊ नकोस. तुझा व तुझ्या नवऱ्याचा काही दोष नाही. हे माझे भोग आहेत. ते मलाच भोगावे लागतील. प्रत्येक माणूस नशीब घेऊन येतो त्याच्यात कोणी ढवळाढवळ करू शकत नाही. मी माझ्या घरी.....माझ्या भोगात तुम्हाला वाटेकरी नाही करायचे मला.! तुमची आयुष्ये वेगळी आहेत. ती शीच राहू दे...

मंदाकिनी एकेक करून आपल्या वस्तु, कपडे, नि नवऱ्याचे, मुलाचे फोटो, आपले रेशनकार्ड गोळा करू लागली.नात मुग्धा तिच्या मागे मागे तिचा पदर धरून मुसमुसू लागली.

.....................

इ-काव्यानंद दिवाळी अंक

# भाग्यश्री

जिल्हा परिषदेच्या दवाखान्यात एकदम धावपळ सुरु झाली. नर्सने नियमित चेक अप राऊंड वर असताना सुगंधाच्या मॉनिटरवर ह्रदयाचे ठोके अचानक अनियमित पाहिले. तिने डॉक्टरला बोलावून आणले. नर्स डॉक्टर सुगंधाला घेऊन ऑपरेशन थिएटरकडे धावले. सुगंधा दिसायला काळी सावळी,वयाने १९ गर्भवती होती. लग्न १५ वर्षाची असताना झाले. आठ महिने पूर्ण झाले होते. दोन दिवसापूर्वी वेदना होत होत्या म्हणून प्रसुतीच्या अंदाजाने दवाखान्यात आणली होती. त्यात तिला अचानक ब्लड प्रेशरचा त्रास सुरु झाला. छातीमध्ये धडधड वाढून ठोके वाढले. असे अचानक काय झाले हे कुणालाच कळेना.सुगंधा ही शहरापासून लांब कोल्हापूर वेंगुर्ला रस्त्यावर असलेल्या शेतावरच्या वस्तीत रहात होती. वस्ती साधारण १०० घरांची होती. जवळपास काहीच सोय नाही. साधा सरकारी डॉक्टरचा झोपडीवजा दवाखाना होता. त्याने प्राथमिक तपासणी करून ताबडतोब कोल्हापूरच्या दवाखान्यात घेऊन जाण्यास सांगितले म्हणून आली. सुगंधाचे कुटुंब लहान. नवरा शाम, मोठा मुलगा ५ वर्षाचा आणि सासू. सासरे नव्हते. सासर मुळचे दोडामार्ग येथील. तिच्या वडिलांची परिस्थिती हालाख्याची होती. ते ही मोलमजुरी करीत. घरात 2 मुली. शाम कंपनीत

गाडीवर काम करतो हे पाहून लग्न करून दिले. सुगंधा व सासू दोघी शेतावर काम करत, कधी एस टी स्थानकावर हॉटेल मधे, कधी शेजारील गावच्या पाटील यांच्या शेतावरचे काम करून गुजराण करीत होती. काहीच काम नसेल तेव्हा गावी जाऊन काहीबाही काम करीत. कुणाच्या बागामधील फळे हायवेवर विक्री करत. या ठिकाणी सुद्धा रस्त्याच्या कामासाठी रोजंदारीवर आले होते. शेवंता आणि सुगंधा कधी मधी रस्त्याचा कंत्राटदार याच्याकडे काम करीत म्हणून ओळख. कंत्राटदाराकडून पैसे घेऊन वस्तीवरील शेवंता बाईने शाळेच्या मास्तरणीच्या मदतीने, ओळखीने दवाखान्यात आणली. यशोदा बीएड झालेली, २५ विशितील मुलगी. गावातील जिल्हा परिषद शाळेत शिकवण्याचे काम करी. शेवंता तशी तिच्या पेक्षा वयाने मोठी,चुणचुणीत. कंत्राटदाराकडे बरेचवर्ष काम करी. तिला कोणीच नव्हते.कंत्राटदाराने तिला लहान झोपडी राहण्यास दिली होती. कामाचे सर्व सामान तो झोपडीत ठेवत असे. कधी कधी कंत्राटदार वेंगुर्ला येथे रहात असल्यामुळे आणि उशीर झाला की त्या झोपडीत वस्तीला राही हे गाव जाणून होते. परंतु शेवंता मात्र सर्वांना मदत करीत असे. गावातील बहुतेक सर्व त्याच्याकडे मोलमजुरी करीत. त्यामुळे बोलायची हिंमत नव्हती. कंत्राटदाराने पैसे देताना तिला छेडले “अग, मी पैसे देऊ? मला काय देशील तिच्या कडून?

“शेवंताने त्याकडे लक्ष दिले नाही. ती माझ्यासारखी एक स्त्री आहे, तिला मदतीची गरज आहे हे तिने आधी पाहिले.तिने कोल्हापूरला तिच्या नणदेला बुथवरून फोन करून हॉस्पिटल मधे मदतीला बोलावले. सासू मुलाला घेऊन घरीच राहिली.नवरा कोल्हापूर जवळ छोट्या कारखान्यात कंत्राटदाराच्या गाडीवर मजुरीचे

काम करीत होता. गाडीवरून गावोगावी कंपनीचे माल पोचवणे अशी कामे करी.त्यामुळे तो १५-२५ दिवसांनी घरी येई. कंपनीच्या आवारात किंवा फिरतीवर असताना गाडीवर तो राही. सतत फिरतीवर राहिल्याने, संगतीने त्याला दारूचे व्यसन जडले होते. फिरतीवर असल्यावर तो काय करे हे कुणालाच काही कळत नव्हते. सुगंधा जेव्हा हॉस्पिटल मधे आली तेव्हा तो कंपनीचा माल घेऊन कर्नाटकात गेला होता. त्यालाही काहीच कल्पना नव्हती. शेवंताने सुगंधाकडे कंपनीचे नाव पत्ता विचारून नणदेच्या नवऱ्यामार्फत, पोलिसांच्या मदतीने शोधाशोध करून कंपनीत मालकाला कळविले. ऑपरेशन थिएटरमधे सुगंधा डॉक्टरांना विचारू लागली, ‘‘काय झाले मला सांगा ना ‘‘? नर्सने ‘‘तुम्ही बोलू नका तसे काही गंभीर नाही. तुमचे ब्लड प्रेशर आणि नाडीचे ठोके वाढले आहेत” डॉक्टरांनी तिला विश्रांतीसाठी झोपेचे इंजेक्शन दिले. अजून डिलेव्हरीची काही लक्षणे दिसत नाहीत.

‘‘मी कधी सुटलं डॉक्टर? ‘‘सुगंधा ‘‘माझी सासू आणि मुलगा घरी एकटे हाय. रस्त्यावर मोलमजुरी करतात. जर डिलेवरी नसेल तर मला जाऊ द्या ना. आमचे पोट मजुरीवर हाय.पैसे नाय हो.”अजून तुम्हाला एक आठवडा रहावे लागेल. ह्या काळात केव्हाही डिलेव्हरी अपेक्षित आहे. नर्स म्हणाली. शेवंताने सगळी परिस्थिती ठीक आहे किंवा नाही डॉक्टरकडे चौकशी करून नणदेला हॉस्पिटलमध्ये जाऊन येऊन बघण्यास सांगितले. तिला कंत्राटदाराने जे पैसे दिले त्यातील काही तिच्याकडे देऊन ठेवले. नर्सला सांगून ती घराकडे निघून गेली. शामचा काही ठावठिकाणा नव्हता. शिक्षण काहीच नसल्यामुळे घराकडे काय हवे, काय नको ह्याकडे लक्ष नव्हते. घरी

आला की तो सासू मुलगा घरात नसले की सुगंधाकडे सुखाची अपेक्षा करायचा. नाही म्हटले की दारूच्या धुंदीत तो मारायचा. वस्तीवरचे पुरुष मंडळी ही आपआपल्या घरी त्यापेक्षा काही वेगळे करायची नाहीत. जिल्हा परिषदेच्या शाळेतील यशोदाबाई मात्र कधी मधी वस्तीवर येऊन चार गोष्टी उपदेशाच्या बायकांना सांगायची. लहान मुलांना शिकवता शिकवता वस्तीवरील आरोग्याची तपासणी सामाजिक भावनेने डॉक्टरच्या मदतीने करायची. शेवंताने घरी सर्व सासुला येऊन सांगितले. दुसऱ्या दिवशी सासूही मुलाला घेऊन कोल्हापूरला दवाखान्याचा पत्ता शोधत सुगंधाला बघायला गेली.

‘ कशी हाय तब्येत? तरी तुला सांगत होत्ये दुसर मूल घेऊ नको आपली ऐपत नाय. गावो गावी फिरून मोलमजुरी करणार आपण. कधी ऐकल नाय ‘’

‘अहो हे माझ्या हातात हाय काय? तुमचा मुलगा कसा मारतो माहीत हाय ना? तवा तुम्ही का बोलत नाय? ’ सुगंधा

‘ किती पैका लागलं डॉक्टर म्हणल’ सासूने चिंतेने विचारले. जिल्हा परिषदचा दवाखाना असल्यामुळे आणि शाळा मास्तरणीच्या ओळखीने येथे आणले त्यामुळे पैशाचे तिला माहीत नव्हते.शेवंताने थोडे पैसे दिल्याचे सांगितले. सासूने तिला छेडले “तिच्याकडून पैसे घेतले ती चांगली बाय नाय. लोग काय बाय बोलतात तुला माहीत आहे नव्ह? “

“तीच होती ना आणायला इथे? दुसरे कोणी आले का माझ्या संग? “सुगंधा

'जेवण कोण आणत तुला?' सासूने विचारले.

' जेवण शेजारच्या पेशंटचे घरून आणतात त्यातले मिळते. कधीमधी नर्स काही तरी देते. ही सर्व मास्तरणीची कुरपा' सुगंधा ' ती कोण कुठली बाय पण देवावाणी हाय. घर तिचे कोल्हापुरात हाय. तिने शेवंताला सांगून इथे पाठवले "

तेव्हढ्यात नर्स आली तिने वेळ संपली म्हणून सर्वांना बाहेर जाण्यास सांगितले. सुगंधाची सासू पुन्हा आपल्या घरी आली. सासूच्या मनात शेवंताविषयी काहूर माजू लागले. तिने पैसे कसे दिले? तिचा हेतु काय? पण तिला सुगंधाला विचारण्याचे धाडस झाले नाही. सुगंधा एकटीच खिडकीतून आकाश बघत राहिली. संध्याकाळचे ऊन खिडकीत विसावले होते. शाम अजून बघण्यास आला नाही. त्याला कळले किंवा नाही, तो कुठे असेल याची काळजी लागून राहिली. लग्न झाले म्हणून नवरा. बाकी तसा काहीच उपयोगाचा नाही. घरी आला तरी पैसे कधी देत नसे. उलट घरातून भांडून घेई. नको नको म्हणत असताना तिच्यावर बाळंतपण लादले. मास्तरीणबाईने ही त्याला किती वेळा समजावले पण काही नाही. सुगंधाला मुलाला शिकवायचे म्हणून ती बाईला विनंती करी. तिच्या सानिध्यात मुलाला जास्त ठेवी. वस्तीवरच्या मुलांमध्ये हाच थोडा हुशार दिसत होता म्हणून मास्तरीण ही विशेष लक्ष देत असे. मास्तरिणीमुळे सुगंधाला थोडी थोडी जीवनाची दृष्टी मिळू लागली. सुगंधा बाळांतिण झाली. तिने मुलीला जन्म दिला. शेवंता आणि मास्तरीण तिला घरी घेऊन आले. सासू मुलगी झाली म्हणून नाखुष होती.त्यातून ही चांगली गौरवर्णी कशी? शाम तर काळा. तो तर १५-२५ दिवसानी घरी येतो. मग हिला दिवस कसे गेले? अनेक

प्रश्नांच्या शंकेचे भूत डोक्यात नाचू लागले. घरी हिचे कोण करणार? मजुरीला कसे जायचे? ह्या चिंतेने तिला ग्रासले. दोघींमधे भांडणे होऊ लागली. सुगंधाने मार्ग काढीत जीवन जगायचे ठरविले. “अव मी जनम दिला आहे बघिन काय ते मुलीचे.तुम्हाला तरास होणार नाय” सासुला सुनावले. शेवंताने आणि मास्तरिणबाईने तिला नैतिक बळ देऊन उभे केले. तिने लगेच दुसऱ्या दिवशी आपले ओलेपण विसरून कामाला उभी राहिली. मुलीला मुलाला शेवंताच्या घरी ठेवून कामास जाई. मास्तरिण आली की मुलाला शिकवताना दिवसभर लक्ष देई. जेवायला आपल्या डब्यातील देई. मास्तरिण बाईला मुलाविषयी का आपुलकी वाटत होती हे कळत नव्हते. पण माणुसकी आणि स्त्री म्हणून तिथे आहे तो पर्यन्त करायचे तिने ठरविले. सासू मात्र “तिचे नाव काय ठेवायचे, तिला दूध कोण देणार, पैका कुठे आहे, अनेक तऱ्हेने सुगंधाला टोचून बोलू लागली. सुगंधाला अतिरेक झाल्याने सहन झाले नाही. तिने ‘ तुम्हाला काय त्रास हाय काय. मग गप्प बसा की. मी म्हणल का नाव ठेवायच?. काय नाव बी नग. राहू द्या तशीच आपण जे हाक मारू तेच नाव.’

‘ अगं अस कस! वस्तीवरील लोग काय म्हणतील? त्यांना जेवण दारू नग द्यायला? ’

‘ आपल्याकडे पैका नाय. हे काय बी करायचे नाय. धंनीचा पत्त्या नाय. मी काय बी नाय करणार. उगा पैका नाय उधळायचा. लोकांची चालीरीतीची मला पडली नाय”

‘ रिती रिवाज हाय की नाय? लोग शामला आल्यावर काय म्हणतील?’

‘ गेले चुलीत. धनी काय कमावतात? घरात किती देतात? घरातीलच घेऊन जातात ना ”?

सासूचे बोलण्याकडे दुर्लक्ष करून ती स्टँडवर काम करायला गेली. सासू मात्र काम नसल्यामुळे दारातच बसून राहिली. उन्ह चढत होते. आजूबाजूला जंगल असल्यामुळे दाहकता वाटत नव्हती. तेव्हढ्यात दोन घुबड येऊन घरावर बसली. सासूचे लक्ष गेले. ती चिंताग्रस्त झाली.त्यांना हाकलावू लागली. ती जाऊन पुन्हा येऊन बसू लागली.

“ये ह्याट. मेला उगीच घरावर चोच मारतो’ तिने दगड भिरकावला. ती ओरडत उडून गेली. पुन्हा काही वेळाने येऊन बसली. ओरडू लागली. सासुच्या मनात चर्र झाले. तेव्हढ्यात शेजारच्या झोपडीतील दोन बायका ही ओरडत दगड मारीत आहे म्हणून काय झाले विचारायला आल्यात. “बघा मुडदे आज घरावरच का सारखे येतात, ओरडतात? ’ सासू.

‘ हे काय शुभ नाय. काय तरी इलाज करायला हवा. शेजारच्या वस्तीवर भगत राहतो. त्याला बोलावून काय तरी इलाज करा.”एकजण म्हणाली. त्या दोघी निघून गेल्यात. घुबड सारखी येऊन बसू लागली. सासू कंटाळली.चार वाजले सुगंधा घरी आली. हातात तान्हे लेकरू होत. घरात येऊन तिने हात पाय धुवून बाळाला दूध पाजू लागली.

‘ अग ये सुगंधा, आज सारखी घुबड येऊन आपल्या कौलावर बसतात. ओरडतात. सारखी हाकलून कंटाळले. घरावर ओरडणे चांगले नाय.शेजारी सांगत

व्हते हे अशुभ आहे शेजारच्या वस्तीत गुरव आहे त्याच्याकडून देवाच करून घ्या म्हणत होते.' सासू

' मला नाय पटत हे. अवो आजूबाजूला जंगल हाय. येणारच काय खायला मिळते का बघायला. त्यात काय मोठे? ‘‘दोघींचे भांडण वाढले. सुगंधा काही ऐकत नव्हती. मास्तरिण मुलाला घेऊन घरी आली. तिची शाळेची वेळ संपली होती. घरी जायच्या अगोदर ती मुलाला आणून सोडे. एस टीची वेळ झाली होती. तिने हे भांडण ऐकले. सासू घरातून दूर निघून गेली होती. घरातील परिस्थिती बघून मुलाला कोल्हापुरात तिच्या घराजवळ असणाऱ्या आश्रम शाळेत शिकण्यास ठेवू असे सुचवले म्हणजे त्याच्यावर चांगले संस्कार होतील तिचे आईवडील ही लक्ष देतील. काही मदत लागलीच ते ही करतील. सुगंधाने सर्व ऐकून घेतले. तिलाही पटले काही तरी मार्ग काढायला हवा. आपले जीवन मुलांच्या वाट्याला येऊ नये. कोल्हापूर तसे लांब नाही तासभरचा रस्ता. मुलाचे तर चांगले होईल. मास्तरिणीच्या घरी आज मुंबईहून पाहुणे येणार होते म्हणून जायचे होते. दुसऱ्या दिवशी ती सुट्टी घेणार होती. त्यामुळे मुलाला उध्या शाळेत पाठवू नका असे ही सांगितले. ती निघून गेली. सुगंधाने निर्णय घेतला त्याला आश्रम शाळेत ठेवायचे.

यशोदेचे मेव्हणे वसंतराव कारखान्यात होते. कंपनी बंद झाल्यामुळे ते लिखाण करू लागले. कॉलेजच्या जीवनापासून त्यांना साहित्य लिखाणाची आवड होती. त्यांनी मोंडेलिंगचे काम केले होते तसेच त्यांची कथा नाटके प्रसिद्ध होऊन रंगभूमीवर प्रयोग चालत होते. सिनेमा मराठी मालिकेचे लिखाण करीत. त्यांची वेंगुर्ल्याला वडिलोपार्जित भावकीत जमीन होती. त्यांना मुलबाळ नव्हते. आई बहिण आणि

नवरा बायको. त्यांची आई बहिण नुकतेच वारली होते. गावाहून भात घरी यायचे. ते सहज कोल्हापूरला देवदर्शनाला आले होते. यशोदेची शाळा कशी चालू आहे विचारपूस केली. नवीन काय खबरबात अशी चर्चा चालू असताना यशोदेची बहिण रेवती आईजवळ मुल दत्तक घ्यायचे आहे म्हणजे घरच्या जमिनीवर वारसाहक्क राहील असे म्हणत असताना ऐकले.

“अग जावईबाबूंचे वय काय? या वयात दत्तक घ्यायचे? कसे होईल पुढे? “आई

“त्यांचे वय आता ५२ आहे. माझे ४५ अजून आम्ही मुलाची देखभाल करू शकू. लिखाणावर पैसे मिळतात. ह्यांनीच उचल घेतली आहे. घरात कुणी नसले की करमत नाही.”बहिण

यशोदाने हे ऐकलेच नाही असे दाखवले. तिने ‘ देवळात जायचे ना’ असे जिजू बहिणीला विचारले. सर्व देवळात गेलेत. देवळातून येताना वाटेत तिने सुगंधाची कहाणी कथन केली. वस्तीवर ती शिकवता शिकवता सामाजिक काम ही करत आहे असे सांगितले. तिच्या मुलाला आश्रम शाळेत घालायचे आहे म्हणजे त्याची सोय होईल.

‘ किती वर्षाचा आहे मुलगा? ’ जिजू

‘ असेल 6 वर्षाचा ‘

‘ नको इतका मोठा. आपण त्याचा काही थोडा खर्च आश्रम शाळेत करू”जिजू. यशोदाला एव्हढे आश्वासनही आधार देणारे वाटले.सर्व घरी आले. जिजू आणि बहीण मुंबईला निघून गेलेत.

रात्रीने वस्तीवर आपली चादर पसरली. मुख्य रस्ता वस्तीजवळून जात होता म्हणून वाहनांचे आवाज रात्रीची शांतता कापत होते. त्यातून रात किड्यांचे आवाज घुमू लागले. मधेच कोल्हयाचे आवाज ही येत. जेवून सर्व झोपी गेली. ११-१२ च्या सुमारास वस्ती वरच्या लोकांचे आवाज येऊ लागले. सुगंधा आणि सासू यांना काय असेल याची काळजी वाटु लागली. अंधारामुळे दरवाजा उघडून बाहेर येण्याचा धीर झाला नाही. आता मात्र आवाज घराजवळ येऊ लागला. त्यातील कुणीतरी ‘ ये सुगंधा ये सुगंध बाहेर ये ‘ अशी हाक ऐकू आली. ती रॉकेलचा दिवा घेऊन बाहेर आली. वस्तीतल्या एका बाईने सुगंधाला जवळ घेऊन ‘ तुझ्या धन्याची मयत झाली आहे. त्याचे शव घेऊन गाडीतून माणसे आली बघ ‘ असे सांगितले. सुगंधाला काय होत आहे कळलेच नाही. तिने हंबरडा फोडला. तिची सासू आवाज ऐकून बाहेर धावत आली. तो पर्यन्त वस्तीवर लोक दिवे घेऊन श्यामाचे शव घेऊन आले होते. सुगंधाच्या सासूनेही हंबरडा फोडला. ती रडता रडता “तरी तुला सांगत होते सकाळपासून घुबड घरावर आवाज करत आहेत. काही अशुभ घडणार आहे तू भगताला भेटून सांग. काही तरी कर पण लक्ष दिले नाही” सुगंधाला शिव्या शाप देऊन ओरडू लागली.

शामच्या मालकाने वस्तीवरील माणसांसमोर अपघात तो दारूच्या नशेत हायवेवर असताना गाडीच्या धक्याने झाला. हॉस्पिटलमध्ये जाण्याअगोदरच मृत्यू झाल्याचे सांगितले. त्याने सुगंधाला सावरण्यास सांगितले. मालकाने तिच्या हातात काही हजार ठेवून शव ताब्यात दिले. रात्र असल्यामुळे काहीच करता येणार नाही हे ओळखून तो निघून गेला. शेवंताही झोपडीत आली. तिने सासू आणि सुगंधाला धीर देण्याचा प्रयत्न करू लागली. शेवंताला सुगंधा ओली बाळांतीन आहे, जपायला हवे म्हणून जास्त धीर देऊ लागली. वस्तीवरच्या माणसांनी महायात्रेची सर्व तयारी केली. सुगंधाच्या माहेरचे कोणीच नव्हते. मुलगाही लहान. गावातल्या माणसांनी पुढाकार घेऊन अंत्यविधी उरकायचे ठरविले. सकाळी सर्व विधी उरकले. सासू मात्र काही शांत होत नव्हती. ती सुगंधाला शिव्या देऊ लागली.

‘ तुला रीतिरिवाज माहीत नाही. गर्भार राहू नको काळजी घे पण ऐकले नाही.’

‘ अव काय बोलताय? कुठला परसंग हाय? ‘ सुगंधा

‘तुझ्या मुलीचा अपशकुन आहे. ती पांढऱ्या पायाची हाय. मला ती घरात नग.तिला अनाथ आश्रमात ठेवून ये. हे तुझ पाप आहे, हे मूल शामचे नाय ‘ सासूचा तोल सुटू लागला. मुलगाही रडू लागला. तशी शेवंता सुगंधाला आणि दोन्ही मुलाला तिच्या घरी घेऊन गेली. कंत्राटदार त्याला कळल्यावर तो ही आला. त्याने थोडे पैसे देऊ केले. मास्तरीणबाई शाळेच्या वेळेला आल्या. त्यांना हे कळल्यावर धक्का बसला. ती सुगंधाच्या झोपडीत गेली. तिंथे शेवंता सासुला जेवू घालत शांत

करीत होती. तरी मी आता सुगंधाला,‘माझ्या घरात ठेवणार नाय.ते तिचे मूल नाय. तुझ्या कंत्राटदाराचे हाय. तू तिला वाईट मार्गाला लावली. चल चालती हो’

शेवंता मात्र गोंधळली. असा काही आरोप होईल हे माहीत नव्हते. तरी तिने संयमाने घेतले. मास्तरीण बाईसुद्धा गोंधळल्या. परिस्थिती वेगळ्या वळणावर जात आहे. सुगंधाला आणि मुलांना येथे ठेवण्यात अर्थ नाही. पर्यायी व्यवस्था दूर केली पाहिजे हा विचार केला. तिने शेवंताला आणि काही गावच्या लोकांना बोलून दाखवला. सर्वजण सहमत झाले. यशोदाने डॉक्टरला काय करता येईल असे विचारले. त्याने कोल्हापूरला काही काळ सुधारगृहात ओळखीने सोय करता येईल का हे पहावे लागेल. तो काही मंडळींना बरोबर घेऊन कोल्हापूरला आला. त्याने सरकारी अधिकारी लोकांशी आणि समाजसेवा संस्थांशी बोलून तिची सोय होईल ही खात्री करून घेतली तसे यशोदाला आणि शेवंताला कळविले.

शेवंता आणि यशोदा तिच्या झोपडीत आलीत. कंत्राटदार सुगंधाची समजूत काढीत होता. डोक्यावरुन हात फिरावीत ‘ मी आहे काळजी करू नको. काहीबाही काम मी काढत जाईन तुला पैका मिळेल हे पाहीन. काळजी करू नग. ‘ असे आश्वासन देत होता. सुगंधाचे त्याच्याकडे लक्ष नव्हते. शेवंताचे आणि यशोदाचे हे पाहून काळीज चर्र झाले. दोघी आल्याचे पाहून तो दूर झाला.

‘ ये शेवंता मी जातो. काय लागले तर सांग. मी आहे.’ तो निघून गेला. शेवंताने त्याच्याकडे पाहिले पण नाही.

‘ शेवंते, ताईऽ मी आता काय करू? कुठे राहू? मला वस्तीवर नाय राहायचं ‘ सुगंधा धाय मोकलून रडत होती मुलगाही बाबा बाबा करून रडत होता. यशोदाने गावच्या डॉक्टरने जी सोय केली ती सांगितली. राहण्याची जेवण्याची सोय होईल हे पाहिले. आश्रम शाळेत मुलाला ठेवून तेथेच तिला काही काम मिळेल हे पाहू असे सांगितले. सुगंधा त्यास तयार झाली पण ह्या नरकातून बाहेर पडायचे आहे हे सांगितले. ‘ अग पण सासूचे काय? ’ यशोदाने विचारले. ‘ जाईल गावाकडे तिचे ती पाहिलं.’ सुगंधा

‘ ताई तुम्ही खरच लहान असून थोर आहात. कोण तुम्ही? काय नात आपल? पण तुम्ही गावातील लोकांसाठी माणुसकीने खूप करता.’ सुगंधा तिच्या पायाशी लोळण घेत बोलत होती. यशोदा सुगंधाला घेऊन कोल्हापूरला आली. तिने आणि डॉक्टरने तिची सर्व सोय केली. शेवंता वस्तीवर राहिली. पण कोल्हापूरला सुगंधाला मधून मधून भेटायची. सुगंधाच्या मुलाला आश्रम शाळेत घातले तो तिथेच राहून शिकू लागला. सुगंधाही कोल्हापुरात मुलीला घेऊन काहीबाही काम करू लागली. सुगंधाला मुलीला घेऊन काम करणे झेपत नव्हते.मुलीला अनाथ आश्रमात ठेवा असे ती जेथे काम करीत होती तेथील बायकांनी सांगितले. ‘माझी मुलगी अनाथ म्हणू जगायला नको. तिला आयबाप पाइजे.’ तिला मी जनम दिला आहे मग अनाथ म्हणून का सोडायचे ही भावना तिला बोचत होती.’ तिने यशोदाला हे सांगितले. यशोदाने मुलगी लहान आहे अजून माणूस ओळखत नाही तर तिला चांगल्या घरी दत्तक देऊन तिचे कल्याण होईल असे बघ असा सल्ला दिला. यशोदाच्या

आईवडिलांनी ही सुगंधाला समजावले. सुगंधाचे अंत:करण जडावले. पोटचे पोर कसे दूर करायचे. जवळ ठेवायचे तर तिला नीट वाढवू शकणार नव्हती. औषधपाणी पुढचा खर्च कोण करणार? सर्वच प्रश्न आ s करून उभे होते.

‘ अव ताई, कोण हे सर्व करणार? मला काय त्यातले कळते? असे जर केले तर माझी मुलगी सुखी होईल काय? ‘

‘ तू त्याची काळजी करू नको. माझे नातेवाईक मुंबईला आहेत मी विचारते. तुला कधीमधी कोल्हापुरात भेट घडवत जाईन पण नाते नाही सांगायचे या अटीवर सुगंधा मुलीचे कल्याण होत आहे म्हणून राजी झाली.

यशोदाने जिजू वसंतराव आणि रेवती बहिणीला फोन केला. सर्व हकीकत सांगितली. त्यांनी ही कोल्हापूरला मुलीला पाहायला येण्याचे मान्य केले. सुगंधा मुलीला घेऊन यशोदाच्या घरी आली. जिजूला बहिणीला मुलीला पाहून तिला अनाथ आश्रमात ठेवावे लागेल हे ऐकल्यावर कसे तरी झाले. मुलगी गोंडस आहे. श्री वसंतरावनी रेवतीला बाजूला घेतले. दोघे चर्चा करू लागली.

‘ अहो मुलगी चांगली आहे पण ती कुठल्या वस्तीत वाढली हे माहीत आहे ना? ’ रेवती

‘ त्याचे काय.जन्म हा आपल्या हातात असतो काय? मातीचा धर्म एकच. कुंभार जसा आकार देईल त्यावर अवलंबून आहे. तुला मुलगी घ्यावीशी वाटते काय?’ वसंतराव

दोघांनी विचार केला. पण करायचे रीतसर कायद्याने नंतर काही भानगडी नकोत. यावर एकमत झाले. दोघांनी संमती दिली. वकिलाच्या मदतीने सर्व सोपस्कार पूर्ण केलेत. सुगंधाला मदत म्हणून काही हजार हातावर ठेवले. सुगंधाने जडमनाने मुलीला त्यांच्या हाती सोपवले. मुलीचा नामकरणविधी सुगंधाच्या समोरच कोल्हापूरला केला तिचे नाव ‘ भाग्यश्री ‘ ठेवले. रेवती आणि वसंतराव मुलीला घेऊन मुंबईला गेलेत. भाग्यश्री घरी आल्यामुळे वसंतरावाना ही चित्रपटाची, मालिका लेखनाची कामे मिळण्यात वाढ होऊ लागली. शेजारी लोक हि ‘ वसंतराव हल्ली तुम्ही फार उत्साही आनंदी दिसता ’ . वसंतराव रेवती यांना ऐकून बरे वाटे. त्यांनी तिला खेळणी आणून दिली तिच्या कडे न पाहता व्हरांड्यात उभी राहून बाहेरच्या लोकांशी हाक मारून बोले, शेजारी जाऊन बसे. तेही तिचे कौतुक लोकांना सांगत. भाग्यश्री जसजशी मोठी होऊ लागली तशी ती शेजारीपाजारी मुलांना जास्तच हाक मारून घरी बोलावू लागली. घरात स्वत:हून पेपर लावणे, कप नेऊन ठेवणे, छोटी मोठी कामे न सांगता स्वत: करत होती. मुलांना शिकवल्याशिवाय ती करत नाहीत पण हि मात्र उपजत करते ह्याचे दोघांना कौतुक वाटत होते. लहान वयात तिला ही समज कशी आली हेच कळत नव्हते. वसंतरावांनी मुलीला दत्तक घेतले आहे हे गावी कळले. त्यांना एक वारस आला म्हणून दु:ख झाले. पण त्यांनी बोलून दाखवले नाही. ज्या ज्या वेळी वसंतराव गावी भाग्यश्रीला घेऊन जात त्यावेळी ते तुटकपणा न बोलता दाखवून देत असत. वसंतराव आणि रेवती कोल्हापूरला गेलेत की ते सुगंधाची ओळख मावशी असे करून देत. सुगंधा ही तिला जवळ घेऊन मुके घेई, आनंदात न्हाहू घाली. रेवतीला मात्र हे सहन होत नसे. भाग्यश्री मोठी होऊन

कॉलेजला जाऊ लागली. वसंतराव ही आता 70 रीला आले. रेवतीला आणि वसंतरावांनी भाग्यश्रीला तिची खरी आई कोण आहे हे सांगायला हवे हे ठरविले. शेजारी लोकांकडून कळले की तिचा विश्वासघात होईल असे घडायला नको हे ठरविले. त्यांनी गावच्या मालकी हक्कात तिचे नाव घातले. त्यांच्यानंतर तिचे नुकसान होऊ नये हे पाहिले. वसंतराव आणि रेवती भाग्यश्रीला घेऊन बाहेरगावी फिरायला गेलेत. येताना ते स्वामी दर्शनाला अक्कलकोटला गेलेत. देवदर्शन झाल्यावर त्यांनी भाग्यश्रीला कुणा कडून कसे दत्तक घेतले तिचा पूर्वीचे आयुष्य काय होते हे देवळात सांगितले. दोघेही भाग्यश्रीकडे प्रतिक्रियेसाठी पाहू लागले. भाग्यश्रीने दोघांचे हात हातात घेतले, त्यांचे चुंबन घेतले. देवाच्या पाया पडून त्यां दोघांच्या गळयात पडली. तिच्या डोळयातील अश्रु दोघांच्या कपड्यावर पडत होते. ती गदगदल्या स्वरात म्हणत होती “तुम्हीच माझे आईवडील आहात. ती मावशीच रहाणार. तुम्हाला कधीच अंतर देणार नाही.”वसंतराव आणि रेवती स्वामींना नमस्कार करीत ‘ही सारी तुमची कृपा’ मनातल्या मनात म्हणाले. डोळे पुसत तिचे मुके घेऊ लागले. मठातील लोक हा प्रसंग गहिवरल्या मनाने बघत होते.

************

# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे पंधरावे वर्ष
# श्री अरविंद बुधकर यांचे हे चौथे पुस्तक.

श्री अरविंद बुधकर हे ह्युमन रिसोअर्स्सेस मॅनेजमेंट (HR) चे तज्ञ. त्यांना व्यवसायामुळे आणि मुळातच माणसांच्या स्वभाव वैशिष्ट्यांच्या निरिक्षणाची आवड. माणसे मोठी कशी होतात याचे कुतुहल. आणि बोलण्याचे कौशल्य. या सर्व गुणांचे प्रतिबिंब त्यांच्या लेखनात उमटते.

श्री. अरविंद बुधकर यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१२), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (३४), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(३१), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (११), अंकुश शिंगाडे(१९), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३),

अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(८), जगदिश खांदेवाले(५) पंकज कोटलवार(४) डॉ. सुरुची नाईक (३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(४), श्याम कुलकर्णी(९), किशोर कुलकर्णी(2), रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं "इ"यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।